## नेमणे आहे

नामवंत दै. ‘जनता आवाज’ वृत्तपत्रासाठी तसेच न्यूज चॅनलकरिता प्रतिनिधी नेमणे आहेत.

१) अहिल्यानगर
२) पुणे
३) नाशिक
४) छत्रपती संभाजीनगर
५) बीड
संपर्क:- ८८९६७११७११
jantaawajnews@gmail.com

दैनिक
# जनता आवाज

साई समर्थ सिमेंट प्रॉडक्टस्
पाईप कंपनी ६ इंच ते ६ फुटापर्यंत सिमेंट पाईप (As Per ISI) योग्य दरात उपलब्ध.

सिमेंट पाईप | सेप्टिक टँक | वॉटर टँक | गव्हाणी,ढापे | सिमेंट पोल
सतिष उत्तमराव खर्डे पा. 9552749534
अमोल सिताराम थोरात पा. 9764626533
ज्ञानेश्वर रघुनाथ खर्डे पा. मा.उपसरपंच,को.बु।।
राजुरी रोड,श्री स्वामी समर्थ केंद्राच्या पुढे,कोल्हार बु।। 9765481334

अहिल्यानगर | वर्ष ०२ रे | अंक १७७ | शुक्रवार, दि. २९ ऑगस्ट २०२५ | PRGI No. MHMAR/25/RAA11 | पाने ०८ | किंमत ४ रुपये

## संमिश्र

### नांदेडमध्ये ढगफुटी सदृश्य पाऊस

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नांदेड :** जिल्ह्यातील कंधार तालुक्यातील चिखली गावासह अनेक गावांत मुसळधार पावसामुळे पूरस्थिती निर्माण झाली आहे. आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांनी पूरग्रस्त भागाची पाहणी करून परिस्थितीची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांना दिली आहे. हवामान विभागाने पुढील काही तासांत जोरदार पावसाचा इशारा दिला आहे.

### राज्यात गणेशोत्सवावर पावसाचे सावट

**जनता आवाज वृत्तसेवा**

**मुंबई :** राज्यात गणेश चतुर्थीच्या काळात राज्यात जोरदार पाऊस परतण्याची शक्यता आहे. हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार, मध्य महाराष्ट्रातील घाटमाथ्यावर ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. मुंबई, ठाणे, पालघरसह संपूर्ण कोकण, तसेच उत्तर महाराष्ट्र आणि विदर्भातील सर्व जिल्ह्यांसाठी यलो अलर्ट जाहीर करण्यात आला आहे. मराठवाड्यातही काही ठिकाणी हलका ते मध्यम पाऊस अपेक्षित आहे. या काळात नागरिकांना विशेष खबरदारी घेण्याचे आवाहन हवामान विभागाने केले आहे. महाराष्ट्रात ८ ते १० दिवसांपूर्वी झालेल्या पावसाचा मोठा तडाखा बसला होता. मुंबईसह नांदेड जिल्ह्यात मोठे नुकसान झाले होते. त्यानंतर पावसाने उघडीप देत थोडा दिलासा दिला होता. मात्र, आता पुन्हा बंगालच्या उपसागरातील कमी दाबाचे क्षेत्र, पश्चिमी विक्षोभ आणि चक्रीवादळी वाऱ्यांमुळे देशभरातील हवामानात बदल झाला आहे.

### ३ पाकिस्तानी दहशतवादी नेपाळमार्गे बिहारमध्ये शिरले

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पटना :** नेपाळमार्गे बिहारमध्ये तीन पाकिस्तानी दहशतवादी घुसले आहेत. पोलिस मुख्यालयाने तिघांचेही फोटो जारी केले आहेत. हे सर्व दहशतवादी जैश-ए- मोहम्मद या दहशतवादी संघटनेशी संबंधित असल्याचे वृत्त आहे. पोलिसांनी ज्या दहशतवाद्यांचे फोटो जारी केले आहेत त्यांची नावे हसनैन अली, आदिल हुसेन आणि मोहम्मद उस्मान अशी आहेत. हसनैन रावळपिंडीचा, आदिल उमरकोटचा आणि उस्मान बहावलपूरचा आहे. पोलिस मुख्यालयाने सर्व जिल्ह्यांना गुप्तचर यंत्रणा सक्रिय ठेवण्याचे, माहिती गोळा करण्याचे आणि संशयितांवर बारकाईने लक्ष ठेवण्याचे आदेश दिले आहेत.






# मराठा मोर्चा मुंबईत धडाडला

## गोळ्या झेलणार, पण मागे हटणार नाही : जरांगे

## मराठ्यांचा अपमान करू नका, त्यांची मने जिंका

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जुन्नर : अजूनही तुमच्या हातातून वेळ गेलेली नाही. गोरगरिबांची मनं जिंकण्यांची मुख्यमंत्र्यांकडे योग्य संधी आहे. तुम्ही आमचे वैरी नाहीत, शत्रू नाहीत. फक्त आठमुठी भूमिका सोडून द्या, असे म्हणत मनोज जरांगे पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीकास्त्र सोडले. आम्ही आरक्षणासाठी भांडत आहोत, ते पण लोकशाही मार्गाने. आजपासून मराठ्यांविषयी भूमिका बदला. सत्ता दिली मराठ्यांनी आणि उलटले मराठ्यांवरच. मराठा समाजाला जाणूनबाजून टार्गेट केले जात आहे. आरक्षण दिल्यानंतर मराठा समाज सन्मान करेल. आताच अंमलबजावणी करा. मराठा समाजाला आणि मला मुर्ख बनवत आहेत, जाणूनबुजून अपमान करत आहेत. तुम्ही गोळ्या घातल्या तरी मनोज जरांगे झेलणार; पण मागे हटणार नाही, असा इशाराही मनोज जरांगे यांनी दिला आहे. मनोज जरांगे यांनी मराठा आरक्षणासाठी मोर्चा काढला असून ते मुंबईला निघाले आहेत. मनोज जरांगे हे आंदोलनावर ठाम आहेत. सध्या ते जुन्नरमध्ये असून किल्ले शिवनेरीच्या पायथ्यावर नतमस्तक होऊन ते मुंबईकडे रवाना झाले आहेत. मुंबईला निघण्यापूर्वी त्यांनी मराठा बांधवांशी संवाद साधला आणि पत्रकार परिषद घेतली.**

या पत्रकार परिषदेतून त्यांनी पुन्हा एकदा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर निशाणा साधला. त्यांनी एक दिवसाची वेळ देणे ही चेष्टा आहे. आमचा हट्ट नाही; पण मागण्या मान्य करा. समाजाच्या वेदना मुख्यमंत्र्यांनी समजून घ्याव्यात. निर्णय कोर्टाच्या नाही, तर तुमच्याच हातात आहे. फडणवीस आंदोलकांना थांबवणार नाहीत, त्यांचा सन्मान करतील. अजूनही तुमच्या हातातून वेळ गेली नाही.

गोरगरिबांची मने जिंकण्यांची फडणवीसांकडे योग्य संधी आहे. तुम्ही आमचे वैरी नाहीत, शत्रू नाहीत. फक्त आठमूठी भूमिका सोडून द्या. जरांगेंनी यावेळी मराठा आंदोलनकांना आवाहन केले की, जे काय नियम आहेत. ते मराठा पाळणार. एक दिवस देता आंदोलनासाठी तर एका दिवसात अंमलबजावणी करा. मराठ्यांची नाराजी अंगावर घेऊन पुढे काय होईल हे लक्षात घ्या. महायुतीला मराठ्यांशिवाय यश मिळविणे कठीण होते. आझाद मैदानावर मी आमरण उपोषण करणार आहे. आज २९ ऑगस्टला सकाळी आमरण उपोषण सुरू करणार आहे. मराठ्यांनी संयम ठेवायचा. गडबड गोंधळ करू नका. कोणतीही चूक करू नका.

मराठ्याच्या सर्व पोरांनी शांततेत घ्यावे. लढताना फक्त संयमाने आणि शांततेने लढा. आंदोलनात खंड पडून देऊ नका. तसेच, मुख्यमंत्री फडणवीस, तुम्ही आम्हाला अट घालू नये. ५००० लोकांची आणि एक दिवसाच्या आंदोलनाची अट घालू नये. ज्यांची आंदोलनासाठी येण्याची इच्छा आहे. त्यांना येऊ द्या. अटी घालू नका. सर्व अटी-शर्ती काढाव्यात, असे आवाहन जरांगेनी फडणवीसांना केले. मराठा आरक्षण प्रश्नाच्या पार्श्वभूमीवर अंतरवाली सराटीतून मुंबईच्या दिशेने निघालेले मनोज जरांगे पाटील यांचे रात्री एक वाजता नेप्ती बायपास चौकात आगमन झाले. यावेळी पाऊस सुरु असतांनाही हजारो मराठा बांधवांनी जरांगे पाटलांचे पावसात भव्य स्वागत केले. गुरुवारी (दि. २८) पहाटे सव्वापाच वाजण्याच्या सुमारास आळेफाटा (ता. जुन्नर) येथे आगमन झाले. फुलांची उधळण करत, फटाक्यांच्या आतषबाजीत, ‘एक मराठा लाख मराठा’च्या जयघोषणात त्यांचे येथे भव्य असे स्वागत करण्यात आले.

गुरूवारी पहाटेच्या सुमारास मनोज जरांगे पाटील यांचे पुणे जिल्ह्यात आगमन झाले. जिल्ह्याच्या सरहद्दीवरील आणे, पेमदरा, बेल्हे, राजुरी व ठिकठिकाणी स्वागतानंतर ते आळेफाटा परिसरात आले. आळे, संतवाडी, कोळवाडी, आळेफाटा, वडगाव आनंद येथील सकल मराठा समाज व सर्व समाज बांधव यांच्यावतीने भव्य असे स्वागत करण्यात आले. यावेळी मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. आंदोलनादरम्यान मनोज जरांगे यांच्या एका सहकाऱ्याचा मृत्यू झाला. अंतरवाली सराटीवरून निघालेला जरांगेचा मोर्चा गुरुवारी सकाळी जुन्नरमध्ये दाखल झाला. या मोर्चादरम्यान हृदयविकाराचा झटका येऊन जरांगेंच्या सहकाऱ्याचा मृत्यू झाला. त्यामुळे एकच खळबळ उडाली. याआधी जरांगेंचा मोर्चा निघण्यापूर्वी मराठा आरक्षणासाठी लातूरमधील एका तरुणाने आत्महत्येचा प्रयत्न केला. या दोन्ही घटनांवर मनोज जरांगेंनी प्रतिक्रिया देत दुःख व्यक्त केले.

मनोज जरांगे पाटील यांच्या मोर्चाचा दुसरा दिवस आहे. आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी पुणे जिल्ह्यातील मराठा बांधवांनी मोठ्या संख्येने किल्ले शिवनेरी येथे गर्दी केली होती. या मराठा बांधवांमधील एका तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाला. सतिश ज्ञानोबा देशमुख (वय ४० वर्षे) असं या मृत आंदोलकाचे नाव आहे. सतिश देशमुख हे मनोज जरांगे पाटील यांच्या मोर्चासोबत मुंबईला जाणार होते. पण मोर्चा मुंबईच्या दिशेने निघण्यापूर्वीच त्यांचा हृदविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला. मनोज जरांगे यांची शिष्टमंडळाच्या माध्यमातून भेट घेण्याबाबत अद्याप निर्णय झालेला नाही. समाजाच्या मागण्यांसाठी सरकार संवेदनशील आहे. हैदराबाद गॅझेटवर न्या.शिंदे समितीचा पान ४



मराठा समाजाला आरक्षण मिळाले पाहिजे. मराठा समाजाला वेगळे आरक्षण दिले पाहिजे ही आमची भूमिका आहे, आमचे मुख्यमंत्री याच भूमिकेचे आहेत. ५० वर्षे शरद पवार आणि काँग्रेसचे मराठा नेते मुख्यमंत्रिपदावर होते पण कधीही त्यांनी मराठा समाजासाठी निर्णय घेतला नाही. देवेंद्र फडणवीस यांनी सरकार आल्यानंतर मराठा समाजासाठी आरक्षणाचा निर्णय घेतला. यानंतर हायकोर्ट, सुप्रीम कोर्टात हे आरक्षण टिकले हे सर्व फडणवीसांच्या सरकारमध्ये झाले.

**– चंद्रशेखर बावनकुळे, महसूल मंत्री**



कबुतरांसाठी आंदोलन करणाऱ्यांना सरकार परवानगी देते, तर मराठी माणसांना त्यांच्या मागण्यासाठी आंदोलन करण्याचा अधिकार आहे, मग ते कुणीही असो. मनोज जरांगे पाटील हे मुंबईत आंदोलन करण्यासाठी येत आहेत. त्यांच्या मागण्यांविषयी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि त्यांच्या सरकारला नव्याने माहिती देणे गरजेचे नाही. विधानसभा निवडणुकीच्या आधी सरकारने जरांगे पाटील यांच्याशी चर्चा केली. पुन्हा सरकार आलेले आहे. देवेंद्र फडणवीस यांनी शब्दाला जागून हे काम पूर्ण करावे. मुंबई ही मराठी माणसाची आहे, त्यांना मुंबईमध्ये येण्यापासून कुणीही रोखू शकत नाही.

**– संजय राऊत, खासदार**



मनोज जरांगे पाटील यांच्या मागण्या रास्तच आहेत. याविषयी कुणाचेही दुमत असण्याचे कारण नाही. पण मुंबई, कोकण, आपला देश आणि जगाच्या पाठीवर गणपती बाप्पांचा उत्सव साजरा केला जात आहे. त्यामुळे जरांगेंनी या कालावधीत आंदोलन करण्यापेक्षा चर्चा करण्यासाठी पुढे यावे. असे झाले तर चर्चेतून निश्चितच एखादा चांगला समाधानकारक तोडगा निघू शकतो.

**– दादा भुसे, शालेय शिक्षण मंत्री**

# मराठा समाजाचा एकजुटीचा निर्धार

## पावसालाही न घाबरता नेप्ती चौफुल्यावर जल्लोषात स्वागत, फुलांचा वर्षाव

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** मराठा आरक्षणासाठी संघर्षशील नेतृत्व करणारे मनोज जरांगे पाटील आपल्या ताफ्यासह मुंबईकडे कूच करत आहे. या आंदोलनाला राज्यभरातून प्रचंड पाठिंबा मिळत आहे. बुधवारी संध्याकाळी जरांगे पाटील यांचा ताफा शेवगाव शहरात दाखल झाला. यावेळी नागरिकांनी मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात त्यांचे स्वागत केले. शेवगावच्या मिरीमार्गे पांढरीपूल आणि शेंडी बायपास मार्गे हा ताफा पुढे सरकला.

शेंडी बायपास येथे विशेष उत्सवाचे स्वरूप दिसून आले.



स्वागतासाठी तरुणाईने जेसीबी मशीनच्या लोडर मधून पुष्पवृष्टी करत मनोज जरांगे पाटील यांना सलामी दिली. परिसर एक मराठा, लाख मराठा या घोषणांनी दणाणून गेला होता.त्या पुढे दूधडेअरी चौक, नेप्ती चौफुला आणि इतर अनेक ठिकाणी देखील त्यांच्या ताफ्याचे मोठ्या जल्लोषात स्वागत करण्यात आले.

फटाक्यांची आतषबाजी, फुलांची उधळण आणि पान ४

### जिल्ह्यातीलही काहींचा ताफ्यात समावेश

मनोज जरांगे पाटील यांच्या ताफ्यात अहिल्यागनर जिल्ह्यातील काहीजणांनी दाखल होत. मुंबईकडे कूच केली. संगमनेरसह अकोले, कोपरगाव, आदी तालुक्यातील मराठा बांधव घारगाव मार्गे पुण्यात जरांगे पाटील यांच्या ताफ्यात दाखल झाले. श्रीगोंदे, जामखेड, कर्जतमधील मराठा बांधव पुण्यात जाऊन जरांगे पाटील यांच्या ताफ्यात दाखल झाले.

### पोलिस बंदोबस्त

मोर्चा मार्गावर पोलिस बंदोबस्त मोठ्या प्रमाणात तैनात करण्यात आला होता. यावेळी कुठलाही अनुचित प्रकार घडला नाही. आंदोलनकर्त्यांना पोलिसांसह मराठा बांधवांनी मार्गदर्शन केले. मराठा समाज बांधवांनीही पोलिस कर्मचाऱ्यांच्या प्रत्येक सूचनेचे पालन केले.

### महिलांची उपस्थिती लक्षणीय

मनोज जरांगे पाटील यांचे स्वागत करण्यासाठी अबाल वृध्दांसह महिलाही मोठ्या प्रमाणात उपस्थित होत्या. महिलांनीही जरांगे पाटील यांच्या ताफ्याचे या वेळी स्वागत केले. तसेच आंदोलनकर्त्यांना पाणी व नाटा वाटपात मदत केली.

# जरांगेंचा गैरसमज दुर करु : ना. विखे पाटील

**जनता आवाज वृत्तसेवा**



**लोणी :** मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे यांच्याशी चर्चा करण्याची सरकारची केव्हाही तयारी आहे. आरक्षणाच्या बाबतीत महायुती सरकारने जे काम केले तसे निर्णय महाविकास आघाडी सरकारच्या काळात होवू शकले नाही. केवळ मुख्यमंत्री फडणवीस यांच्यावर व्यक्तिगत टिका करुन, आरक्षणाचा प्रश्न सुटणार नाही. महाविकास आघाडीच्या नेत्यांनी सरकारला सल्ले देण्यापेक्षा आरक्षण घालविण्याचे प्रायश्चित घ्यावे, असे जोरदार प्रतिउत्तर जलसंपदामंत्री तथा उपसमितीचे अध्यक्ष ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी मांडली.

माध्यमांशी बोलताना मंत्री विखे पाटील म्हणाले की, जरांगे पाटील यांच्याशी प्रत्यक्ष नाही; परंतु त्यांच्या सहकाऱ्यांमार्फत संपर्क निश्चित साधला होता. मात्र व्यवस्थित निरोप न पोहोचल्यामुळेच त्यांचा गैरसमज झाला, तो दुर करु. सरकार केव्हाही त्यांच्याशी चर्चा करायला तयार आहे; पण आपल्या आंदोलनासाठी जरांगे मुंबईला जाण्यावर ठाम असल्यामुळे मुंबईतच चर्चा करु ही भूमिका आमची आहे. उपसमितीच्या सदस्यांशी चर्चा करुन, याबाबतचा निर्णय आम्ही करणार आहोत. दोन्हीही बाजूंनी सकारात्मकता असेल तर, मार्ग लगेच निघू शकेल, अशी भूमिका त्यांनी मांडली.

एकीकडे आरक्षणाचा कायदेशीर प्रश्न सोडविण्यासाठी महायुती सरकारची भूमिका ही कालही सकारात्मक होती, आजही आहे. पण केवळ या कायदेशीर बाबींवर अवलंबून न राहाता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली सरकारने मराठा समाजातील तरुणांना, विद्यार्थ्यांना सारथी आणि आण्णासाहेब पाटील महामंडळाच्या माध्यमातूमन सहकार्य करण्याची भूमिका घेतली आहे. सारथी संस्थेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना राज्यात तसेच परदेशात शिक्षण घेण्यासाठी शिष्यवृत्ती उपलब्ध करुन दिल्या जात आहेत. मराठा समाजातील तरुणांसाठी असे काम यापूर्वी राज्यात कधीही झाले नव्हते.

आण्णासाहेब पाटील महामंडळाच्या माध्यमातून १२४७.७९ कोटी रुपयांचे अर्थसहाय्य समाजातील तरुणांना दिले गेले याकडे लक्ष वेधून ना.विखे पाटील म्हणाले की, जरांगे यांनी उपस्थित केलेले मुद्दे हे कायदेशीर बाबींशी निगडीत आहेत. यासाठीच शिंदे समिति गठीत करण्यात आली आहे. हैद्राबाद गॅझेंटच्या संदर्भात महसूल मंत्री असताना पान ४

# आ. कर्डीले पुन्हा सक्रिय, दररोज घेणार जनता दरबार

## आजारपणात विरोधकांनी पसरविलेल्या अफवांमुळे आ. कर्डीले झाले भावनाविवश

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : आजारपणात विरोधकांनी पसरवलेल्या अफवामुळे कार्यकर्ते गोंधळले गेले. पूर्वीचे राजकरण इतकया खालच्या थराला नव्हते, विरोधकांचे काम आहे. टीका करायचे ते करतच राहणार. पण यामुळे कार्यकर्त्यांना खूप त्रास झाला हे सांगताना आ. कर्डीले भावनाविवश झाले. मी डॉक्टरला सांगितले, मी कार्यकर्त्यांमध्ये राहणारा त्यांच्या अडीअडचणी २४ तास सोडवणारा आहे. गोळ्यापेक्षा मी त्याच्यामध्ये राहिलो तर लवकर बरा होईल, त्यामुळे डॉक्टरांनी परवानगी दिली आहे व पुन्हा सक्रिय झालो आहे. त्यामुळे आता रोज जनता दरबार घेणार असल्याची माहिती आ. शिवाजीराव कर्डीले यांनी दिली.

चिचोंडी पाटील उपबाजार समिती तसेच नेप्ती उपबाजार समिती येथील सात एकरात



कांद्याचे शेडचे भूमिपूजन करण्यात येणार आहे. या भूमिपूजनासंदर्भात नेप्ती उपबाजार समिती येथे आ. शिवाजीराव कर्डीले यांच्या अध्यक्षतेखाली नियोजन बैठक आयोजीत केली होती. यावेळी ते बोलत होते.

या बैठकीला बाजार समितीचे माजी सभापती भानुदास कोतकर, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अक्षय कर्डीले, संभाजी लोंढे, भाजप जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिग, बाजार समितीचे सभापती भाऊसाहेब बोठे, उपसभापती रभाजी सुळ, अविनाश घुले उपस्थित होते.

या बाजार समितीमुळे आहिल्यानगरच्या विकासात भर पडणार आहे. या कार्यक्रमासाठी मा. आ. बबनराव पाचपुते, डॉ. सुजय विखे पाटील, आ. विक्रम पाचपुते यांच्यासह जिल्हयातील मान्यवर उपस्थित राहणार आहे. यावेळी अक्षय कर्डीले याचे भाषण झाले.

यावेळी बाजार समितीच्या मनिषा घोरपडे, रामदास सोनवणे, हरिभाऊ कर्डिले, संतोष म्हस्के, संजय गिरवले, भाऊ भोर, मधुकर मगर, सुधीर भापकर, दत्ता तापकीरे, राजु आंबेकर, सुभाष निमसे, धर्मनाथ आव्हाड, भाऊसाहेब ठोंबे, राजेंद्र बोथरा, निलेश सातपुते, हरीभाऊ कर्डीले, विलास शिंदे, सुरेश सुंबे, विठ्ठल जपकर, शाम घोलप, बाजीराव हजारे, अशोक कोकाटे, बाबासाहेब काळे आदीसह मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते. प्राप्ताविक संतोष म्हस्के यांनी केले व आभार सुधीर भापकर यांनी मानले.

> चिंचोडी पाटील येथील उपबाजार समितीचा बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना फायदा होणार आहे. तसेच नेप्ती उपबाजार समिती जवळच असणाऱ्या सात एकरामध्ये कांदा मार्केटच्या विस्तरीकरण करण्यासाठी कांदा शेड उभारण्यात येणार आहे. या दोन्ही कामाचे भूमिपूजन मंत्री जयकुमार रावल, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते होणार आहे.
> **– शिवाजीराव कर्डीले, आमदार**

# राजकीय दबावाखाली दर्ग्यांवर कारवाई करू नका

## मुस्लिम समाजाची मनपा आयुक्तांसह जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : शहरातील पटवर्धन चौक येथील घोडे पीर दर्गा काही समाजकंटकांनी पाडल्याच्या घटनेचा मुस्लिम समाजाने तीव्र निषेध व्यक्त केला आहे. या पार्श्वभूमीवर महानगरपालिका हद्दीतील कोणत्याही ऐतिहासिक दर्ग्यावर कारवाई करू नये, अशी मागणी मुस्लिम समाजाने केली आहे.

याबाबतचे निवेदन मनपा आयुक्त व जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले यावेळी माजी नगरसेवक शेख मुदस्सर



अहमद इसहाक व सामाजिक कार्यकर्ते जुबेर बाबामिया सय्यद, अरबाज शेख, परवेज शेख, वामिस शेख, हाजी एजाज, ग्लोबल मराठी न्यूजचे संपादक फारुख शेख, रऊफ पेंटर, फारुख फरशी, आतिफ मेडिकलवाला, सय्यद शफी बाबा यावेळी मोठ्या संख्येने समाजबांधव उपस्थित होते.

अहिल्यानगर शहराची स्थापना पाचशे वर्षांपूर्वी झाली असून येथे अनेक प्राचीन दर्गे आहेत. या दर्ग्यांचा उल्लेख शासकीय रेकॉर्ड बुक व गॅजेटमध्ये आढळतो, तसेच काही दर्ग्यांना दानरूपाने जमिनी मिळाल्याची नोंद वक्फ बोर्डाकडे उपलब्ध आहे.

निवेदनात असा आरोप करण्यात आला आहे की, काही राजकीय व्यक्ती दबाव टाकून प्रशासनाकडून दर्ग्यांवर कारवाई करण्याचा प्रयत्न करीत आहेत. प्रशासनाने कोणत्याही परिस्थितीत राजकीय दबावाला बळी न पडता निष्पक्षपणे निर्णय घ्यावा, अशी समाजाची मागणी आहे. तसेच, कोणत्याही दर्ग्यावर कारवाई करायची असल्यास त्या दर्ग्याच्या विश्वस्तांना किंवा स्थानिक प्रतिनिधींना पूर्वसूचना देणे आवश्यक असल्याचेही स्पष्ट करण्यात आले. माजी नगरसेवक शेख मुदस्सर अहमद इसहाक यांनी इशारा दिला की, जर मनपा प्रशासनाने राजकीय दबावाखाली कारवाई केली. तर मुस्लिम समाज न्यायालयात जाऊन मोठे आंदोलन उभारेल.

# जनसेवेचा वसा घेऊन शिवसेनेचे राजकारण

## सचिन जाधव; नगरमध्ये शिवसेनेच्यावतीने स्व. दिघेंना अभिवादन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : वंचित, पीडित, कष्टकरी, शेतकरी यांना न्याय देण्याचे काम स्व. आनंद दिघे यांनी केले. गरिबांचा कैवारी म्हणून राजकारणापलीकडे जाऊन त्यांनी समाजकार्य केले. त्यांच्या विचाराने व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शहरात शिवसेनेचे कार्य सुरु आहे. सर्वसामान्यांचा पक्ष म्हणून शिवसेनेची ओळख असून, जनसेवेचा वसा घेऊन राजकारण सुरु आहे. सर्वसामान्यांसाठी सर्वात अगोदर धावून जाणारे शिवसैनिक असल्याचे प्रतिपादन शिवसेनेचे शहर प्रमुख सचिन जाधव यांनी केले.



शिवसेनेच्या वतीने स्व. आनंद दिघे यांच्या पुण्यतिथीनिमित्त सावेडी येथील अपंग संजीवनी सोसायटी संचलित मूकबधिर विद्यालय व वस्तीगृहातील विद्यार्थ्यांना मिष्टान्न भोजनाचे वाटप करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

यावेळी जिल्हाप्रमुख अनिल शिंदे, माजी नगरसेवक संभाजी कदम, संजय शेंडगे, दत्ता कावरे, युवकचे जिल्हा प्रमुख योगेश गलांडे, शहर प्रमुख महेश लोंढे, अशोक दहिफळे, राम वडागळे, अविनाश भिंगारदिवे, रोहित पाथरकर, विनोद शिरसाठ, शैलेश जगधने, महिला जिल्हा संघटक ॲड. पुष्पा येळवंडे, रोहित जाधव आदींसह शिवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अनिल शिंदे म्हणाले की, स्व. आनंद दिघे यांचे राजकीय व सामाजिक कार्य सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. त्यांच्या विचाराने प्रेरित होऊन सर्वसामान्य वर्ग शिवसेनेला जोडला गेला आहे. सर्व शिवसैनिक त्यांचा आदर्श समोर ठेवून राजकारण करत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

> शिवसेना सामाजिक बांधिलकी ठेऊन समाजात कार्य करत आहे. स्व. बाळासाहेब ठाकरे आणि स्व. आनंद दिघे यांचा समाजकारणाचा वारसा शिवसैनिक पुढे घेऊन जात आहे. शिवसेनेच्या शिकवणीप्रमाणे सर्वसामान्यांमध्ये जाऊन समाजकारण सुरु असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. दत्ता कावरे यांनी दरवर्षी स्व. बाळासाहेब ठाकरे आणि स्व. आनंद दिघे यांची जयंती, पुण्यतिथी सामाजिक उपक्रमाने साजरी केली जाते आहे.
> **– संभाजी कदम**

# ‘आप’च्या झोपा काढो आंदोलनाला यश

### शाळांच्या दुरावस्थेवर वेधले लक्ष; प्रश्न सोडविण्याचे उपायुक्तांचे आश्वासन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : महापालिकेच्या शाळांची झालेली दुरावस्थेच्या प्रश्नावर आम आदमी पार्टी अहिल्यानगरच्या वतीने महापालिकेसमोर झोपा काढो आंदोलन करण्यात आले होते. या आंदोलनाची दखल घेऊन महानगरपालिकेचे उपायुक्त डॉ. संतोष टेंगले यांनी महापालिकेच्या शाळांच्या दुरावस्थेसंदर्भात तातडीने प्रश्न सोडविण्याचे लेखी आश्वासन शिष्टमंडळास दिले असून, आपच्या आंदोलनाला यश आले आहे.



आपच्या पदाधिकाऱ्यांनी महानगरपालिकेच्या शाळांना भेटी देऊन तेथील विद्यार्थ्यांच्या समस्या, शाळेची दुरावस्था, शौचालयाची परिस्थिती व पिण्याच्या पाण्याची अवस्था आणि शालेय परिसरात असलेली अस्वच्छतेबाबत महापालिकेकडे तक्रार केली होती. यासंदर्भात कारवाई होत नसल्याने नुकतेच महापालिकेच्या प्रवेशद्वारावर शहर जिल्हाध्यक्ष भरत खाकाळ यांच्या नेतृत्वाखाली झोपा काढो आंदोलन करण्यात आले होते.

यामध्ये आपचे राज्य सचिव सुभाष केकाण, जिल्हा प्रवक्ता ड. महेश शिंदे, महिला शहराध्यक्ष ड. विद्याताई शिंदे, राम लाड, रजनीताई ताठे, शंकर गोरे, सुनील ठाकरे, सिताराम खाकाळ, सचिन एकाडे, बाळासाहेब थोरात आदी पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते.

आपचे राज्यसचिव सुभाष केकाण यांनी मनपालिकेच्या तसेच सरकारी शाळांची अतिशय दयनीय अवस्था झालेली आहे. शिक्षणाच्या पवित्र कार्यात देखील अनागोंदी सुरु आहे. प्रशासनाला जागे करण्यासाठी विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी आंदोलन करावे लागत आहे.

> आम आदमी पार्टीचे पक्षाचे प्रमुख अरविंद केजरीवाल यांनी दिल्लीतील शिक्षण क्षेत्रात अमुलाग्र बदल आणि आरोग्य क्षेत्रात सुधारणा केली. तर आपच्या माध्यमातून शहराचा सर्वांगीन विकास साधला जाणार असून, जनतेच्या सेवेसाठी आपच्या माध्यमातून कार्य सुरु आहे.
> **– भरत खाकाळ,** शहर जिल्हाध्यक्ष

### सरोज आल्हाट यांच्या काव्यसंग्रहास पुरस्कार जाहीर

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने कवयित्री सरोज आल्हाट यांच्या सखे या काव्यसंग्रहास राज्यस्तरीय बहिणाबाई चौधरी उत्कृष्ट काव्यसंग्रह पुरस्कार जाहीर करण्यात आला असल्याची माहिती देण्यात आली आहे.

# बाल गणेश भक्तांसाठी ‘सेल्फी विथ बाप्पा’ स्पर्धा

### माजी महापौर बाबासाहेब वाकळे व माजी उपमहापौर अनिल बोरुडे यांचे आयोजन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : भारतीय संस्कृतीचे जतन करत उत्सवाला सामूहिकतेचा आणि आनंदाचा स्पर्श देण्यासाठी सावेडी उपनगरामध्ये गौरी गणपती सजावट स्पर्धा तसेच लहानग्या गणेश भक्तांसाठी विशेष 'सेल्फी विथ बाप्पा' स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमाचे आयोजन माजी महापौर बाबासाहेब वाकळे व माजी उपमहापौर अनिल बोरुडे यांच्या वतीने करण्यात आले असून, नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग होण्याची अपेक्षा आयोजकांनी व्यक्त केली आहे.

आपले सण-उत्सव हे फक्त आनंदासाठी नसून, ते आपल्या संस्कृतीचे दर्शन घडवतात. आधुनिकतेच्या या युगात आपली परंपरा विसरली जाऊ नये, म्हणूनच अशा स्पर्धा घेतल्या जात आहेत. एकत्रित आनंद, कौटुंबिक जुळवाजुळव आणि संस्कृतीचे जतन हेच या उपक्रमामागचे मुख्य उद्दिष्ट आहे. सहभागी स्पर्धकांना आकर्षक बक्षिसे देण्यात येणार आहेत, असे प्रतिपादन माजी महापौर बाबासाहेब वाकळे यांनी केले.

गौरी गणपती हा सण परंपरेने महिलांशी घट्ट जोडलेला आहे. त्यामुळे महिलांसाठी खास सजावट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. सहभागी महिलांनी गौरी गणपती सजावटीचा फोटो काढून पाठवायचा आहे. सजावटीत पारंपरिकतेबरोबरच सर्जनशीलतेलाही महत्त्व दिले जाणार आहे.५ ते १२ वर्षे वयोगटातील बाल गणेश भक्तांसाठी ही स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. लहानग्या मुलांनी स्वतःची व बाप्पाची सेल्फी काढून पाठवायची आहे. या उपक्रमामुळे लहान मुलांमध्ये गणेशभक्तीची भावना अधिक बळकट होईल, सर्व स्पर्धकांनी आपले फोटो ५ सप्टेंबरपर्यंत खालील व्हाट्सअप क्रमांकावर पाठवावेत ७२७६४८४४४४, ८८६२०३१०९५, ७८८७८७८७६६, ९२६०७७५६४० सर्वोत्कृष्ट सजावट व आकर्षक सेल्फी सादर करणाऱ्या स्पर्धकांना आकर्षक बक्षिसे व प्रमाणपत्रे प्रदान करण्यात येणार आहेत.

> **नागरिकांनी स्पर्धेत सहभागी व्हावे**
> आपण सगळे मिळून उत्सव आनंदाने साजरा करावा. परंपरा जपावी आणि नवीन पिढीला संस्कारांची देणगी द्यावी, हाच आमचा प्रयत्न आहे. त्यामुळे नागरिकांनी मोठ्या संख्येने या स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन माजी महापौर बाबासाहेब वाकळे व माजी उपमहापौर अनिल बोरुडे यांनी केले.

# ‘तू बुद्धी दे, तू तेज दे’

### मनोयात्रींचे गणरायाला साकडे



**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : गणेशोत्सव साजरा करणाऱ्या स्नेह मनोयात्री प्रकल्पातील मनोयात्रींनी गणरायाला मनोबलासाठी अनोख्या पद्धतीने साकडे घातले.

पर्यावरण पूरक गणेशोत्सव साजरा करण्याची शपथ घेत स्नेहालय संस्थेच्या हिम्मतग्राम आणि मानसग्राम प्रकल्पात त्यांनी वृक्ष लागवड केली. तसेच गोठ्यातील जनावरांशी भावनिक नाते जोडण्यासाठी त्यांच्या नित्यसेवेचा संकल्प केला.

भारतातील रस्त्यावर भटकणाऱ्या बेवारस मनोरुग्णांना मोफत उपचार, रोजगाराचे कौशल्य प्रशिक्षण देत त्यांच्याच कुटुंबात पुनर्घटन मनोयात्री प्रकल्पाद्वारे केले जाते. स्नेहालय संस्थेच्या मानस ग्राम प्रकल्पांतर्गत हे काम चालते. आजवर ८०० रुग्णांचे यशस्वी कौटुंबिक पुनर्वसन करणाऱ्या या संस्थेत सध्या भारत-बांगलादेश इ ठिकाणचे ५७ निवासी रुग्ण आहेत.

उत्सवासाठी गणपती मंडप सजावट, रांगोळी, गणपती पूजा, विविध स्पर्धा, स्वच्छता हे सर्व मनोयात्री लाभार्थींनी स्वतःच केले. यानिमित्ताने प्रकल्पात पुढील दहा दिवस संगीत खुर्ची, लिंबू चमचा, संगीताचे कार्यक्रम, नृत्य, गायन, भजन, वादन, अशा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.

गणपती मंडप सजावटीसाठी निसर्गमय वातावरण येण्यास मातीचा डोंगर उभा करण्यात आला. तेथे हिरवळ विकसित करण्यात आली. गणरायासाठी झाडांच्या पानातून मनोयात्रींनी कल्पकतेने हार बनवले. फुलांची सजावट करण्यात आली. गणपतीच्या समोर आणि परिसरात सुंदर रांगोळी रुग्णांनी काढल्या. या उपक्रमात समीक्षा पवार, निकिता फुंडे, सोनाली साळवे, भारत तिडके, सोनू शहा, परी सूर्यवंशी, वेणू आंग्रे आणि समन्वयक रमाकांत डोड्डी आदींनी विशेष मेहनत घेतली.

### ‘क्षत्रिय सोनार’च्या गणपतीची उत्साहात स्थापना

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : सालाबादप्रमाणे या वर्षी श्री मैढ़ क्षत्रिय सोनार समाज,अहिल्यानगर यांच्या श्री गणरायांचे आगमन मोठ्या नवीपेठ येथील कार्यालयात उत्साहात झाले व गणेशाची स्थापना करण्यात आली.

यावेळी श्री मैढ़ क्षत्रिय सोनार समाज युवा मंच अध्यक्ष व भाजपा शहर जिला उपाध्यक्ष गोपाल वर्मा व मैढ़ क्षत्रिय युवा मंच उपाध्यक्ष शुभम मिरांडे, अमित जवडा, अमरजी खळबळीया, कन्हैयालाल धुप्पड, सागर मिरांडे, किशोर भोमा, शिवम वर्मा यांनी महाप्रसादचे उपक्रम राबवले.

# ॲड. धनंजय जाधव यांचे कार्य कौतुकास्पद

## शालिनीताई विखे पाटील; संगीतमय श्रीसाई चरित्र कथेचा उत्साहात समारोप

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : हभप समाधान महाराज शर्मा यांच्या मधुर वाणीतून साक्षात साईबाबांचे दर्शन घडण्याचे काम अहिल्यानगर वासियांना झाले आहे. संतांमध्येच देव पाहिले पाहिजे. संतांच्या विचाराशिवाय दुसरा कुठलाही पर्याय नाही. साईबाबा यांनी समाजामध्ये केलेल्या कार्याचा आदर्श आपण सर्वांनी घ्यावा. जेव्हा आपल्याला दुसऱ्याचे चांगले करता आले नाही, तरी चालेल पण आपण दुसऱ्यांचा वाईट करू नका. तसेच ॲड. धनंजय जाधव यांनी साईकथेद्वारे समाजात श्रद्धा, सबुरी आणि भक्तीचे वातावरण निर्माण केले आहे. त्यामुळे त्याचे कार्य कौतुकास्पद असल्याचे प्रतिपादन जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील यांनी केले.

या साईबाबांच्याच जीवनावर आधारित संगीतमय श्री साई चरित्र कथा साई द्वारका सेवा ट्रस्ट, साईदास परिवार आणि ॲड. धनंजय जाधव मित्र मंडळ यांच्या वतीने आयोजित करण्यात आली होती. यावेळी त्या बोलत होत्या.

समाधान महाराज शर्मा म्हणाले की, साईबाबा हे संत नव्हे तर सर्व भक्तांचे खरे आधार आहेत. त्यांनी आपल्या जीवनातून आधी करून दाखवले आणि मगच समाजाला सांगितले. गोरगरीबांना प्रसाद दिल्याशिवाय त्यांनी कधीच भोजन घेतले नाही. त्यांची उदी आजही भक्तांचे दुःख हरते.



श्रद्धा आणि सबुरी हेच बाबांचे मूलमंत्र आहेत. संतांमध्येच देव पाहिला पाहिजे, हा विचार प्रत्येकाने मनामध्ये दृढ करावा.

शालिनीताई विखे पाटील म्हणाल्या की, धार्मिक कार्यक्रमांच्या माध्यमातून समाजात एकोपा, एकजुट आणि सकारात्मक विचार निर्माण होतो. साईबाबांच्या जीवनावर आधारित कथा ही केवळ भक्तीसाठी नाही, तर ती प्रत्येकाच्या जीवनाला दिशा देणारी आहे. ॲड. धनंजय जाधव यांनी साईकथेद्वारे समाजात श्रद्धा, सबुरी आणि भक्तीचे वातावरण निर्माण केले आहे. त्यांच्या अथक प्रयत्नांमुळे आज नगरमध्ये भक्ती आणि धार्मिकतेचा उत्साह उंचावला आहे. समाजातील तरुणाईसाठी हा एक प्रेरणादायी संदेश आहे.

यावेळी शालिनीताई विखे पाटील, राजाभाऊ कोठारी, अशोक महाराज जाधव, भाजप शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, उद्योजक गौरव फिरोदिया, आयोजक ॲड. धनंजय जाधव, अनिलभाऊ बोरुडे, निखिल वारे, संजय ढोणे, गणेश कवडे, अनिल ढवण, बाळाराम महाडकर, दिनानाथ जाधव, प्रसाद गुरु, पोपटराव कुलकर्णी, बाळासाहेब भुजबळ, ज्ञानेश्वर काळे, शशांक कुलकर्णी, अमोल निस्ताने, करण डापसे, चैतन्य जाधव, सोमनाथ जाधव, स्वप्निल दगडे, अमित महाराज धाडगे, राहुल मुथा, मितेश शहा, पुरुषोत्तम सब्बन, ज्ञानेश्वर दौंडकर, स्वप्निल अंकम, अशोक फलके, विशाल माने, सचिन कांबळे आदी मान्यवर उपस्थित होते.

> साईबाबांवरील श्रद्धेमुळेच एवढ्या मोठ्या प्रमाणात भाविक उपस्थित राहून साईकथेचा लाभ घेत आहेत. भक्तांचा हा प्रतिसाद माझ्यासाठी आशीर्वाद आहे. याच ऊर्जेतून पुढील वर्षी शिवकथेचे आयोजन करून समाजापुढे संतांचे विचार पोहोचवण्याचा संकल्प केला आहे.
> **– ॲड. धनंजय जाधव**

# गणेशोत्सव हे आनंदाचे पर्व अन् निसर्गाशी नाते सांगणारे : थोरात

## गणेशोत्सवात डीजे व लेझर किरणांचा वापर टाळा : पर्यावरण पूरक गणेश उत्सव साजरा करा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : गणेश उत्सव हा आनंदाचा व श्रद्धेचा विषय आहे. हा सणांचा काळ आनंदाचे पर्व असून या काळात आरोग्याची हानी होणार नाही याकरता डीजे, लेझर किरण व गुलालाचा वापर टाळून पर्यावरण पूरक गणेशोत्सव साजरा करा असे आवाहन काँग्रेस पक्षाचे वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी केले आहे.

मा.आ.डॉ.सुधीर तांबे यांच्या प्रभा निवासस्थानी गणेशाची आरती करण्यात आली. यावेळी समवेत सौ. कांचनताई थोरात, मा.आ.डॉ.सुधीर तांबे, सौ.दुर्गाताई तांबे, आमदार सत्यजित तांबे, डॉ. मैथिलीताई तांबे, डॉ.वर्षा तांबे,विजय राहणे, शरद बटवाल,बाबासाहेब कडनर, नितीन अभंग, ज्ञानेश्वर राक्षे यांच्यासह संगमनेर शहरातील कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बोलताना मा.मंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले की, महात्मा ज्योतिबा फुले



यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांची समाधी शोधून काढली. आणि त्यानंतर महाराष्ट्रात शिवजयंती उत्सव आणि गणेश उत्सव सुरू झाले. सर्वांनी एकत्र येऊन हे उत्सव आनंदाने साजरे करायचे आहे. खरे तर हे आनंदाचे पर्व आहे. गणेश उत्सव हा श्रद्धेचा आणि आनंदाचा विषय आहे.

मात्र या काळामध्ये आरोग्याची हानी होणार नाही ही काळजी प्रत्येकाने घेतली पाहिजे. विशेषता डीजेचे आवाजाने मोठ्या प्रमाणात शरीराचे नुकसान होते. त्याचप्रमाणे लेझर किरणांनी डोळ्यांचे नुकसान होते. गुलालने फुफुसाला त्रास होतो. त्यामुळे तरुणांनी यांचा वापर टाळला पाहिजे. गणेश उत्सव हे निसर्गाशी नाते सांगणारा उत्सव आहे. त्यामुळे आपण आनंद साजरा करताना पर्यावरण पूरक गणेश उत्सव कसा होईल ही काळजी घ्यावी.

याचबरोबर या आनंद काळामध्ये नदीला मोठा पूर आल्याने नदीकाठी नागरिकांनी अधिक सतर्कता बाळगावी असे आवाहन त्यांनी केले. तर मा.आ. डॉ.तांबे म्हणाले की, सर्वांनी एकत्र येऊन हा उत्सव साजरा करायचा आहे. यामध्ये लहान थोर गरीब श्रीमंत असा कोणताही भेद नाही. एकत्र येण्याची ही मोठे माध्यम असून सर्व धर्म समभाव जोपासण्याची परंपरा गणेशोत्सवाच्या काळामध्ये सर्वांनी जोपासली पाहिजे.याचबरोबर आनंद साजरा करताना युवकांनी अति उत्साह टाळा असे आवाहनही त्यांनी केले आहे.

याप्रसंगी आमदार सत्यजित तांबे व डॉ.मैथिलीताई तांबे यांनी सर्वांचे स्वागत केले. यावेळी शहरातील कार्यकर्ते युवक व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# आश्वी मंडळ भाजप सचिवपदी अशोक गीते

## प्रत्येक मतदारापर्यंत भाजपाचा संदेश पोहोचवू : अशोक गीते

**जनता आवाज वृत्तसेवा**

**आश्वी** : आश्वी मंडळातील प्रत्येक गावात जाऊन पक्षाचा ध्वज फडकवू. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये भाजप उमेदवारांना विजयी करून विकासाचा महामार्ग खुला करणे हेच माझे ध्येय आहे.

मोदीजींच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकार आणि राज्यातील विकासाभिमुख धोरणे प्रत्येक मतदारापर्यंत पोहोचवण्यासाठी मी स्वतः प्रचाराच्या आघाडीवर असेन, असे प्रतिपादन भाजपाचे आश्वी मंडळ सचिव अशोक रमेश गीते यांनी केले. पिंप्रीलौकी अजमपूर (ता. संगमनेर) येथील उच्च शिक्षित शिक्षक व कार्यतत्पर



युवा नेता अशोक गीते यांची आश्वी मंडळ भारतीय जनता पक्षाच्या सचिवपदी निवड झाल्याने कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे.

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी भाजपाची मोहीम आता गावोगावी जोमाने राबवली जाणार आहे. अशोक गीते हे गेल्या अनेक वर्षांपासून आश्वी मंडळ भाजप तसेच आश्वी गट व आश्वी खुर्द गणामध्ये सक्रीय आहेत. युवकांना पक्षाशी जोडणे, विकासकामे लोकांपर्यंत पोहोचवणे आणि संघटनेची पायाभरणी मजबूत करण्यासाठी त्यांचे योगदान लक्षणीय आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली गावोगावी कमळ फुलवू हा संकल्प कार्यकर्त्यांनी व्यक्त केला आहे.

या निवडीबद्दल जलसंपदा मंत्री व पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील, विखे सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील, माजी मंत्री आण्णासाहेब म्हस्के पाटील, माजी जिल्हा परिषद अध्यक्षा शालिनी ताई विखे पाटील, ज्येष्ठ नेते प्रा. कान्हू गीते, उपसरपंच बाजीराव गिते न्याय डेअरीचे संस्थापक युवा उद्योजक सागर गिते,साहेबराव लावरे, रामदास दातीर यांनी अभिनंदन केले.

# राजे छत्रपती युवा प्रतिष्ठानचे कार्य पारदर्शी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी फॅक्टरी** : जिथे महिलांची संख्या चांगली असते, त्या मंडळाचे काम अधिक शिस्तबद्ध, पारदर्शक आणि प्रभावी असते. धार्मिक कार्यक्रमच नव्हे तर सामाजिक, शैक्षणिक व आरोग्यविषयक उपक्रमांतही राजे छत्रपती युवा प्रतिष्ठानचे कार्य इतरांना प्रेरणादायी असल्याचे प्रतिपादन श्रीरामपूर विभागाचे अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांनी केले.



राहुरी फॅक्टरी येथील राजे छत्रपती युवा प्रतिष्ठानच्या गणपती बाप्पाची अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे, संत कवी महिपती महाराज देवस्थानचे मठाधिपती महंत अर्जुन महाराज तनपुरे, पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या उपस्थितीत प्रतिष्ठापणा करण्यात आली.प्रसंगी श्री.वाघचौरे बोलत होते.प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज स्मारक ते ताहाराबाद चौक अशी भव्य दिव्य मिरवणूक काढण्यात आली. त्यानंतर सचिन काळे गुरू यांच्या वेदमंत्र गजरात गणपती बाप्पाची स्थापना करण्यात आली.

यावेळी पोलीस कॉन्स्टेबल अशोक शिंदे, बाबासाहेब शेळके, प्रवीण बागुल, गोविंद राऊत, नितीन भालेराव आदिंसह परिसरातील नागरिक व माता भगिनी व राजे छत्रपती युवा प्रतिष्ठान पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. पुढे बोलताना अप्पर पोलीस अधीक्षक वाघचौरे म्हणाले की, गणेश मंडळांनी नियमांचे पालन करावे. रात्री १० वाजेनंतर ध्वनीवर्धकांचा वापर टाळावा, विसर्जन मिरवणुका निर्धारित मार्गांवरच काढाव्यात आणि कोणत्याही प्रकारचा गोंधळ किंवा अनुचित प्रकार टाळावा. सामाजिक माध्यमांवर कोणतीही अफवा पसरवू नका, अशा गोष्टी दिसल्यास तात्काळ पोलीस नियंत्रण कक्षाशी संपर्क साधा.

पोलिस प्रशासन आपल्या सेवेसाठी सदैव तत्पर असून, नागरिकांनी सहकार्य केल्यास हा उत्सव अधिक सुंदरपणे पार पडेल, असा विश्वास व्यक्त केला.

# प्रवरेच्या ११ विद्यार्थ्यांची 'मॅकलाईड'मध्ये निवड

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी** : लोकनेते पद्मभूषण डॉ.बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेअंतर्गत लोणी येथील प्रवरा कृषी शास्त्र संस्थेतील कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयातील अकरा विद्यार्थ्यांची मॅकलाईड फार्मास्यूटीकल्स प्रा. लि .मुंबई मध्ये नुकत्याच झालेल्या परिसर मुलाखतीमध्ये निवड झाली असल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ निलेश दळे यांनी दिली आहे. या अकरा विद्यार्थ्यांमध्ये वृषाली उबाळे, प्रतिभा धोंनार,वैभव डोळे,ऋषिकेश गवळी, साहील गायकवाड,अनिकेत गायकवाड, गौरव पुंडे , गोपाळ परिहार, योगेश आव्हाड,तेजस साखरे,विखे सौरभ इत्यादीचा समावेश आहे. या सर्व विद्यार्थ्यांचा प्रवरा कृषि शास्त्र संस्थेचे संचालक प्रा डॉ उत्तमराव कदम यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला आहे. यावेळी कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ निलेश दळे व इतर प्राध्यापक उपस्थित होते. महाविद्यालयीन जीवनात विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी प्रवरा कृषी शास्त्र संस्था विविध उपक्रम राबवत असते. त्यामध्ये व्यक्तिमत्व विकास कार्यशाळा, मान्यवर व्यक्ती मार्गदर्शन व्याख्याने, जैवतंत्रज्ञान आधारित औद्योगिक कंपनी भेटी , कार्यानुभव उपक्रम इ. उपक्रमाचा समावेश होतो. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष व जलसंपदा मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील, संस्थेचे विश्वस्त आण्णासाहेब म्हस्के,जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सौ.शालिनीताई विखे पाटील, डॉ विखे पाटील कारखान्याचे अध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील, संस्थेच्या मुख्य कार्यकरी अधिकारी डॉ. सुश्मिता विखे पाटील , अतिरिक्त मुख्य कार्यकरी अधिकारी डॉ.शिवानंद हिरेमठ, सहसचिव भारत घोगरे, प्रवरा कृषी शास्त्र संस्थेचे संचालक डॉ.उत्तमराव कदम आदींनी अभिनंदन केले आहे.

प्रवरा कृषी शास्त्र संस्थेचा विद्यार्थी हा केवळ शेती ज्ञान घेऊन नोकरी करणारा नव्हे तर नोकरीत देणारा ठरावा यासाठी मंत्री विखे पाटील आणि संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.सुस्मिता विखे पाटील यांच्या माध्यमातून विशेष प्रयत्न केले जातात. पुस्तकी ज्ञानाबरोबरच त्यांना प्रत्यक्ष कृतीतून शिक्षण मिळावे यासाठी कृषी क्षेत्रातील पायाभूत सुविधांवरती संस्थेने विशेष भर दिला आहे. यामुळे येथे शिकणारा विद्यार्थी हा विविध कौशल्य अवगत करून हायटेक शेती, मार्केटिंग, बाजारपेठ, नवीन तंत्रज्ञान आणि बदलता शेती व्यवसाय याची माहिती त्याला प्रत्यक्ष कृतीतून मिळते असे संचालक डॉ. उत्तमराव कदम यांनी सांगितले.

# निपाणी वडगाव ग्रामसभा अनेक प्रश्नांनी गाजली

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : श्रीरामपूर तालुक्यातील निपाणी वडगाव ग्रामपंचायतची कोरम अभावी विठ्ठलराव सोनवणे यांनी तहकूब केलेली ग्रामसभा मंगळवार, २६ ऑगस्ट रोजी पुन्हा घेण्यात आली. ग्रामपंचायत प्रांगणात झालेल्या या सभेला ग्रामस्थांची मोठ्या प्रमाणात लक्षणीय उपस्थिती लाभल्याने ग्रामसभेला विशेष महत्त्व प्राप्त झाले. सभेच्या प्रारंभी सरपंच सौ. सविता देवकर यांच्या अध्यक्षतेखाली दिवंगत तंटामुक्ती अध्यक्ष बाजीराव राऊत यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

त्यानंतर ग्रामसेवक प्रशांत दर्शने यांनी अजेंड्यावरील विषय मांडले. - ग्रामपंचायत सदस्य मुरलीधर राऊत यांनी मागील काळात झालेल्या भ्रष्टाचाराचा मुद्दा उपस्थित करत सत्ताधाऱ्यांना जाब विचारला. ग्रामस्थांनी कचराकुंडी,



निपाणी वडगाव ग्रामसभा यावेळी लोकप्रतिनिधी तसेच विविध संघटनेचे पदाधिकारी यांनी विकास कामे तसेच विविध कामावर प्रश्न उपस्थित केले यावर ग्रामविकास अधिकारी प्रशांत दर्शने व सरपंच सौ सविता देवकर यांनी समाधान कारक उत्तरे दिले तसेच जास्तीत जास्त संख्येने ग्रामस्थ पदाधिकारी उपस्थित असल्याने याबद्दल सरपंच सौ देवकर यांनी आभार व्यक्त केले.
**सरपंच सौ सविता योगेश देवकर, निपाणी वडगांव**

रस्ते, आरोग्य सुविधा अशा दैनंदिन समस्यांवर तुफान प्रश्नांचा पाऊस पाडला. माजी सरपंच वनिता राऊत यांनी आक्रमक भूमिका घेत चुकीच्या कामकाजावर थेट आरोप केले. त्यांच्या काळातील मागील एक वर्षापासून प्रलंबित असलेली स्ट्रीट लाईट कारागीर बिल, मजूर व वाहनधारकांची देणी जाणीवपूर्वक थांबवली जात असल्याचा स्पष्ट आरोप त्यांनी केला. ग्रामपंचायत सदस्य अक्षय राऊत यांनी वॉर्ड क्रमांक ३ मधील विकास कामांत राजकारण होत असल्याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली.

जय मल्हार सेनेचे तालुका अध्यक्ष संजय राऊत यांनी प्रशासन व पदाधिकारी हे जनतेचे सेवक असून मालकासारखे वागू नये, अन्यथा तीव्र संघर्ष उभारला जाईल, असा इशारा दिला. पाटीलबा राऊत यांनी गावातील पेविंग ब्लॉक रस्त्याच्या बोगस कामाची चौकशी करण्याची मागणी केली. दत्तात्रय जाधव यांनी अनेक ग्रामसभेची माहिती सर्वसामान्यांपर्यंत पोहोचत नसल्याबाबत प्रश्न उपस्थित केला.

# बेलापुरात रविवारी चित्रकला स्पर्धा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**बेलापूर** : गावकरी मंडळ व ग्रामस्थ बेलापूर बु –ऐनतपूर यांच्या वतीने गणेशोत्सवानिमित्त मुलांसाठी चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. रविवार (दि.३१)होणाऱ्या चिञकला स्पर्धा बेलापूर–ऐनतपूर येथील मुलांसाठी मर्यादित आहे.स्पर्धा दोन गटात होणार आहे. छोटा गट (इयत्ता १ली ते ४ थी)करिता मुक्त चित्र हा विषय आहे.यासाठी प्रथम क्रमांक रु. ११११ (श्रेया मोटर्स,श्रीरामपूर रोड) द्वितीय क्रमांक रु. ७७७ (शुभम जनरल व झेरॉक्स)तर तृतिय क्रमांक:–रुपये ५५५ (गुरुकृपा फोटो स्टुडीओ.)याप्रमाणे बक्षिसे असतील.

मोठा गट (इयत्ता ५ वी ते १० वी.) करिता माझे आवडते व्यक्तीमत्व, ऐतिहासिक किंवा पौराणिक प्रसंग, ऑपरेशन सिंदूर असे विषय आहेत.या गटासाठी प्रथम क्रमांक रु. २२२२ (भागवत प्रतिष्ठान,बेलापूर बु.) द्वितीय क्रमांक:–रुपये ११११ (श्री. रामेश्वर सोमाणी, व्हा चेअरमन, गावकरी पतसंस्था, .) तरतृतीय क्रमांक रु. ७७७ (विशाल मंडप डेकोरेटर्स.)याप्रमाणे बक्षिसे देण्यात येतील.

चित्र काढण्यासाठी कागद संयोजकांकडून देण्यात येईल. स्पर्धकांना चित्र स्पर्धेच्या दिवशी निर्धारित वेळेतच काढून पूर्ण करावे लागेल. चित्र काढण्यासाठी व रंगविण्यासाठी लागणारे साहित्य स्पर्धकांनी आणावे. स्पर्धकांनी रविवार दिनांक ३१ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ८.३० वाजे पर्यंत संत सावता मंदिर(अरुणकुमार वैद्य पथ)या ठिकाणी उपस्थित राहावे. स्पर्धकांनी आपली नावे प्रमोद जनरल स्टोअर्स, मेनरोड, बेलापूर बु (श्री. हेमंत मुथ्था मो. ८८३०८४८०९०) सुदर्शन सुपर शॉपी, मेनरोड, बेलापूर बु (श्री. सुधीर करवा, मो.९०११७९४४९८)व महावीर शॉपी जनरल स्टोअर्स, मेनरोड, बेलापूर बु (श्री. संतोष ताथेड, मो.८७९३६३७२६३)येथे नोंदवावीत जास्तीत जास्त विद्यार्थी व विद्यार्थिनींनी स्पर्धेत सहभागी व्हावे असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

# ओलंपियाड परीक्षेमध्ये अस्मिता टकले तर ज्ञानदा शेंडे शिष्यवृत्तीसाठी पात्र

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीगोंदा** : रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर विद्या प्रबोधिनी अंतर्गत आठ फेब्रुवारी २०२५ रोजी घेण्यात आलेल्या रयत ओलंपियाड परीक्षेमध्ये विद्यालयातील अस्मिता टकले आणि ज्ञानदा शिंदे यांनी उल्लेखनीय यश मिळविले

अभ्यासातील सातत्य आणि जिद्द या जोरावर या विद्यार्थिनींनी विद्यालयास हे उल्लेखनीय यश मिळवून दिले आहे आणि विद्यालयाचे नाव उज्वल केले आहे .या परीक्षेसाठी पूर्ण संस्थेमधून हजारो विद्यार्थी भाग घेतात.



या सर्वांमध्ये अस्मिता टकले हिने९३.०७ आणि ज्ञानदा शेंडे हिने ९१.०५ गुण मिळवून गुणवत्ता यादीत अकरावे आणि तेरावे स्थान संपूर्ण संस्थेत मिळविले ,या दोन्ही विद्यार्थिनी इयत्ता दहावी मध्ये शिक्षण घेत आहे .

या यशाबद्दल विद्यार्थिनींचे मुख्याध्यापिका श्रीम. वर्षा भोईटे, उपमुख्याध्यापिका श्रीम. निलीमा कातोरे , पर्यवेक्षक बाळासाहेब शिंदे गुरुकुल प्रमुख श्री. किरण शिंदे ,उत्तर विभागीय अधिकारी मा. श्री.नवनाथ बोडके साहेब , शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष आणि सर्व सदस्य, विभाग प्रमुख, मार्गदर्शक शिक्षक व सर्व शिक्षक वृंद यांनी अभिनंदन केले.

# जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास ६ महिन्यांची मुदतवाढ

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात प्रवेश घेतलेल्या एसईबीसी आणि ओबीसी प्रवर्गातील उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी, प्रवेशासाठी अर्ज केल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांची मुदत देण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने हा निर्णय जाहीर केला असून, सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाकरिता आरक्षण अधिनियम, २०२४ (सन २०२४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६) राज्यात लागू झाल्यामुळे अनेक विद्यार्थ्यांकडे जात वैधता प्रमाणपत्रे उपलब्ध नाहीत.

या कायद्यानुसार एसईबीसी प्रवर्गाला शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशात १० टक्के आरक्षण मिळाले आहे. तसेच, न्या. शिंदे समितीच्या शिफारशीनुसार मराठा समाजातील काही विद्यार्थ्यांना कुणबी, कुणबी-मराठा किंवा मराठा-कुणबी (ओबीसी) जातीची प्रमाणपत्रे मिळत आहेत. ही प्रक्रिया अजूनही सुरू असल्याने विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्रे मिळालेली नाहीत. अशा विद्यार्थ्यांना प्रवेशापासून वंचित राहावे लागू नये यासाठी ही मुदतवाढ देण्यात आली आहे. ही मुदतवाढ अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांना लागू आहे. अर्जदारांनी जात पडताळणी समितीने कार्यालयाने कळविलेल्या कागदपत्रांची पूर्तता करावी, जेणेकरून समितीस विद्यार्थ्यांचे जात दावा विषयक प्रकरणावर विहित कालावधी निर्णय घेता येईल.

महाविद्यालयांनी देखील शासन निर्णयाच्या सूचनांचे पालन करून विद्यार्थ्यांना जात पडताळणी प्रमाणपत्र जमा करण्या साठी मुभा द्यावी, त्यांना तात्काळ प्रमाणपत्र दाखल करण्याबाबत तगादा लावू नये. शासन निर्णयात दिलेल्या सहा महिन्याच्या मुदतीत विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक असेल. त्यामुळे विद्यार्थ्यांनी व महाविद्यालयांनी शासन निर्णयातील सूचना प्रमाणे कार्यवाही करावी, असे आवाहन जिल्हा जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी समितीच्यावतीने करण्यात आले आहे.

# शुक्रवारी संगमनेरमध्ये पारंपारिक वादकांचा महामेळा व महावादन

## आ. सत्यजित तांबे यांच्या संकल्पनेतून महावादनाचा भव्य मेळावा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली वैभवशाली ठरलेल्या संगमनेर शहर व तालुक्यात सातत्याने विविध उपक्रमांचे आयोजन होत असून आय लव संगमनेर या चळवळीच्या माध्यमातून तालुक्यातील स्थानिक कलाकारांच्या कलागुणांना उस्फूर्त प्रतिसाद मिळावा याकरता शुक्रवार दिनांक २९ ऑगस्ट २०२५ रोजी सायंकाळी ६ ते १० या वेळेत संगमनेर बस स्थानकासमोर भव्य पारंपारिक वादकांचा महामेळा व महावादनाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती आयोजक आमदार सत्यजित तांबे यांनी दिली आहे.





या अभिनव महावादन बाबत अधिक माहिती देताना आ. सत्यजित तांबे म्हणाले की, संगमनेर तालुक्याला मोठी सांस्कृतिक आणि ऐतिहासिक परंपरा लाभली आहे. शहरातील अनेक मंडळांनी वादन ग्रुप स्थापन केले असून राज्यभरात त्यांचा नावलौकिक झाला आहे. राज्यात सध्या गणेशोत्सवाच्या आनंदाचे पर्व सुरू आहे. या अनुषंगाने या संगमनेर शहरातील गणेश उत्सवाची शोभा वाढावी व स्थानिक कलाकारांच्या कलागुणांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळावा याकरता आय लव संगमनेर या संस्थेच्या माध्यमातून संगमनेर मधील विविध वादन ग्रुपचे भव्य महावादन व महामेळावा होणार आहे.

### संगमनेरच्या सांस्कृतिक क्षेत्राला मोठे व्यासपीठ

संगमनेर मधील अनेक गुणी कलावंत असून ढोल पथकाच्या माध्यमातून राज्यभर ते काम करत आहेत. या विविध पथकांमधील कलाकारांना स्थानिक पातळीवर मोठी संधी मिळावी या उद्देशाने आमदार सत्यजित तांबे यांच्या संकल्पनेतून महावादन मेळावा होत असून संगमनेर मध्ये प्रथमच होत असलेला हा महावादन मेळावा राज्यासाठी मार्गदर्शक ठरणार असल्याचे डॉ. मैथिलीताई ताई तांबे यांनी म्हटले आहे.

शुक्रवारी सायंकाळी संगमनेर बस स्थानका समोर ६ ते १० या वेळेमध्ये संगमनेर शहरातील तांडव, हिंदू राजा, छावा, एकलव्य, रुद्र, हे ढोल पथक व झांजरी पथक सहभागी होणार असून यामधील सुमारे ३५० कलाकारांच्या सहभागांमध्ये हे महावादन होणार आहे. यावेळी काँग्रेस पक्षाचे वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरात, मा आमदार डॉ. सुधीर तांबे, सौ दुर्गाताई तांबे,डॉ. जयश्रीताई थोरात, डॉ. मैथिलीताई तांबे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित राहणार आहेत. तरी आय लव संगमनेर या चळवळीमार्फत होणाऱ्या वादकांचा महामेळा व महावादन कार्यक्रमासाठी शहरातील नागरिक युवक व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन आय लव संगमनेर, ही सामाजिक संस्था आणि तांडव, हिंदू राजा, रुद्र, छावा व एकलव्य, ढोल पथकाच्या वतीने करण्यात आले आहे.

या महावादन मेळाव्याच्या जय्यत तयारीसाठी संगमनेर मधील विविध कार्यकर्ते विशेष परिश्रम घेत आहेत.

प्रो.फी.जमा.रु.
पान नं.
चौ.अ.नं. ५०/२०२५

**सायटेशन नोटीस**

दि. २८/०८/२०२५

पाथर्डी येथील तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी पाथर्डी यांचे कोर्टात

अर्जदार

श्री. परशुराम प्रभाकर घोडके रा शिरसाटवाडी ता. पाथर्डी जि. अहिल्यानगर सामनेवाला

ग्रामपंचायत कार्यालय शिरसाटवाडी, ता. पाथर्डी जि. अहिल्यानगर

सदर अर्जदार हा मौजे शिरसाटवाडी ता. पाथर्डी जि. अहिल्यानगर रहिवाशी आहेत. सदर अर्जदार यांची मुलगी रेणुका हिचा जन्म मौजे शिरसाटवाडी ता. पाथर्डी जि. अहमदनगर येथे दिनांक २०/१२/२०१९ रोजी झालेला आहे. त्यानंतर जन्म नोंदणीबाबत ग्रामपंचायत कार्यालय शिरसाटवाडी येथे कळविले होते. परंतु ग्रामपंचायत कार्यालय शिरसाटवाडी यांचे कार्यालयात जन्म नोंदणी रजिस्टरला नोंद करण्याचे राहुन गेलेले आहे. त्यामुळे अर्जदारास त्याचे मुलाचे जन्म नोंदणी प्रमाणपत्र (जन्म दिनांक नोंदणी दाखला) मिळु शकत नाही. त्यामुळे सदर अर्जदारास शासकीय योजने कामी तसेच वेगवेगळ्या ठिकाणी अडचणींना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे अर्जदारास त्यांचे मुलीची जन्म दिनांकाची नोंद ग्रामपंचायत कार्यालय शिरसाटवाडी ता. पाथर्डी येथील जन्म नोंदणी रजिस्टरला नोंद घेवुन तसा दाखला मिळणे न्यायाचे व गरजेचे आहे. सदरचा दाखला हा शासकीय कामासाठी आवश्यक आहे.

सदर अर्जदार यांनी ग्रामपंचायत शिरसाटवाडी ता. पाथर्डी येथे जावुन जन्म प्रमाणपत्राबाबत मागणी केली असता जन्माची नोंद नसल्याने त्या कार्यालयात जन्माची नोंद नसलेवावत दिनांक २७/०६/२०२५ रोजीचा दाखला सदर अर्जदारास देण्यात आलेला आहे.

जन्माच्या १ वर्षाच्या आत मध्ये जन्म नोंदणी न झाल्यास केवळ तालुका दंडाधिकारी यांच्या आदेशानेच नोंद घेता येवु शकते अशी माहिती अर्जदारास ग्रामपंचायत कार्यालय शिरसाटवाडी ता. पाथर्डी येथे देण्यात आलेली आहे. अशा परिस्थितीमध्ये सदर अर्जदार यांचे वडीलांचे जन्म नोंद जन्म रजिस्टरला होणे न्यायच्या व जरुरीचे आहे. त्याकरिता योग्य तो आदेश मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने मे. कोर्टात दाखल केलेला आहे. त्यापेक्षा सदरहु अर्जदाराचे सदरहु जन्म नोंदीबाबत कोणास काही एक म्हणावयाचे असेल तर हया जाहीर नोटीसीच्या तारखेपासून १५ दिवसांचे आत दिनांक ११/०९/२०२५ पुर्वी त्याने या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्या तर सदरहून कोर्ट अर्जदार यांचे हक्कावदल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिल्यास जन्म नोंद घेणेबाबत आदेश करतील.

आज दिनांक २८/०८/२०२५ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी नोटीस दिले असे हुकुमावरुन.

शिक्का

**तहसिलदार तथा**
**तालुका दंडाधिकारी पाथर्डी**

## संपादकीय

### उपासमारीचे तीव्र संकट

जगातील २६ संकटग्रस्त भागात पाच वर्षांखालील सुमारे ३८ दशलक्ष मुले गंभीर कुपोषित असल्याचे अलिकडे आढळून आले आहे. गाझा, माली, सुदान आणि येमेनसारख्या भागात ही परिस्थिती सर्वात चिंताजनक आहे. सुदानमध्ये दुष्काळाची परिस्थिती निश्चित झाली आहे. २०२० नंतर पहिल्यांदाच जगात कुठे ना कुठे दुष्काळ जाहीर करावा लागत आहे. अहवालात असेही म्हटले आहे की, सक्तीने विस्थापन केल्याने उपासमारीचे संकट वाढत आहे. १२८ दशलक्ष विस्थापित लोकांपैकी ९५ दशलक्ष लोक अन्नसंकटाचा सामना करणाऱ्या देशांमध्ये राहत आहेत. त्यात काँगोचे लोकशाही प्रजासत्ताक, कोलंबिया, सुदान आणि सीरियासारखे देश समाविष्ट आहेत. संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस अँटोनियो गुटेरेस यांनी या अहवालाचे वर्णन जगाच्या 'निष्क्रियतेचा आरसा' असे केले आहे. त्यांच्या मते हे केवळ व्यवस्थेचे नाही, तर मानवतेचे अपयश आहे. एकविसाव्या शतकात उपासमार स्वीकारता येणार नाही. आपण रिकाम्या हातांनी आणि पाठ फिरवून रिकाम्या पोटी प्रतिसाद देऊ शकत नाही. अहवालात वाढत्या अन्नसंकटाची कारणेदेखील अधोरेखित केली आहेत. अहवालानुसार वीस देशांमध्ये सुमारे १४० दशलक्ष लोक युद्ध आणि हिंसाचारामुळे उपासमारीचे बळी आहेत. गाझा, हैती, माली आणि दक्षिण सुदानमध्ये परिस्थिती खूप चिंताजनक आहे. आर्थिक संकटामुळे परिस्थिती आणखी बिकट होत आहे. महागाई आणि चलन घसरणीसारख्या आर्थिक धक्क्यांमुळे १५ देशांमधील ५९.४ दशलक्ष लोक संकटात सापडले आहेत. हवामानाचा परिणाम देखील लोकांना त्रास देत आहे. अन्न आणि पोषण मदतीसाठी आंतरराष्ट्रीय निधीमध्ये आतापर्यंतची सर्वात मोठी घट दिसून येत आहे. अन्नसंकट आणि कुपोषणाची गंभीर परिस्थिती विक्रमी पातळीवर पोहोचली आहे; परंतु दुसरीकडे जागतिक मदत आणि राजकीय इच्छाशक्ती कमी होत आहे.

जगातील सुमारे अर्धी कुपोषित मुले भारतात आहेत. चांगल्या भविष्यासाठी ती संघर्ष करत आहेत. अहवालानुसार भूक आणि कुपोषणाचे वाढते संकट रोखण्यासाठी आता ठोस पावले उचलून प्रभावी आणि ठोस पुराव्यांवर आधारित असा एक नवीन मार्ग आखणे आवश्यक आहे. याचा अर्थ असा की संसाधने एकत्रित केली पाहिजेत. प्रभावी असलेल्या योजना मोठ्या प्रमाणावर अंमलात आणल्या पाहिजेत आणि प्रभावित समुदायांच्या गरजा आणि आवाजांना प्रत्येक टप्प्यावर प्राधान्य दिले पाहिजे. आजही अनेक कारणांमुळे आपल्या देशात शेतीला उद्योगाच्या दर्जापासून दूर ठेवण्यात आले आहे. हे स्पष्ट आहे की उद्योगांना दिल्या जाणाऱ्या सर्व सरकारी सुविधांपासून शेती वंचित आहे. आपली सरकारे वर्षानुवर्षे या पैलूकडे दुर्लक्ष करत असून शेती हा तोट्याचा व्यवहार बनला आहे. शेती हा सरकारी अजेंड्यामध्ये प्राथमिक मुद्दा का असू नये, असा प्रश्न उपस्थित केला जातो. उपासमारीशी संबंधित संयुक्त राष्ट्रांच्या वार्षिक अहवालात म्हटले आहे की भारतीय हे जगातील सर्वात जास्त भुकेले लोक आहेत. संयुक्त राष्ट्रांच्या अन्न आणि कृषी संघटनेच्या सर्वेक्षण अहवालात भारताला 'जगातील उपासमारीची राजधानी' घोषित करण्यात आले आहे. अन्नधान्य उत्पादनात विक्रमी पातळीवर स्वयंपूर्ण असूनही उपासमारीने ग्रस्त भारतीयांची संख्या चीनमधील अशा लोकसंख्येपेक्षा जास्त आहे, ही आपल्यासाठी शरमेची बाब आहे. आज देशात लाखो टन अन्नधान्य वाया जाते आणि अन्नधान्याची कमतरता कायम राहते. एकीकडे, देशातील अन्नटंचाईवर मात करण्यासाठी भारत सरकारला आयातीवरील अवलंबित्व वाढवावे लागत आहे. दुसरीकडे, भारतीय अन्न महामंडळाच्या (एफसीआय) गोदामांमध्ये खराब होणाऱ्या अन्नधान्याचे प्रमाणही विक्रमी पातळीवर वाढत आहे..

आज अनेक कारणांमुळे शेती नफा न मिळवणाऱ्या व्यवसायात बदलत आहे. शेतकऱ्यांच्या उत्पादनाला योग्य किंमत मिळत नाही. इतकी की, त्यांना खर्च वसूल करणेदेखील कठीण होत आहे. त्याशिवाय, त्यांच्या डोक्यावर कर्जाचा मोठा बोजा आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना आत्महत्या करण्यास भाग पाडले जात आहे. मध्य प्रदेश, महाराष्ट्र, आंध्र प्रदेश आणि गुजरातसह अनेक राज्ये शेतकरी आंदोलने आणि शेतकरी आत्महत्यांचा सामना करत आहेत. राज्य सरकारे शेतीमाल खरेदी करण्याचे नाटक करत असतानाही असहाय्य दिसत आहेत. एकीकडे शेतकऱ्यांच्या समस्या वाढत आहेत, तर दुसरीकडे शेती तोट्यात चालली आहे. निषेध करणाऱ्या शेतकऱ्यांवर गोळीबार होऊनही त्यांना काहीही मिळत नाही. डॉ. स्वामिनाथन समितीने सरकारकडे शिफारस केली आहे की शेतकऱ्यांना त्यांच्या पिकांच्या किमतीच्या दीडपट हमीभाव द्यावा. देशाचा अन्नदाता आपल्या शेतात कठोर परिश्रम करून अन्नधान्याचे उत्पादन करतो; पण त्याला हमीभाव मिळत नाही किंवा योग्य साठवणुकीची सुविधा मिळत नाही. आजही अनेक कारणांमुळे, आपल्या देशातील शेतीला उद्योगाच्या दर्जापासून दूर ठेवण्यात आले आहे. जागतिक लोकसंख्येत जशी भर पडत आहे, तशी शेतीखालील जमीन कमी होत आहे. पायाभूत सुविधा, इमारती आदींसाठी जमिनींचा वापर वाढत असताना दुसरीकडे जागतिक हवामानबदलाचा शेतीवर प्रतिकूल परिणाम होत आहे. जमिनीत वारंवार तीच ती पिके घेतल्याने एकरी उत्पादकता कमी झाली आहे. अशा वेळी एवढ्या मोठ्या लोकसंख्येला अन्न पुरवायचे गंभीर आव्हान असून जगात भूकबळींची संख्या वाढत आहे. ही बाब चिंताजनक आहे.

# दिलासादायक घडामोडींचा काळ

**अर्थनगरीतून**

**– महेश देशपांडे, आर्थिक घडामोडींचे जाणकार**



ट्रम्पमहोदयांची अवकृपा किंवा अन्य आर्थिक कारणांमुळे सरत्या आठवड्यामध्ये आर्थिक आघाडीवर किमान त्रासदायक बातम्या समोर आल्या. त्यातील पहिली बातमी म्हणजे आता अवघ्या काही तासांमध्ये चेक वठणार आहेत. दुसरी बातमी म्हणजे भारतीय व्हिस्कीने जागतिक ब्रँड्सवर मात केल्याचे दिसून आले. दरम्यान, रशियाकडून अमेरिका बरेच काही खरेदी करत असल्याची कबुली ट्रम्प यांची दिली.

ट्रम्पमहोदयांची अवकृपा किंवा अन्य आर्थिक कारणांमुळे सरत्या आठवड्यामध्ये आर्थिक आघाडीवर त्रासदायक नसणाऱ्या काही बातम्या पहायला मिळाल्या. त्यातील पहिली बातमी म्हणजे आता अवघ्या काही तासांमध्ये चेक वठणार आहेत. दुसरी बातमी म्हणजे भारतीय व्हिस्कीने जागतिक ब्रँड्सवर मात केल्याचे दिसून येत आहे. दरम्यान, रशियाकडून अमेरिका बरेच काही खरेदी करत असल्याची कबुली ट्रम्प यांची दिली. या व्यतिरिक्त 'ऑपरेशन सिंदूर' नंतर भारताला २३ लाख कोटींचा फायदा झाल्याचे समोर आले.

बँकांमध्ये चेक जमा करण्याच्या नियमांमध्ये बदल करून रिझर्व्ह बँकेने कोट्यवधी ग्राहकांना दिलासा दिला आहे. याचा फायदा सामान्यतः चेकने पैसे देणाऱ्यांना होईल. आपल्या देशातील बँकिंग प्रणालीमध्ये 'चेक क्लिअरन्स'ला बराच वेळ लागतो. म्हणजेच चेकने पेमेंट केल्यानंतर पैसे खात्यात येण्यासाठी दोन-तीन दिवस लागतात. या विलंबामुळे सामान्यतः चेकने पेमेंट देणाऱ्या किंवा घेणाऱ्या लोकांना किंवा व्यावसायिकांना त्रास होतो. तथापि, आता असे होणार नाही. क्लिअरन्स सिस्टीम वेगवान होईल. भारतीय रिझर्व्ह बँक जलद 'क्लिअरन्स सिस्टीम' सुरू करणार आहे. याद्वारे चेक जमा केल्यानंतर काही तासांमध्येच खात्यात पैसे येतील. ४ ऑक्टोबरपासून 'चेक क्लिअरन्स' प्रक्रियेत लागणारा वेळ मोठ्या प्रमाणात कमी होईल. हा बदल 'चेक ट्रंकेशन सिस्टीम' (सीटीएस) अंतर्गत होईल. आतापर्यंत चेक क्लिअर होण्यासाठी टी+१ पर्यंत म्हणजे पुढील कामकाजाच्या दिवसापर्यंतचा वेळ लागत असे. चेक दुसऱ्या बँकेचा असेल तर वठायला तीन दिवस लागतात; मात्र आता संपूर्ण क्लिअरन्स प्रक्रिया काही तासांपर्यंत मर्यादित असेल.

रिझर्व्ह बँकेच्या माहितीनुसार ही नवी प्रणाली 'क्लिअरिंग अँड सेटलमेंट ऑन रियलायझेशन' म्हणून ओळखली जाईल. म्हणजेच, बँकांमध्ये काम करताना क्लिअरिंग सतत सुरू राहील. आतापर्यंत 'चेक ट्रंकेशन सिस्टीम' (सीटीएस) अंतर्गत बॅचमध्ये धनादेश प्रक्रिया केली जात असल्याने क्लिअरन्समध्ये वेळ लागत होता. नवीन प्रणालीअंतर्गत सकाळी दहा ते सायंकाळी चार वाजेपर्यंत बँकेत जमा केलेले धनादेश स्कॅन केले जातील आणि त्वरित क्लिअरिंग हाऊसमध्ये पाठवले जातील. यामुळे प्रक्रिया वेगवान होईल. दुसऱ्या टप्प्यात नियम अधिक कडक असतील. नवी प्रणाली दोन टप्प्यांमध्ये लागू केली जाईल. पहिला टप्पा चार ऑक्टोबर रोजी सुरू होईल तर दुसरा टप्पा तीन जानेवारी २०२६ रोजी सुरू होईल. पहिल्या टप्प्यात बँकांना संध्याकाळी सात वाजेपर्यंत धनादेशांची सकारात्मक किंवा नकारात्मक पडताळणी करावी लागेल. वेळेवर पडताळणी न झालेल्या धनादेशांना मान्यताप्राप्त मानले जाईल आणि सेटलमेंटमध्ये समाविष्ट केले जाईल. त्याच वेळी, दुसऱ्या टप्प्यात नियम अधिक कडक केले जातील. यामध्ये धनादेशाची पडताळणी तीन तासांच्या आत करावी लागेल. बँकेला सकाळी दहा ते अकरादरम्यान धनादेश मिळाल्यास पडताळणीसाठी दुपारी दोन वाजेपर्यंत वेळ मिळेल. सेटलमेंट पूर्ण झाल्यानंतर क्लिअरिंग हाऊस बँकेला पुष्टीकरण तपशील पाठवेल आणि ग्राहकांच्या खात्यात ताबडतोब पैसे पाठवले जातील. याचा उद्देश सेटलमेंटचा धोका कमी करणे, कार्यक्षमता सुधारणे आणि ग्राहकांना चांगल्या सुविधा प्रदान करणे हा आहे.

आणखी एक लक्षवेधी अर्थवृत्त म्हणजे भारतीय सिंगल माल्ट व्हिस्की आता भारतामध्येच नाही, तर जगभरात धुमाकूळ घालत आहे. चार वर्षांपूर्वी हरियाणा येथील 'पिकाडिली अ‍ॅग्रो इंडस्ट्रीज'ने 'इंद्री' नावाच्या ब्रँडची दारू तयार केली. २०२४ मध्ये भारतात सर्वाधिक विक्री होणारी ती सिंगल माल्ट व्हिस्की बनली आहे. त्यामुळे आपोआपच या दारूने सर्वांचे लक्ष आपल्याकडे वेधले आहे. दारूच्या या ब्रँडने ग्लेनलिव्हेट आणि ग्लेनफिडीचसारख्या प्रतिष्ठित स्कॉच ब्रँडनादेखील मागे टाकले आहे. आता फक्त अमरुत आणि पॉल जॉनच नाही, तर नव्याने बाजारात आलेले इंद्री आणि रामपूर या ब्रँड्सनेदेखील बाजारात चांगलाच धुमाकूळ घातला आहे. या सर्वांमध्ये 'इंद्री'ने आघाडी घेतली आहे. 'आयडब्लूएसएस ड्रिंक्स मार्केटच्या रिसर्च रिपोर्ट'नुसार २०२४ मध्ये पहिल्यांदाच भारतीय सिंगल माल्ट व्हिस्कीची विक्री ही स्कॉचपेक्षा अधिक झाली आहे. याला कमी किंमत आणि उच्च गुणवत्ता कारणीभूत असल्याचे या रिपोर्टमध्ये सांगण्यात आले आहे. ग्राहक आता स्कॉचऐवजी 'इंडियन सिंगल माल्ट'ला प्राधान्य देत असल्याचे या अहवालात म्हटले आहे. 'इंद्री'ने विक्रीचे एक नवे रेकॉर्ड बनवले आहे. या दारूला जगात सर्वाधिक गतीने विक्रीमध्ये वाढ झालेला ब्रँड अशी नवी ओळख मिळाली आहे. भारतामध्ये दमट वातावरण असते. त्यामुळे इतर देशांच्या तुलनेत बॅरलमध्ये दहा टक्के अधिक बाष्पीभवन होते. भारतीय सिंगल माल्ट व्हिस्कीचे बॅरल पाच ते आठ वर्षांमध्ये उघडले जाते. त्यामुळे सिंगल माल्ट व्हिस्कीला विशिष्ट प्रकारची चव येते, तसेच वेळेचीदेखील बचत होते. उत्पादन खर्च कमी असल्यामुळे दर कमी रहात असल्याने या प्रकारच्या दारूच्या विक्रीमध्ये वाढ झाली आहे.

आता एक बातमी ट्रम्पमहाशयांची मस्ती जिरवणारी. रशियाकडून कच्चे तेल खरेदी करणाऱ्या देशांवर अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आयातशुल्क लादत असताना स्वतः अमेरिका मात्र रशियाकडून खरेदी करत असल्याबद्दल अलिकडेच एका पत्रकाराने ट्रम्प यांना सवाल केला होता. तेव्हा त्यांनी याबाबत नीट माहिती नसल्याचे निर्लज्ज विधान केले होते. भारताने ट्रम्प यांचा दुटप्पीपणा उघडकीस आणला होता. आतापर्यंत त्यावर मौन बाळगणाऱ्या ट्रम्प यांनी अमेरिका रशियाकडून विविध वस्तू खरेदी करत असल्याची कबुली दिली. अलास्कामध्ये बैठक झाल्यानंतर ट्रम्प आणि रशियाचे अध्यक्ष व्लादीमिर पुतीन यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी पुतीन यांनी ट्रम्प सत्तेत आल्यापासून रशिया आणि अमेरिका यांच्यातील व्यापार वाढला आहे. अशा परिस्थितीत ट्रम्प यांची अमेरिका रशियाकडून तेल खरेदी करत असताना इतर देशांवर दुय्यम शुल्क का लादत आहे, असा मुद्दा उपस्थित केला. हा व्यापार सुमारे वीस टक्क्यांनी वाढला असल्याचेही त्यांनी दाखवून दिले. रशियाशी व्यापार करू नये म्हणून ट्रम्प इतर देशांवर दबाव आणत आहेत; परंतु ते स्वतः रशियाशी व्यापार थांबवू शकत नाहीत कारण अमेरिका रशियाशी बराच व्यापार करते. द्विपक्षीय व्यापार थांबवल्यास त्यांची अर्थव्यवस्था आणखी कोलमडू शकते. कारण टॅरिफच्या घोषणेपासून आर्थिक आघाडीवर अमेरिकेसाठी कोणतीही चांगली बातमी नाही. अशा परिस्थितीत अमेरिका आपल्या मोठ्या व्यापार भागीदारांपैकी एकाला गमावण्याचा मोठा धोका पत्करू शकत नाही.

अमेरिका रशियासोबतचा व्यापार थांबवू शकत नाही, कारण ती रशियाकडून अशा काही गोष्टी आयात करते, ज्यांच्या अभावामुळे अमेरिकेचे मोठे नुकसान होऊ शकते. अमेरिकन जनगणना ब्युरोच्या आकडेवारीनुसार या वर्षाच्या पहिल्या सहामाहीमध्ये अमेरिकेने ९२७ दशलक्ष डॉलर किमतीचे खत आयात केले. गेल्या वर्षी रशियाकडून होणारी खत आयात एकूण एक अब्ज डॉलरपेक्षा जास्त होती. तीन प्रकारच्या रासायनिक खतांच्या आयातीसाठी अमेरिका रशियावर अवलंबून आहे. यामध्ये युरिया, युरिया अमोनियम नायट्रेट (यूएएन) आणि पोटॅशियम क्लोराईड म्युरेट ऑफ पोटॅशसारख्या खतांचा समावेश आहे. याशिवाय अमेरिका रशियाकडून पॅलेडियमची आयातदेखील करते. तथापि, २०२१ पासून रशियाकडून पॅलेडियमची आयात लक्षणीयरीत्या कमी झाली आहे; तरीही आकडेवारीवरून असे दिसून येते, की अमेरिकेने २०२४ मध्ये ८७८ दशलक्ष डॉलर आणि या वर्षी जून २०२५ पर्यंत ५९४ दशलक्ष डॉलर आयात केली आहे. चांदीसारखा दिसणारा हा धातू विविध इलेक्ट्रॉनिक आणि औद्योगिक उत्पादनांमध्ये वापरला जातो आणि कारच्या उत्प्रेरक कन्व्हर्टरमध्ये एक प्रमुख घटक आहे. अमेरिकेने रशियाकडून ७५५ दशलक्ष डॉलर्स किमतीचे युरेनियम आणि प्लुटोनियम आयात केले आहे.

समोर आलेल्या आणखी एका खास बातमीनुसार भारताने केलेल्या 'ऑपरेशन सिंदूर'ला शंभर दिवस पूर्ण होत असताना आर्थिक स्थिती ढेपाळली नाही, तर देशाला २३.४७ लाख कोटी रुपयांचा फायदा झाला आहे. आश्चर्यकारक बाब म्हणजे या काळात सेन्सेक्स आणि निफ्टीमध्ये कोणताही महत्त्वपूर्ण बदल झाला नाही. यानंतरही शेअर बाजाराच्या मूल्यांकनात ५.५७ टक्क्यांची वाढ झाली आहे. एकूण मूल्यांकनातही वाढ झाली आहे. पहिल्या तिमाहीमध्ये देशातील कंपन्यांचे निकाल थोडे चांगले दिसले आहेत. त्याचा परिणाम त्या कंपन्यांच्या शेअर्समध्ये दिसून आला आहे. यामुळे त्यांचे मूल्यांकन वाढले आहे. येत्या काळात शेअर बाजाराच्या मूल्यांकनात आणखी वाढ होऊ शकते.

पान १ वरून

## मराठा मोर्चा मुंबईत धडाडला

अभ्यास सुरू आहे. त्यांचा अहवाल येईपर्यंत जरांगे यांनी आंदोलन स्थगित करावे, असे आवाहन राज्य सरकारच्यावतीने त्यांना करण्यात आले आहे, अशी माहिती जलसंपदामंत्री तथा उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली. ते म्हणाले की मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने मराठा समाजाला १६ टक्के आरक्षण दिले. परंतु राज्यात महाविकास आघाडीचे सरकार असताना तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना हे आरक्षण टिकविता आले नाही.

महायुती सरकारने दिलेले दहा टक्के आरक्षण टिकून आहे. न्या. शिंदे समितीला मुदतवाढ देऊन हैदराबाद गॅझेटसंदर्भातील अहवाल तातडीने सादर व्हावा, असाच सरकारचा प्रयत्न आहे. ही प्रक्रिया थोडीशी गुंतागुंतीची आहे. यामुळे कोणावरही अन्याय व्हायला नको. मराठा आरक्षणाच्या संदर्भात समाजाच्या भावना तीव्र आहेत. लोकभावनेचा आदर करणे सरकारचे काम आहे. मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून मराठा समाज पुन्हा आक्रमक झाला आहे. मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली मराठा बांधव मोर्चा घेऊन मुंबईच्या दिशेने निघाले आहेत. मनोज जरांगेंच्या आंदोलनामध्ये मोठ्या संख्येने राज्यभरातील मराठा बांधव सहभागी झाले आहेत. जुन्नरमधून मोर्चा मुंबईच्या दिशेने निघाला आहे. मुंबईच्या वेशीपर्यंत मनोज जरांगे पाटील पोहचण्यापूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आरक्षणाबाबत मोठे विधान केले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मराठा आंदोलनावर प्रतिक्रिया देताना म्हणाले की, आरक्षणावरून कुणावर अन्याय होणार नाही. ओबीसी समाजावर अन्याय होणार नाही. मराठा समाजाने लक्षात घ्यावे की त्याचे प्रश्न आम्हीच सोडवले आहेत. आमच्याच सरकारने त्यांचे प्रश्न सोडवले आहेत. यापुढेही आम्हीच त्यांचे प्रश्न सोडवणार आहोत. मराठा समाजाचे प्रश्न आम्हीच मार्गी लावले आहेत. आरक्षणाबाबत कुणावरही अन्याय होणार नाही. कारण ईडब्ल्यूएसमुळे अनेक प्रश्न सुटलेले आहे. मराठा समाजाला आपण आरक्षण दिलंय आणि ते कोर्टातही टिकलंय.

मनोज जरांगे पाटील हे मुंबईतील आझाद मैदानावर उपोषणाला बसणार आहेत. याबाबत फडणवीस म्हणाले की, सगळ्यांना आपली मत मांडण्याचा अधिकार आहे. प्रत्येकाला आंदोलन करण्याचा अधिकार आहे. लोकतांत्रिक पद्धतीने जेवढी आंदोलनं होतील त्याला आमचा ना नाही. त्याला आम्ही सामोरे जाऊ. त्यावर चर्चा करू आणि योग्य मार्ग काढू. दरम्यान, मनोज जरांगे पाटील हे आझाद मैदानावर आमरण उपोषण करण्यावर ठाम आहेत. उपोषणासाठी कोणत्याही अटी-शर्ती लावू नये, असे आवाहन त्यांनी सरकारला केले आहे. आरक्षणाच्या मागणीसाठी मराठा समाज पुन्हा एकदा सक्रिय झाला आहे, आम्हाला ओबीसीमधून आरक्षण पाहिजे अशी मराठा समाजाची मागणी आहे. मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली मराठा बांधव एकवटले आहेत, मुंबईमध्ये आंदोलन होणार आहे. यावर प्रतिक्रिया देताना आता मुख्यमंत्री फडणवीस यांनी मोठे वक्तव्य केले आहे.

आंदोलनासाठी जे नियम निकष केले आहेत, त्या नियमानुसार हे आंदोलन झालं तर आम्हाला काही अडचण नाहीये, आज आपल्याला माहिती आहे की, जवळपास साडेतीनशे जाती या ओबीसीमध्ये आहेत. आणि समजा आता आपण मेडिकलच्या प्रवेशाबाबत बघितलं तर ओबीसीचा कटऑफ हा एसीबीसीच्यावर आहे. एसीईबीसीचा कट ऑफ हा इडब्ल्यूएसच्यावर आहे, त्यामुळे या मागणीमुळे नेमके किती भलं होणार आहे, याची मला कल्पना नाही. आपण जर आकडेवारी नीट बघितली तर मराठा समाजाच्या हिताचं काय आहे, हे आपल्या लक्षात येईल असे यावेळी देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. मराठा समाजाची देखील ही जबाबदारी आहे की, त्यांनी मराठा समाजाच्या हिताचा अभ्यास करून त्या ठिकाणी मागणी केली पाहिजे. मात्र एक गोष्ट खरी आहे, की एसीईबीसी आरक्षणामध्ये राजकीय आरक्षण मिळणार नाही, राजकीय आरक्षण हा जर हेतू असेल तर मात्र गोष्ट वेगळी आहे. जर राजकीय आरक्षण हा हेतू नसेल आणि सामाजिक, आर्थिक परिवर्तनाची जर लढाईल असेल, नोकरी मिळाली पाहिजे, प्रवेश मिळाला पाहिजे तर मात्र या मागणीचा विचार किमान काही विचारवंतांनी तरी केला पाहिजे, असेही यावेळी फडणवीस यांनी म्हटले आहे. आजही आंदोलनासाठी रिसोर्सेस उभे करणारे कोण आहेत? हे पाहायला मिळत आहे, पण ठीक आहे. माझं म्हणणं काय आहे, की आमच्यासाठी हे आंदोलन राजकीय नाही, आम्ही याला सामाजिक चष्म्यातून पाहू, काही राजकीय पक्ष हे त्यांच्या खांद्यावर बंदूक ठेवून आपला फायदा करण्याचा प्रयत्न करत आहेत, पण त्यांचे नुकसान होईल, फायदा होणार नाही, असा इशाराही विरोधकांना यावेळी फडणवीस यांनी दिला आहे.

मराठा, ओबीसी समाजावर अन्याय होऊ देणार नाही, मराठा समाजाला आरक्षण दिले आहे, ते कोर्टातही टिकले आहे. कोणाचेही आरक्षण काढून घेणार नाही, लोकशाहीच्या चौकटीबाहेर कुणीही जाऊ नये. मराठा समाजाच्या नेत्यांनी अभ्यास करून मागणी करावी, असेही यावेळी फडणवीस यांनी म्हटले. सरकारच्या हातात असताना, न्यायदेवतेची मध्यस्थी कशाला अशा शब्दांत मराठा मोर्चाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी राज्य सरकारला फटकारले,मुंबईच्या आझाद मैदानावरून मराठा आरक्षणासाठी आंदोलनाला मार्गस्थ होण्यापूर्वी किल्ले शिवनेरीची माती कपाळी लावून त्यांनी मराठा आरक्षणासाठी प्रसंगी मरण्याचीही तयारी ठेवल्याचे स्पष्ट केले. मस्साजोगचे सरपंच दिवंगत संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख, आंतरवालीचे सरपंच पांडूरंग तारख, हनुमान मुळीक, ज्ञानदेव काशिद, गंगाधर काळकुटे, बद्रीनाथ तारख, संजय गोडसे, जुन्नरमधील विविध पक्षांचे नेते सत्यशील शेरकर, ज्ञानेश्वर खंडागळे, मकरंद पाटे, सूरज वाजगे, सकल मराठा समाजाचे गणेश महाबरे, संदेश बारवे, सुनिल ढोबळे, प्रवेश देवकर आदी यावेळी उपस्थित होते. एक मराठा लाख मराठा अशा घोषणा देत शिवनेरी मार्गावर आंदोलकांनी मराठा आरक्षण घेणारच असा एल्गार केला. किल्ले शिवनेरीच्या पायथ्यापासून पारंपरिक वाद्यांच्या गजरात आंदोलक कार्यकर्ते शिवाई देवी मंदिरात आल्यानंतर मनोज जरांगे पाटील यांच्या हस्ते देवीची आरती झाल्यानंतर,ते शिवजन्मस्थळी नतमस्तक झाले. तेथील माती कपाळी लावून, आरक्षणाची लढाई आता आरपार असेल असे घोषीत केले.

यावेळी पत्रकारांशी संवाद साधताना, त्यांनी राज्य सरकारवर निशाणा साधला. गरीब मराठ्यांचा अपमान करू नका, त्यांची मने जिंका असे सांगून खरं तर सत्ता दिली मराठ्यांनी पण तुम्ही उलटले मराठ्यांवर या शब्दांत जहरी टीका त्यांनी केली.

पान १ वरून

मराठा समाजाच्या लेकरांच्या वेदनांना न्याय देण्यासाठी ही लढाई सुरु आहे. रायगड आणि शिवनेरी ही प्रेरणास्थळे आहेत. येथे आल्यानंतर यश मिळते हा इतिहास असल्याचे सांगून मराठा विरोधी आडमूठी भूमिका सोडून द्या, असा इशारा राज्य सरकारला दिला.

आम्ही तर आरक्षण मिळवणारच आता थांबणार नाही असे सांगून जर एक दिवसाचे उपोषण करायला सांगता तर एक दिवसात आमच्या मागण्या का मान्य करत नाहीत, वारंवार माझ्या समाजाचा माझा अपमान करतात कारण मी मॅनेज होत नाही, हे त्यांचे दुख आहे. छत्रपतींच्या विचारावर चालणारे सरकार छत्रपतींच्या विचारांवर चालणाऱ्या मराठ्यांवर गोळ्या घालणार का हा प्रश्न आहे, असे ते म्हणाले.

आमचे आंदोलन कायदा आणि न्यायालयाने दिलेले नियम पाळून सुरु आहे. आम्ही कायदा तोडत नाही. पण आमच्या आंदोलनाला तुम्ही हात लावाल तर माझा समाज महाराष्ट्रभर आहे. हे सरकारने ध्यानात घ्यावे असा इशारा त्यांनी दिला. या आंदोलनामुळे गणेशोत्सवात अडथळा होत असल्याचा आरोप होत आहे. यावर बोलताना अडथळा करायला आमच्या हातात बंदुका आहेत का? असा प्रतीप्रश्न जरांगे यांनी केला.

हिंदुंचा सण असून तुम्ही मुंबईला चाललात म्हणणारे ज्यावेळी आंतरवालीत आंदोलन सुरु होते. त्यावेळी गणपती बसले नव्हते का, मग हिंदूंच्या सणाच्या वेळी लाठीचार्ज केला. ते सरकारला चालते का? असे सांगून आम्ही गोळ्या झेलायला तयार मात्र आरक्षणासाठी हटायला तयार नाही,मराठ्यांच्या हक्काच्या ओबीसी आरक्षणातून आरक्षणाचा विचार सरकारने करावा असा पुनरुच्चार त्यांनी केला.

छत्रपती शिवाजी महाराज यांनी आम्हाला सांगितले की प्रत्येक स्त्रीला आपल्या आईच्या नजरेतून पाहा. म्हणून त्यांच नजरेतून आम्ही मनोज जरांगे पाटील यांना सांगितले की तुम्ही ज्या आईवरून शिव्या दिल्या त्याचा आम्ही निषेध करतो. तुम्ही जर दिलगिरी व्यक्त केली नाही तर आम्हालाही त्याच भाषेत व्यक्त व्हावे लागेल. त्यांनी लगेच या प्रकरणी दिलगिरी व्यक्त केली, त्याबद्दल आम्ही त्यांचे आभार मानतो, असे आ. प्रसाद लाड म्हणाले. आमच्या मराठा बांधवांना आरक्षण देण्याचे काम देवेंद्र फडणवीस यांनी केले. ते आरक्षण घालवण्याचे काम उद्धव ठाकरे यांनी केले. ते आज मराठा समाजाबद्दल बोलत आहेत. संजय राऊत यांना मराठा आंदोलन किंवा मराठा आरक्षणाबद्दल बोलण्याचा अधिकार नाही, असे भाजपाचे प्रवक्ते नवनाथ बन म्हणाले.

## मराठा समाजाचा एकजुटीचा निर्धार

पाटील-पाटील च्या घोषणा करत उपस्थितांनी आपले समर्थन दर्शवले. पावसाने देखील जोरदार हजेरी लावली होती, परंतु त्याचा कोणताही परिणाम आंदोलनकर्त्यांच्या उत्साहावर झाला नाही. नेप्ती चौफुला परिसरात नागरिकांनी आंदोलकांना पिण्याच्या पाण्याची आणि नाष्ट्याची व्यवस्था करून आपले योगदान दिले.

सायंकाळ होताच परिसरात मराठा समाजबांधवांची गर्दी लक्षणीयरीत्या वाढली. रात्रीच्या जेवणासाठी मसालेभाताची सोय करण्यात आली होती. रात्रभर पावसाची संततधार सुरू असतानाही नागरिकांनी जरांगे पाटील यांच्या आगमनाची प्रतीक्षा केली. अखेर पावणे दीडच्या सुमारास ताफा पोहोचताच मोठा जल्लोष करण्यात आला.

फुलांची उधळण, फटाक्यांची आतषबाजी आणि घोषणांनी संपूर्ण परिसर थरारून गेला. मराठा समाजाच्या एकतेचा आणि संघर्षाचा एक जिवंत प्रत्यय या प्रसंगातून पाहायला मिळाला. समाजाचा प्रचंड पाठिंबा आणि तरुणाईचा उसळणारा उत्साह पाहता, मराठा आरक्षणासाठीची ही लढाई आता निर्णायक टप्प्याकडे वाटचाल करत असल्याचे चित्र आहे.

## जरांगेंचा गैरसमज दुर करू : ना. विखे पाटील

आधिकाऱ्यांची टिम पाठवून गोळा केलेल्या कागपत्रांची पडताळणी सुरु आहे. दाखले देण्याची प्रक्रीयाही सुरु करण्यात आली आहे. मात्र अधिक गुंतागूंत होवू नये म्हणूनच न्यायमुर्ती शिंदे समिती काम करीत असल्याचे त्यांनी सांगितले.

आज आरक्षणाच्या प्रश्नावर महाविकास आघाडीचे नेते राजकीय भूमिकेतून बोलत आहेत. परंतू, महाविकास आघाडी सरकारने आरक्षणाच्या बाबतीत कोणतेही गांभिर्य घेतले नाही. उलट महायुती सरकारने दिलेले आरक्षण त्यांनी घालविले, याचे प्रायश्चित त्यांनी घेतले पाहीजे. संजय राऊतांनी महायुती सरकारला सल्ले देण्यापेक्षा मराठा आरक्षणा का घालविले म्हणून, उध्दव ठाकरे यांनाच त्यांनी प्रश्न विचारला पाहिजे, अशी खोचक टिका मंत्री विखे पाटील यांनी केली.

## मंत्री रामदास आठवलेंचे मनोज जरांगेंच्या आंदोलनाला समर्थन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**मुंबई** : मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणासाठी मुंबईच्या आझाद मैदानात २९ ऑगस्टपासून आंदोलन सुरू करण्याची घोषणा केली आहे. या आंदोलनाला रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) ने आपला पाठिंबा जाहीर केला आहे. महाबळेश्वर येथे झालेल्या राज्यस्तरीय विचारमंथन शिबिरात मंत्री रामदास आठवले यांच्या उपस्थितीत एकमताने हा पाठिंब्याचा ठराव मंजूर करण्यात आला.

आपल्या आंदोलनाची तयारी करून मनोज जरांगे मुंबईच्या दिशेने रवाना झाले आहेत आणि त्यांनी पुणे जिल्ह्यातील शिवनेरी गडावर जाऊन छत्रपती शिवाजी महाराजांचे दर्शन घेतले. मनोज जरांगे यांच्या या भूमिकेमुळे ओबीसी समाज आक्रमक झाला असतानाच, आता रामदास आठवले यांच्या पाठिंब्यामुळे या आंदोलनाला वेगळी दिशा मिळण्याची शक्यता आहे.

आठवले गटाच्या सक्षमीकरणासाठी महाबळेश्वर येथे राज्यस्तरीय विचार मंथन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला केंद्रीय मंत्री रामदास आठवले देखील उपस्थित होते. ते म्हणाले, या शिबिरात मनोज जरांगे यांच्या आंदोलनाला आपला पाठिंबा असल्याची भूमिका आधीपासून असल्याचे आठवले यांनी म्हटले आहे. मनोज जरांगे यांची मागणी आहे की सर्व मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण द्या. सर्व मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण देणे शक्य नाही. मराठा समाजाला आरक्षण देताना ओबीसी समाजावर अन्याय नको, अशी आमची भूमिका आहे.

# मुंबईकडे जाताना त्रास दिला तर याद राखा : जरांगे

## मनोज जरांगे यांचे शेवगावमध्ये आगमन; कार्यकर्त्यांची ठिकठिकाणी गर्दी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शेवगाव** : मुंबईकडे जाताना सरकारने त्रास दिला, आरक्षण मिळाले नाहीतर काय करायचे हे तुम्हाला माहिती आहे, त्यामुळे आता मागे हटायचे नाही, अशा शब्दांत मराठा आरक्षण मागणी आंदोलनाचे नेते मनोज जरांगे यांनी आज, बुधवारी रात्री शेवगाव येथे बोलताना इशारा दिला. मराठा आरक्षण मागणीसाठी जरांगे यांनी मोर्चासह मुंबईकडे कूच केली आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पैठणमार्गे त्यांचे रात्री उशिरा अहिल्यानगर जिल्ह्यातील शेवगाव येथे आगमन झाले. त्यावेळी ते बोलत होते.

त्यांच्या समवेत वाहनांचा मोठा ताफा होता तसेच कार्यकर्त्यांनीही मार्गावर ठिकठिकाणी गर्दी केली होती. रात्री उशिरा ते नगर शहराच्या बाह्यवळण रस्त्याने आळेफाट्याकडे (पुणे) रवाना होणार होते. शेवगाव व नगर शहराजवळ त्यांचे कार्यकर्त्यांनी जोरदार स्वागत केले. जरांगे यांचे दुपारी शेवगावमध्ये आगमन होणार होते. मात्र प्रत्यक्षात रात्री साडेआठच्या सुमारास त्यांचे आगमन झाले.



मनोज जरांगे शेवगाव मध्ये आले असता त्यांचे मुस्लिम बांधवाकडून स्वागत करण्यात आले व त्यांच्या या आंदोलनाला मुस्लिम समुदायाकडून पाठिंबा देण्यात आला.

### वाहतूक कोंडी

दरम्यान या मोर्चामुळे शेंडी बाह्यवळण रस्ता ते कल्याण महामार्गापर्यंत मोठी वाहतूक कोंडी झाली होती. वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. पोलिसांनी या मार्गावरील वाहतूक अन्य मार्गाने वळवली होती. शेवगाव ते नगरदरम्यान सकल मराठा समाजाच्या वतीने चहा, पाणी, नाश्त्याची सोय करण्यात आली होती. मोर्चा रवाना होण्याच्या मार्गावर ठिकठिकाणी मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. जरांगे पाटील रात्री उशिरा आळेफाट्याहून शिवनेरीकडे जाऊन मुक्काम करणार आहेत. तिथून ते नंतर २९ ऑगस्टला मुंबईत प्रवेश करणार आहेत.

# धर्माचे वैभव वाढविण्यासाठी गणेशोत्सव साजरा करा : भास्करगिरी महाराज

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा** : धर्माचे वैभव वाढविण्यासाठी व एकात्मता गिरविण्यासाठी गणपती बाप्पाला शोभेल अशा पद्धतीने गणेशोत्सव साजरा करा असे आवाहन श्री क्षेत्र देवगड गुरूदेव दत्त पिठाचे प्रमुख महंत राष्ट्र संत गुरुवर्य श्री भास्करगिरीजी महाराज यांनी गणपती उत्सवाच्या निमित्ताने गणेश भक्तांना केले आहे.

नेवासा गावा तील मध्यभागी असलेल्या खोलेश्वर गणपतीचे आज गणेशोत्सवानिमित्त भास्करगिरी महाराजांच्या हस्ते पूजन करण्यात आली संतोष कुटे आणि संजय कुटे यांच्या हस्ते बाबांचा सत्कार करण्यात आला यावेळी सुदाम महाराज आदमने श्रीराम महाराज चोपडे सुनील वाघ बाळू महाराज कानडे पत्रकार सुधीर चव्हाण आणि विक्रम गोसावी गुरुजी हे उपस्थित होते गणेशोत्सव निमित्ताने संदेश देतांना गुरुवर्य श्री भास्करगिरीजी महाराज म्हणाले की मंगलमूर्तीचे स्थान सर्वांच्या अंतकरणामध्ये आपल्या श्रद्धेच्या स्थानावर विराजमान आहे,सर्व आस्तिक नास्तिक गणेशोत्सवात उपासना करतांना दिसते,गणरायाचे महात्म्य आगळेवेगळे असून महाराष्ट्रातील गणेशोत्सव हा देशाचे वैभव वाढविणारा आहे,यानिमित्ताने सर्व समाजात एकोपा पहावयास मिळतो लोकमान्य टिळकांनी देशाचा स्वाभिमान वाढावा म्हणून सर्वांना एकत्रित करून या उत्सवाला सुरुवात केली परकीयांच्या सत्तेतून बाहेर पडावे हाच हेतू होता,गणरायाच्या सामूहिक उपासनेतूनच



पारतंत्र्याचे विघ्न पार झाले आहे.

गणेशोत्सव साजरा करतांना काही मानवी चुका होत असतात त्या बाजूला सारून गणरायाच्या उपासनेतून देशाला स्थैर्य प्राप्त करण्यासाठी होणार आहे त्यासाठी ही आपणा सर्वांना प्रयत्न करायचे आहे. उपासनेतून बळकटी प्राप्त होत राहो हीच मागणी गणरायाकडे करू या,देश प्रेम व धर्म प्रेम,सर्वांविषयी बंधू प्रेम अंतकरणात दृढ होत राहो, सुखाची प्राप्ती दुःख नष्ट होत राहो, दुःखाला सुख मानण्याची ताकद आध्यात्मिक शक्तीत असल्याने मंगलमूर्तीच्या आराधनेने दुःख सहन करण्याची ताकद गणपती बाप्पा ने आम्हाला द्यावी अशी प्रार्थना त्यांनी गणरायाच्या चरणी केली.

राज्य शासनाने गणेशोत्सवाला राज्य महोत्सवाचा दर्जा दिल्याबद्दल त्यांनी राज्य शासनाचे अभिनंदन करून आभार मानले,चांगले निर्णय होत असतांना आपली ही जबाबदारी मोठी असल्याने हिडीसवाणे कार्यक्रम गणेशोत्सवात करू नका,धर्माचे वैभव वाढवण्यासाठी व एकात्मता गिरविण्यासाठी गणपती महाराजांना शोभेल अशा पद्धतीने गणेशोत्सव साजरा करा असे आवाहन केले आहे.

# श्री वराह जयंती उत्साहात साजरी

## राहुरीतील मिरवणुकीस उत्स्फूर्त प्रतिसाद

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी** : राहुरी शहरात श्री वराह जयंतीनिमित्त सायंकाळी ५ वाजता भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले. संपूर्ण शहरात धार्मिक वातावरण निर्माण झाले असून नागरिकांनी उत्साहाने सहभाग घेतला.

मिरवणूक हनुमान मंदिर येथून सुरू होऊन भागीरथीबाई शाळा, शनि चौक, व्यंकटेश चौक, मठ गल्ली, छत्रपती शिवाजी महाराज चौक, शुक्लेश्वर चौक मार्गे पृथ्वी कॉर्नर येथे विसर्जित करण्यात आली. मार्गभर रांगोळ्या, फुलांची सजावट, ढोल-





ताशा पथक व भगव्या पताका मिरवणुकीला सजवून गेला. शहरातील युवक वर्ग, महिला, लहान मुले आणि वयोवृद्धांनी देखील मिरवणुकीत सहभाग घेत मोठ्या उत्साहाने उपस्थिती दर्शवली.

मिरवणुकीचे प्रमुख आकर्षण ठरले 'जिवंत वराह', ज्याचे दर्शन घेण्यासाठी मोठी गर्दी झाली. विविध ठिकाणी आरती, प्रसाद व जलपान व्यवस्था करण्यात आली होती. संपूर्ण मार्गावर नागरिकांनी मिरवणूक पाहण्यासाठी मोठ्या प्रमाणावर गर्दी केली होती. या भव्य मिरवणुकीचे आयोजन यशस्वी करण्यासाठी सकल हिंदू समाजाच्या कार्यकर्त्यांनी अथक परिश्रम घेतले. त्यांचे विशेष कौतुक करण्यात येत आहे.

# शेती महामंडळ कामगारांची महसूलमंत्र्यांबरोबर बैठक

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शिरसगाव** : शेती महामंडळाच्या कामगारांची महसूलमंत्री ना.,चंद्रशेखर बावनकुळे यांच्या समवेत मंत्रालय मुंबई येथे बैठक संपन्न झाली.या बैठकीस कृषी मंत्री, ना.दत्तात्रेय भरणे व महसूल राज्यमंत्री,योगेश कदम उपस्थित होते.

या बैठकीस शेती महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक पुणे यांना संपूर्ण चौदा मळ्याची माहिती गोळा करणे कामगार राहत असलेल्या खोल्याची अवस्था कॅज्युअल,(नैमितीक,) कामगार कायम,कामगारांच्या कुटुंबाची सध्याची स्थिती व सर्व मळ्यावरील शेती शिल्लक किती याबाबतची माहिती घेण्याचे आदेश दिले आहेत कामगार कृती समितीने यापूर्वी ९ मागण्याचा तत्कालीन महसूल मंत्री यांच्याकडे तडजोडीचा प्रस्ताव दिला आहे या प्रस्तावावर माहिती घेण्याचे आदेश,



शेती महामंडळ व्यवस्थापकीय संचालक पुणे यांना दिले आहेत ८ ते १० दिवसात माहिती देण्याबाबतचे आदेश दिले आहेत यावेळी ही माहिती आल्या नंतर शेती महामंडळाच्या महसूल मंत्री, महसूल राज्यमंत्री,व महसूल अधिकारी यांची बैठक होईल ही बैठक झाल्यानंतर शेती महामंडळ कामगार लढा कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांना व उपोषणकर्त्यांना बोलवण्यात येईल.

या बैठकीमध्ये महसूलमंत्री ना.,चंद्रशेखर बावनकुळे यांनी दोन गुंठे जागा व प्रधानमंत्री घरकुल योजना मार्फत जागा देण्याचा ८ ते ९ हजार घरकुले बांधून देण्याचे आश्वासन महसूल मंत्री ना. चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले सदर बैठकीला शेती महामंडळ लढा कृती समितीचे प्रतिनिधी सुभाष कुलकर्णी,सागर (बाबा) मिसाळ ,अँड,संजय चंदनशिवे शेखर काटे,वेणूनाथ बोळींज,आकाश पवार,बाबासाहेब सावंत,भिकन शिंदे सुभाष गुरव,भालचंद्र शिंदे,अमोल चव्हाण उपस्थित होते.निवेदनातील

तडजोडच्या मागण्या शासनाकडे दिलेल्या आहेत त्यात ,रामराजे नाईक निंबाळकर आयोगाच्या शिफारशी अंमलबजावणी जशीच्या तशी करावी. ,२,गुंठे जागा व घर बांधून द्यावेत, कामगारांच्या ४,था,५वा वेतन आयोगाचे फरक रक्कम ,समान कामास समान वेतन,रोजदार कामगारांची ग्रॅज्युएटी एकूण रक्कम ९९ कोटी ५० लाख रुपये शासन आदेश प्रमाणे देण्यात यावे तसा शासनाचा आदेश आहे,शेती महामंडळाचे कायम कामगाराना शेती दोन हेक्टर(५,एकर )व कॅज्युअल नैमित्तिक कामगार यांना (२,एकर )जमीन मिळावी.व महामंडळाच्या रिक्त जागा भराव्यात व रोजंदारी कामगार कामावर घ्यावेत.व इतर काही मागण्या आहेत.याबाबत महसूल मंत्री यांचेबरोबर सविस्तर चर्चा केली.

# जवळवाडीतील खाडे वस्तीत मध्यरात्री दरोडा

## ग्रामस्थांचा पोलिस ठाण्यात ठिय्या, खासदारांकडूनही निषेध

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी** : पाथर्डी तालुक्यातील जवळवाडी येथील खाडे वस्तीत सोमवारी मध्यरात्री दरोडेखोरांनी दरोडा टाकून लाखोंचे दागिने व रोख रक्कम लुटून नेल्याची घटना घडली. या घटनेची दरोड्याची गुन्हा नोंद करण्यास पोलिसांनी नकार दिल्याने ग्रामस्थांनी संतप्त होऊन मंगळवारी दुपारी दोन वाजल्यापासून सायंकाळ पर्यंत पोलिस ठाण्यात ठिय्या देत निषेध व्यक्त केला.या आंदोलनाचे नेतृत्व आपचे प्रदेश सचिव सुभाष केकाण यांनी केले. दरम्यान खासदार निलेश लंके यांनीही ठाण्यात भेट देऊन दरोड्याचा तीव्र शब्दांत निषेध व्यक्त करत पोलिस प्रशासनास तात्काळ गुन्हा नोंद करून गुन्हेगारांना अटक करण्याच्या



सूचना दिल्या.खाडे वस्तीवरील सुरेश माणिकराव खाडे यांच्या घरावर सोमवारी रात्री दोन ते तीनच्या सुमारास सात अनोळखी इसमांनी दरोडा टाकली. चाकू व लोखंडी रॉडचा धाक दाखवत त्यांनी कुटुंबीयांना गळ्याला चाकू लावून धमकावले. सुरुवातीला सुरेश खाडे यांच्या घरात ५ अनोळखी इसम घरात शिरले व दरवाजात २ इसम बाहेर उभे होते.

भावाच्या घरातही त्याच टोळीतील दरोडेखोरांनी धाड टाकली. या दरोड्याच्या गुन्ह्यात एकूण ७ आरोपी सहभागी होते.यात दामोधर बाळासाहेब खाडे हा जखमी झाला आहे.महिलांच्या गळ्यातील मंगळसूत्र, झुंबर, गंठण यांसह कपाटातील रोख रक्कम आणि सोन्याचे दागिने असा मिळून सुमारे साडेपाच लाखांचा ऐवज चोरून नेला.या घटनेत दरोडेखोरांनी प्रतिकार करणाऱ्या मुलाच्या हातावर लोखंडी रॉडने मारून जखमी केले. तसेच 'आरडाओरडा केला तर जिवे ठार मारू' अशी धमकी दिली. त्याचवेळी खाडे यांच्या भावाच्या घरातही दरोडेखोर शिरले व त्यांच्याही घरातील दरोडेखोरांनी दागिने व पैसे नेले आहे.

या घटनेत ९० ग्रॅम सोन्याचे दागिने आणि तीन लाख रोख असा मुद्देमाल लुटून नेला आहे. यात ३ अंगठ्या - प्रत्येकी १० ग्रॅम,१ सर - १० ग्रॅम,२ झुंबर - प्रत्येकी १०,१ गंठण - १० ग्रॅम, २ मनीमंगळसूत्र - प्रत्येकी १० एकूण ९० ग्रॅम सोने व तीन लाख रोख रक्कम आहे.घटनेनंतर तक्रार देण्यासाठी ग्रामस्थ व पीडित कुटुंबीयांनी पाथर्डी पोलिस ठाण्यात धाव घेतली. मात्र पोलिस निरीक्षकांनी गुन्हा नोंद करण्यास नकार दिल्याने संतप्त ग्रामस्थांनी ठिय्या आंदोलन केले.

या वेळी गहिनीनाथ शिरसाट, राम लाड, शिवशंकर राजळे, दत्ता खेडकर आनंदा खाडे, संजय गोल्हार, विश्वास खाडे, भगवान गोल्हार, अशोक गोल्हार, दीपक खाडे, निलेश खाडे, अभिमान गोल्हार, लक्ष्मण गोल्हार, रामनाथ ढाकणे, लाला खाडे, सुरेश खाडे, शुभम घुगे, बाबासाहेब गोल्हार, रवींद्र गोल्हार यांसह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.आंदोलनानंतर पोलिस प्रशासनास अखेर गुन्हा दाखल करण्यास भाग पाडले गेले असून या प्रकरणाचा तपास सुरू आहे.

# अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार प्रकरणी लॉज मालकास अटक

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी** : अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार प्रकरणी आरोपीस लॉजची रूम उपलब्ध करून दिल्याप्रकरणी अनिकेत लॉजिंगचा मालक अनिकेत जाधव (वय २७, रा. शिंगवे नाईक) यास राहुरी पोलिसांनी अटक केली आहे. त्यास न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने एक दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. सदर प्रकरण राहुरी पोलीस स्टेशन येथे गुन्हा नं. ९१७/२५, भादंवि कलम ६४(१) इछड सह झजउडज कायद्याच्या कलम ४, ८, १२ नुसार नोंदवण्यात आला आहे. पोलिस तपासादरम्यान असे समोर आले की, आरोपी मुलीला लॉजवर घेऊन गेल्यानंतर लॉज चालक अनिकेत जाधव याने पीडितेचे वय किंवा ओळख याची कोणतीही पडताळणी न करता तिला रूम उपलब्ध करून दिली.

त्यामुळे त्याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ५५ इछड आणि झजउडज कलम १७ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून, कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे. या घटनेनंतर राहुरी पोलिस स्टेशनने परिसरातील सर्व हॉटेल व लॉज चालकांना आवाहन केले आहे की, कोणत्याही ग्राहकास रूम देण्यापूर्वी त्याचे ओळखपत्र आणि जन्माचा पुरावा तपासावा. ओळख व पुराव्यावर संबंधिताची स्वाक्षरी घेऊन रजिस्टरमध्ये नोंद करणे अनिवार्य आहे. विशेषतः



अल्पवयीन व्यक्तीसह आलेल्या कोणत्याही ग्राहकास रूम देऊ नये. अन्यथा अशा प्रकरणात गुन्हा घडल्यास संबंधित लॉज मालक व चालक यांच्यावर खझ्रउ व झजउडज अंतर्गत कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा सहाय्यक पोलीस निरीक्षक सुदाम शिरसाठ यांनी दिला आहे.

ही कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्री. सोमनाथ घार्गे, अप्पर पोलीस अधीक्षक श्री. सोमनाथ वाकचौरे व उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. जयदत्त भवर यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या नेतृत्वात सहाय्यक पोलीस निरीक्षक सुदाम शिरसाठ, पोलीस हवालदार सतीश आवारे, पो.ह. विश्वास बेरड, पो.ना. अशोक कुदळे व पो.शी. रवी पवार यांनी केली आहे.

# कर्जत तालुक्यात गणरायाचे जल्लोषात स्वागत

## ७६ सार्वजनिक मंडळांची स्थापना; शेगुड व डोंबळवाडी येथे एक गाव, एक गणपती

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कर्जत** : अहिल्यानगर जिल्ह्यातील कर्जत शहरासह तालुक्यात यंदा लाडक्या गणरायाचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. एकूण ७६ सार्वजनिक गणेश मंडळांनी गणेश मूर्तीची स्थापना केली असून, घराघरांत भक्तिभावाने श्रीगणेशाची प्रतिष्ठापना करण्यात आली आहे. तालुक्यातील शेगुड व डोंबळवाडी या दोन गावांनी यंदाही एक गाव, एक गणपती संकल्पनेला चालना देत एकमुखी सार्वजनिक उत्सव साजरा केला आहे.

गावातील या ऐक्याचे दर्शन गणेशोत्सवात विशेषत्वाने घडले. लाडक्या गणरायाचे वाजत गाजत व गुलालाची उधळण करत गणपती बाप्पा मोरया चा गजर करत शहरामध्ये मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले. रात्री उशिरापर्यंत सार्वजनिक गणेश मंडळे वाजत गाजत मिरवणुकीने



लाडक्या गणरायाचे शहरांमध्ये रात्री उशिरापर्यंत मिरवणुका काढून जोरदार स्वागत करण्यात आले

गणरायाची प्राणप्रतिष्ठा करत असल्याचे दिसून आले. मोठ्या मूर्तींना मागणी जास्त यावेळी विविध आकाराच्या गणेश मूर्ती पहावयास मिळाल्या यामध्ये संत, पांडुरंग, बालाजी, बालगणेश, झोपलेला छोटा गणेश, असे अतिशय मनमोहक गणेश मूर्ती यावेळी बाजारामध्ये आल्या होत्या. सार्वजनिक मंडळांनी विविध आकारमानाच्या व किमतींच्या मूर्ती आणल्या असून, मूर्तींच्या किमती ३ हजार रुपयांपासून ते ५० हजार रुपयांपर्यंत आहेत. तर घरोघरी १ हजार ते ५ हजार रुपयांच्या मूर्तींची प्रतिष्ठापना करण्यात आली आहे. आकर्षक सजावट, आरास, धार्मिक कार्यक्रम आणि समाजोपयोगी उपक्रम यामुळे शहर व गावांचा उत्साह दुणावला आहे. पर्यावरण पूरक गणेश मूर्तींना मागणी दुसरीकडे पर्यावरण पूरक शाडू मातीच्या गणेश मूर्तींना देखील यावेळी बाजारपेठेमध्ये मोठी मागणी असल्याचे दिसून आले.

शाळा कॉलेज महाविद्यालय या ठिकाणी पर्यावरण पूरक गणेश मूर्तींचे जे प्रबोधन करण्यात आले यामुळे या मूर्तींना मोठी मागणी असल्याची पहावयास मिळाली. डीजे चा वापर करू नका सोपानराव शिरसाठ पोलीस निरीक्षक गणेशोत्सव शांततेत आणि पारंपरिक पद्धतीने पार पडावा यासाठी पोलीस प्रशासनाने विशेष खबरदारी घेतली आहे. डी.जे. विरहित उत्सव पार पाडा, असे स्पष्ट आवाहन पोलीस निरीक्षक सोपानराव शिरसाट यांनी सर्व मंडळांना केले आहे. वाहतूक कोंडी टाळण्यासाठी विशेष पथके नियुक्त करण्यात आली असून, शिस्तबद्ध पद्धतीने उत्सव होण्यासाठी प्रशासन दक्ष आहे. गणेशोत्सवाच्या निमित्ताने कर्जत तालुका भक्तिभावाने उजळला असून, पुढील दहा दिवस शहर व ग्रामीण भागात धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रम आणि भक्तिमय वातावरण अनुभवायला मिळणार आहे.

# युवा प्रशिक्षणार्थीचे मानधन तातडीने द्या : संभाजी माळवदे

## जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्याचा इशारा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा** : मुख्यमंत्री युवा प्रशिक्षनार्थी योजनेतर्गत सेवेत घेतलेल्या प्रशिक्षणार्थीचे मानधन तात्काळ देण्यात यावे या मागणीसाठी आज महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे संभाजी माळवदे यांनी जिल्हाधिकारी यांना भेटून निवेदन दिले.

सविस्तर वृत्त असे की, राज्यभरात रोजगार उपलब्ध करण्याचा मोठा गाजावाजा करत मागील शिंदे सरकारने निवडणूक डोळ्यासमोर ठेवून तरुणांनाची मते पदरात पाडून घेण्यासाठी युवकांसाठी मुख्यमंत्री युवा प्रशिक्षणार्थी योजना सुरु केली. राज्यभरातील तरुणांना अकरा महिन्याच्या कालावधीसाठी विविध विभागात दहा ते वीस हजार रुपये महिना देत कामावर हजर करून घेतले. परंतु अकरा महिण्यानंतर पुढे काय असा मोठा प्रश्न या तरुण प्रशिक्षनार्थी समोर उभा ठाकला आहे याशिवाय हजर झाल्यापासून चार पाच महिने उलटून गेले तरी या तरुणांना वेळेत पगार करण्यात आलेले नाही. याबाबत त्या विभागातील प्रमुखांना विचारल्यास ते कानावर हात ठेवत कौशल्य विभागाकडे जा अशी उत्तरे देत प्रश्न झटकून टाकतात. या प्रशिक्षणार्थी साठी फक्त जिल्ह्याच्याच ठिकाणी असणारा कौशल्य विभाग हा देखील या प्रशिक्षनार्थिना पगाराविषयीं विचारल्यास समाधानकारक उत्तरे देत नाही या सर्वच गोष्टींमुळे तरुण वर्ग हैराण होऊन पुरता मेटकुटीस आला आहे.

शेतकऱ्याप्रमाणे आत्महत्या करण्याची भाषा आता तरुण वर्ग करत आहे. कायमस्वरूपी काम तर नाहीच पण केलेल्या कामाचा मोबदला देखील नाही. प्रशिक्षनार्थीच्या या प्रश्नांची दखल घेत आज महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे संभाजी माळवदे यांनी अहिल्यानगरचे जिल्हाधिकारी यांची भेट घेत युवा प्रशिक्षणार्थिचे मानधन तात्काळ देण्यात यावे अशी मागणी केली. आठ दिवसाच्या आत मानधन दिले नाही तर जिल्हाभरातील प्रशिक्षनार्थीसह अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्याल्यावर मोर्चा काढण्याचा ईशारा निवेदणाद्वारे देण्यात आला. यावेळी जिल्हाधिकारी यांनी लवकरच कौशल्य विभागाची बैठक घेत हा प्रश्न सोडविला जाईल असे स्पष्ट केले. यावेळी नेवासा काँग्रेसचे शहराध्यक्ष अंजुम पटेल, कैलास बोर्डे, सतीश तऱ्हाळ, संदीप मोटे, आदिसह युवा प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

युवा प्रशिक्षणार्थी योजना राबवून युवकांची दिशाभूल या सरकारने केली आहे. कालावधी संपल्यावर पुढे काय? हा मोठा प्रश्न निर्माण होऊन बेरोजगारीमुळे आत्महत्या करण्याची वेळ या तरुणावर आली आहे. राज्यभरातील तरुणांना आता कायमस्वरूपी करण्यात यावे व वेळेवर योग्य वेतन देण्यात यावे या मागणीसाठी राज्यभरात लढा उभारणार- संभाजी माळवदे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी.

# टक्केवारी अन् दहशत करण्यासाठी सत्ता नको : डॉ. विखे पा.

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर** : टक्केवारी, दहशत करण्यासाठी सत्ता नको, सत्तेचा वापर विकासकामांसाठी झाला पाहिजे. पठार भागाच्या पाण्यासाठी स्व. बाळासाहेब विखे पाटील यांच्यापासून संघर्ष सुरु आहे. पुणे जिल्ह्याबरोबर लढण्याची हिम्मत फक्त विखे पाटील कुटुंबामध्ये आहे. स्व. बाळासाहेब विखे पाटील यांनी पाण्याचे पाहिलेले स्वप्न आपण पूर्ण करणार असल्याचे माजी खासदार सुजय विखे पाटील म्हणाले.

पठार भागाला पाणी मीच देणार, असे आश्वासन माजी खासदार सुजय विखे पाटील यांनी दिले. कान्हूरपठार (ता. पारनेर) येथे गुरुवार दि. २८ रोजी कार्यान्वित होणाऱ्या सिंचन योजनेच्या सर्वेक्षणाचा शुभारंभ माजी खासदर डॉ. सुजय विखे पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी ते बोलत होते.

या सोहळ्यात भाजप दक्षिण जिल्हाध्यक्ष दिलीपराव भालसिंग आणि आमदार काशिनाथ दाते प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. वडगाव दर्या निसर्ग पर्यटन केंद्रासाठी एकूण ९ कोटी रुपयांचा प्रस्तावित निधी असून, त्यातील



पहिला टप्पा म्हणून १.८० कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला आहे.

या निधीअंतर्गत प्रकल्पाचे विविध विकासकामे हाती घेण्यात येणार असून, ग्रामीण पर्यटनाला चालना मिळणार आहे. महाराष्ट्र शासनाचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी कान्हूर पठार भेटीत दिलेल्या आश्वासनानुसार, पारनेर तालुक्याच्या आवर्षणग्रस्त भागाला पाणी देणाऱ्या महत्त्वाकांक्षी सिंचन योजनेच्या सर्वेक्षणाचा शुभारंभ यावेळी करण्यात आला.

याप्रसंगी दादासाहेब सोनावळे, वसंतराव चेडे, महिला जिल्हाध्यक्षा अश्विनी थोरात, तालुकाध्यक्ष राहुल शिंदे, माजी सभापती गणेश शेळके, राजाराम एरंडे, नगरसेवक युवराज पठारे, अब्बास मुजावर, विक्रम कळमकर, दत्ता नाना पवार, डॉ. भाऊसाहेब खिलारी, सुभाष दुधाडे, सुषमा रावडे, सुधामती कवाद, संदिप वराळ, शिवाजी खिलारी, सखाराम ठुबे, वसंतराव ठुबे, अर्जुन नवले, सुयश वाळूंज, बबन व्यवहारे, कानिफनाथ ठुबे, सुशांत ठुबे, अनिकेत ठुबे, भरत ठुबे, आकाश सोनावळे, संदीप ठुबे, संपत लोंढे यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

> ज्या दिवशी मी निवडणूक जिंकली. त्याच दिवशी या पठार भागावर जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे यांच्या मार्फत तालुक्यातील चारही पाणी योजना मार्गी लावण्याचा निश्चय केला. चारही योजनेचा डीपीआर करण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याचे साकडे घातले. पठार भागांवरील सर्व शेतकऱ्यांना समृद्ध करण्यासाठी ही पाणी योजना अत्यंत महत्व पूर्ण असल्याने ही योजना मंत्री विखे पाटील यांच्यामार्फत पूर्ण होणार आहे.
>
> **–काशिनाथ दाते, आमदार**

डॉ. सुजय विखे पाटील म्हणाले की, जे माझी टिंगल करतात किंवा माझ्यावर हसतात ते लोक मला आवडतात. राजकारणात हार जित चालू असते. माझ्यासाठी पद महत्त्वाचे नाही तर काम महत्वाचे आहे. पठार भागाची सिंचन योजना नारळ फोडण्याचा पलीकडे गेली आहे. प्रत्येक वेळेस पश्चिमेकडील मंत्र्यांनी नारळ फोडला, त्यामुळे पठार भाग वंचित राहिला आहे. परंतु विखे पाटील परिवाराने दिलेला शब्द मीच पूर्ण करणार आहे. लोकसभेच्या निवडणुकीत जी चूक केली ती विधानसभेत दुरुस्ती गेली.

# लोणी बुद्रुक येथे ‘एक गाव एक गणपती’ची २५ व्या वर्षीही स्थापना

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी** : लोणी बुद्रुक येथे २५ व्या वर्षी एक गाव एक गणपतीची मूर्ती प्राणप्रतिष्ठा उत्साहात करण्यात आली. सौ. सुशीलाताई व जिल्हा बँकेचे जेष्ठ संचालक अण्णासाहेब म्हस्के यांच्या हस्ते विधिवत पूजा करून गणेश मूर्तीची स्थापना करण्यात आली.



यावेळी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, विखे कारखान्याचे अध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील, सरपंच कल्पना मैड, ट्रक्स वाहतूक संस्थेचे अध्यक्ष नंदकिशोर राठी, प्रवरा बँकेचे संचालक किसनराव विखे, तंटामुक्तीचे अध्यक्ष संपतराव विखे, विकास संस्थेचे अध्यक्ष अशोकराव धावणे, उपाध्यक्ष नाना म्हस्के, बाजार समितीचे संचालक राहुल धावणे, सी. एम. विखे, अनिल विखे, लक्ष्मण बनसोडे, नितीन विखे यांच्यासह आजी-माजी पदाधिकारी उपस्थित होते.

### एक गाव एक गणपतीची परंपरा

लोणी बुद्रुक येथे ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या संकल्पनेतून २००१ मध्ये एक गाव एक गणपती सुरू झाला. यावर्षी त्याला २५ वर्षे पूर्ण झाली आहेत. ग्रामस्थ, नागरिक, गणेश भक्त यांच्या एकत्रित प्रयत्नातून हा आदर्श उपक्रम अखंडपणे सुरू आहे. गणेश उत्सवात अनेक सांस्कृतिक कार्यक्रम व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.

# ‘अमृतवाहिनी’ला पाचव्यांदा एनबीएचे मानांकन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : माजी शिक्षण मंत्री बाळासाहेब थोरात व मा. आ. डॉ. सुधीर तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली उत्कृष्ट निकाल कॅम्पस प्लेसमेंट अत्याधुनिक सुविधा यामुळे नॅकचा अ प्लस दर्जासह विविध गुणवत्तेचे पुरस्कार मिळवलेल्या अमृतवाहिनी इंजिनिअरिंग कॉलेजला पाचव्यांदा एनबीएचे मानांकन मिळाले असल्याची माहिती प्राचार्य डॉ. एम. ए. व्यंकटेश यांनी दिली आहे.

अमृतवाहिनी इंजिनिअरिंग कॉलेजला मिळालेल्या या गुणवत्तेच्या मानांकनाबाबत अधिक माहिती देताना प्राचार्य डॉ. व्यंकटेश म्हणाले की, माजी शिक्षण मंत्री बाळासाहेब थोरात, माजी आमदार डॉ. सुधीर तांबे व संस्थेच्या कार्यकारी विश्वस्त शरयूताई देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली यावर्षी अमृतवाहिनी हे ऑटोनॉमस कॉलेज झाले आहे. यापूर्वी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा ग्रामीण भागातील उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार मिळवला असून नॅकचा अ प्लस दर्जा मिळवला आहे.

> स्वच्छ व सुंदर हिरवा परिसर, उच्च गुणवत्ता, प्लेसमेंट सुविधा निर्माण करून देताना विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा. यासाठी महाविद्यालयातून प्रयत्न होत असून अमृतवाहिनीतील विद्यार्थ्यांमध्ये नवनिर्मिती व संशोधनास प्रोत्साहन मिळावे, याकरिता सातत्याने विविध उपक्रम राबविण्यात येत आहे.
>
> **– शरयूताई देशमुख**

महाविद्यालयातील गुणवत्ता विद्यार्थ्यांसाठीच्या चांगल्या सुविधा, प्लेसमेंट, होस्टेल, अनुभवी शिक्षक, अद्यावत इमारत, क्रीडांगण, महाविद्यालयात राबविण्यात येणारे विविध शैक्षणिक व संशोधनात्मक उपक्रम या सर्वांचा आढावा घेऊन नॅशनल बोर्ड ऑफ ॲक्रीडेशन इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजीनियरिंग आयटी इंजीनियरिंग आणि सिविल या विभागांना पाचव्यांदा एमबीएचे मानांकन दिले आहे. पदवी अभ्यासक्रम व पदवी एम टेक आणि पीएचडी संशोधन केंद्र सुद्धा या कॉलेजमध्ये कार्यरत आहेत.



या मानांकरासाठी विभाग प्रमुख डॉ. आर. पी. लबडे, डॉ. बी. एल. गुंजाळ, डॉ. एस. बी. कांडेकर यांच्यासह त्या विभागातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष मेहनत घेतली.

अमृतवाहिनी इंजिनिअरिंग कॉलेजला पाचव्यांदा एनबीएचे मानांकन मिळाल्याबद्दल माजी मंत्री बाळासाहेब थोरात, मा. आमदार डॉ. सुधीर तांबे, संस्थेच्या कार्यकारी विश्वस्त शरयू देशमुख, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल शिंदे, अकॅडमी डायरेक्टर डॉ. जे. बी. गुरव, डॉ. जयश्री थोरात, प्राचार्य डॉ. एम. ए. वेंकटेश, रजिस्टर प्रा. विजय वाघे आदींसह विविध मान्यवरांनी अभिनंदन केले आहे.

# सात्रळ पंचक्रोशीत प्रवरा सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन

## कलाकारांच्या सुप्त क्षमतांना वाव देणारा उपक्रम; पदाधिकाऱ्यांचेही मार्गदर्शन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**सात्रळ** : ना. डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या संकल्पनेतून सालाबादप्रमाणे प्रवरा सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन सात्रळ पंचक्रोशीतील ग्रामस्थ, परिसरातील शाळा व महाविद्यालयाचे प्रमुख तसेच विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या माध्यमातून करण्यात आल्याची माहिती ॲड. बाळकृष्ण चोरमुंगे पाटील यांनी दिली.

सदर महोत्सव साजरा करावयाच्या अनुषंगाने सात्रळ येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमध्ये सहविचार सभा आयोजित करण्यात आली होती. यावेळी अण्णासाहेब कडू पाटील, जे. पी. जोर्वेकर, सुभाष नामदेव अंत्रे, पोपटराव



वाणी, इंजिनीयर जोर्वेकर, वाणी अभिनव शामराव, राजेंद्र हापसे, राजेंद्र खळदकर, मुख्याध्यापक कुटे एस. डी., कानगुडे एच. टी., सांगळे प्रभाकर अण्णा, डॉ. लोखंडे अनिल, सोमनाथ डोळे, अनिल वाघचौरे, सुनील सात्रळकर, आदी उपस्थित होते.

थिंक ग्लोबली ॲक्ट लोकली, प्रवरा सांस्कृतिक महोत्सवासाठी सात्रळ पंचक्रोशी सज्ज झाली आहे. लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या माध्यमातून, तसेच जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे, माजी खासदार डॉ. सुजय विखे, शिक्षण संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे यांच्या मार्गदर्शनाखाली मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे नियोजन केले आहे.

समाज प्रबोधनात्मक संस्कारशील कार्यक्रम, पर्यावरण जागृती, स्वच्छता, महिला सुरक्षा, शिस्त आणि शांततेत कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडणे, ही आपल्या सर्व ग्राम स्थांची सामूहिक जबाबदार असल्याचे मत प्रतिपादन संस्थेचे संचालक ॲड. आप्पासाहेब कारभारी दिघे पाटील यांनी केले.

सामाजिक आणि सांस्कृतिक जबाबदारीचे भान ठेवून प्रवरा संस्कृती महोत्सव दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी मोठ्या उत्साहात आपण साजरा करत आहोत. या महोत्सवातील कार्यक्रम हे विद्यार्थी केंद्रित असल्याचे मत आबासाहेब घोलप यांनी व्यक्त केले.

> प्रवरा सांस्कृतिक महोत्सव सात्रळ येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या प्रांगणात दि. २ सप्टेंबर रोजी सायंकाळी साडेपाच वाजता मोठ्या उत्साहात साजरा होणार आहे. त्यासाठी मंडप व बैठकीची प्रशस्त व्यवस्था राहणार आहे. सांस्कृतिक कार्यक्रमात संस्थेच्या सहा शाखांचा व इतर नऊ विद्यालयांचा सहभाग राहील. सदरच्या सांस्कृतिक उपक्रमात ४७४ नवोदित विद्यार्थी कलाकारांनी सहभाग घेणार आहे.
>
> **– के. बी. बारगुजे, प्राचार्य**

# कर्मचाऱ्यांअभावी शहरात कचऱ्याचे साचले ढीग

## कोपरगाव नगरपरिषदेचे कंत्राटी कामगार संपावर

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव शहर** : कोपरगाव नगरपरिषदेचे कंत्राटी कामगार किमान वेतन कायद्याप्रमाणे पगार मिळावा, यासाठी मागील तीन दिवसांपासून संपावर गेले असून त्यामुळे नगरपरिषदेच्या कचरा गाड्या बंद असल्याने शहरातील अनेक प्रभागांमध्ये कचऱ्याचे ढीग साचले आहे.



शहरात पावसाच्या सरी अधून-मधून कोसळत असल्यामुळे रोगराईचे प्रमाण वाढत आहे. नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे. तेव्हा नगरपरिषदेच्या आरोग्य विभागाने कचरा संकलनासाठी कर्मचारी व घंटा गाड्यांचा ठेका नाशिक येथील ठेकेदाराला दिला असून संबंधित ठेकेदार किमान वेतन कायद्याप्रमाणे पगार न देता त्या कायद्याची पायमल्ली करत नियम धाब्यावर ठेऊन कर्मचाऱ्यांना नाममात्र पगार देत आहे.

यामध्ये झाडू मारणाऱ्या महिला कर्मचाऱ्यांना २४० रुपये रोज दिला जातो. तर कचरा संकलन करणाऱ्या घंटा गाड्यावरील चालकास ३०० रुपये रोज तर या गाड्यांवर काम करणाऱ्या हेल्परला २६५ रुपये पगार दिला जाते, अशी माहिती समजते.

तेव्हा सदर कर्मचाऱ्यांचे पगार हे किमान वेतन कायद्याची पायमल्ली करणारे असून कंत्राटी कर्मचाऱ्यावर अन्याय करणारे आहे. तेव्हा कंत्राटी कर्मचाऱ्यांना किमान वेतन कायद्याप्रमाणे पगार मिळविण्यासाठी कंत्राटी कर्मचाऱ्यानी मागील तिन दिवसापासून काम बंद केले असून शहरातील मुख्य बाजारपेठेसह शहरातील अनेक प्रभागातील रस्त्याच्या कडेला व चौका चौकात कचऱ्याचे डेपो तयार होऊ दुर्गंधी पसरत आहे. दरम्यान, हीच परिस्थिती उद्या देखील राहिल्यास कोपरगाव शहरातील नागरिकांच्या आरोग्याचा मोठा प्रश्न निर्माण होण्याची दाट शक्यता आहे.

# ओमकाराच्या गजराने सामुदायिक अथर्वशीर्ष पठण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अकोले** : अकोले तालुक्यातील कोतुळ येथे ऋषिपंचमी निमित्त श्री वरदविनायक मंदिरात सामुदायिक अथर्वशीर्ष पठण भक्तीमय वातावरणात संपन्न झाले.



श्री गणेशाची उपासना ही ऐक्य, बंधुभाव वाढवणारी व राष्ट्रीय एकात्मता व कार्यक्षमता वाढवणारी आहे. म्हणून कोतूळ येथील प्राचीन व नवसाला पावणाऱ्या श्री वरदविनायक मंदिरात जय भवानी संस्कृती संवर्धन मंडळाच्यावतीने ऋषिपंचमी निमित्त गुरुवार दि.२८ ऑगस्ट रोजी पहाटे ६ वाजता सामुदायिक अथर्वशीर्ष पठणाचे आयोजन करण्यात आले होते.

कोतूळसारख्या ग्रामीण भागात जय भवानी संस्कृती संवर्धन मंडळाच्या वतीने सामुदायिक अथर्वशीर्ष पठणाचे हे तेरावे वर्ष होते. भाविकांचा वाढता प्रतिसाद हे या कार्यक्रमाचे आगळेवेगळे वैशिष्ट्य ठरले.

काल पहाटे सहा वाजता शंखनाद व ओमकाराच्या गजराने अथर्वशीर्ष पठणाची सुरुवात झाली. यावेळी मंदिर परिसरातील वातावर चैतन्यमय झाले होते. अथर्वशीर्ष पठणाचे नेतृत्व परिमल भाटे, विद्या परशुरामी यांनी केले. एका स्वरातील मंत्र पठणाने परिसरातील वातावरण भक्तीमय झाले होते. अनिता व देवानंद पोखरकर यांच्या हस्ते गणपतीची आरती करण्यात आली.

देवस्थानच्या वतीने अध्यक्ष प्रदीप भाटे यांनी त्यांचा सन्मान केला. यावेळी डॉ. सुभाष सोमण, वासुदेव साळुंके, अनिल पाठक, बाळासाहेब पोखरकर, संभाजी पोखरकर, विशाल बोऱ्हाडे, गुरुप्रसाद धुमाळ, कुलदीप नेवासकर हे उपस्थित होते. यावेळी ऋषीपंचमीनिमित्त महिलांनी ऋषींचे विधिवत पूजन केले. विद्या परशुरामी यांनी पोथी वाचन केले.

> विनय समुद्र, विशाल बोऱ्हाडे, सचिन पाटील, संतोष घाटकर, सागर सोनुले, निलेश घोडे, अजित आरोटे, वर्षा नेवासकर, वंदना पाठक, विद्या परशुरामी, सविता घाटकर, प्रियंका पाटील, द्वारका पोखरकर, प्रियांका नेवासकर, प्रज्ञा भाटे, वृषाली समुद्र आदींनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले आहे.

# सांस्कृतिक कार्यक्रमातून वृक्ष संवर्धनाचा संदेश द्यावा : फुलारी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा** : अहिल्यानगर जिल्ह्यातील गणेश मंडळांनी गणेशोत्सव कालावधीत देखावे, सांस्कृतिक कार्यक्रमातून शास्वत ग्रामविकास, वृक्ष संवर्धन, प्लॅस्टिक मुक्ती, रेनवॉटर हार्वेस्टिंग, जल पुनर्भरण, पाणी बचत, जलसाक्षरता याबाबत जनजागृती करावी, असे आवाहन निसर्ग मित्र फाउंडेशनचे अध्यक्ष जलमित्र सुखदेव फुलारी यांनी केले आहे.



जलमित्र फुलारी म्हणाले की, राज्यासह अहिल्यानगर जिल्ह्यामधील दिवसेंदिवस खालावत जाणारी भूजल पातळी हा चिंतेचा विषय बनलेला आहे. यावर्षी धरणे भरली असली तरी अहिल्यानगर जिल्ह्यातील अनेक तालुक्यात आणि गावात अद्याप ही समाधान कारक पाऊस झालेला नाही. सातत्याने कमी कमी होत जाणारे पर्जन्यमान, उपलब्ध पाण्याचा होणारा भरमसाठ उपसा यामुळे पाण्याची समस्या गंभीर बनत आहे. जमीनीवर आणि जमिनीखाली उपलब्ध असलेले पाणी उपसण्याची जणू स्पर्धाच सुरू आहे. उपस्याच्या प्रमाणात भूजल पुनर्भरण ही काळाची गरज बनली आहे.

> जनतेमध्ये वृक्ष लागवड व संवर्धनाचे महत्व, मृद व जलसंधारण, प्लास्टीक मुक्ति व जलसाक्षरता निर्माण करण्यासाठी गणेशोत्सव हे प्रभावी माध्यम ठरणार आहे. त्यामुळे नगर जिल्ह्यातील गणेश मंडळांनी गणेशोत्सव कालावधीत देखावे, सांस्कृतिक कार्यक्रमातून वृक्ष संवर्धन, रेनवॉटर हार्वेस्टिंग तसेच गाव विकासाच्या दृष्टीने जलयुक्त गाव या संकल्पनानांवर आधारित जनजागृती करावी.
>
> **– सुखदेव फुलारी**

# प्रभावी शोध मोहीम तातडीने राबवा : आ. तांबे

## नदीपात्रात वाहून गेलेल्या तरुणाच्या शोधासाठी आ. तांबे यांचा पुढाकार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : मंगळवारी रात्री कचरा टाकण्यासाठी गेलेल्या रंगारगल्ली येथील विजय संभाजी कुटे यांचा तोल जाऊन ते नदी पाण्यात वाहून गेले. ही बातमी समजतात आ. सत्यजित तांबे यांनी तातडीने घटनास्थळाला भेट देऊन कुटुंबीयांचे सांत्वन करत कुटे यांच्या शोधासाठी तातडीने प्रभावी उपाययोजना राबवा अशा सूचना प्रशासनाला दिल्या आहेत.

गणेश चतुर्थीच्या पार्श्वभूमीवर रंगार गल्ली येथील राहणारे विजय संभाजी कुटे (वय ४०) हे आपल्या स्कुटीवरून कचरा टाकण्यासाठी प्रवरा नदीच्या कडेला गेले. गाडी कडेला लावताना त्यांचा तोल जाऊन ते पाण्यामध्ये पडले आणि नदीच्या पुराच्या पाण्यात ते वाहून गेले. त्यांचा अद्याप शोध लागला नसल्याने संगमनेरमध्ये मोठे चिंतेचे वातावरण असून घटनांची बातमी कळताच आ. सत्यजित तांबे यांनी घटनास्थळाला भेट देऊन तातडीने प्रभावी उपाययोजना राबवा अशा सूचना केल्या. याचबरोबर काही पथक अहमदनगर आणि पुण्यावरून मागवा, अशा सूचनाही आ. तांबे यांनी प्रशासनाला दिल्या आहेत. यावेळी पोलिस उपअधीक्षक डॉ. कुणाल सोनवणे यांच्यासह विविध शासकीय अधिकारी उपस्थित होते.

नदीला जास्त पाणी आल्याने तरुणांनी व नागरिकांनी अधिक सतर्क राहावे, असे आवाहनही मा. मंत्री थोरात यांनी केले असून आपल्या यशोधन कार्यालयामार्फतही नागरिकांना विविध सुविधा देण्यात याव्या, अशा सूचना केल्या आहेत.

यावेळी संगमनेरमधील विविध गणपती मंडळाचे पदाधिकारी व युवक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### माजी मंत्री थोरातांकडून कुटेंचे सांत्वन

विजय कुटे हे सामाजिक कार्यकर्ते होते. मंगळवारी रात्री घटना घडल्यानंतर अद्याप त्यांचा शोध न लागल्याने संगमनेरमध्ये चिंतेचे वातावरण असून तातडीने विविध शोध पथके मागून त्यांचा शोध घ्या, अशा सूचना आ. तांबे यांनी प्रशासनाला दिले आहे. याचबरोबर माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनीही विजय यांचे वडील संभाजी कुटे यांचे सांत्वन केले आहे.



# श्रीरामपूर भाजपाच्या शहर उपाध्यक्षपदी ओझा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : येथील व्यापारी व मर्चंट असोसिएशनचे संचालक योगेश ओझा यांची श्रीरामपूर शहर भाजपाच्या उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.



ओझा हे गेल्या अनेक वर्षांपासून भारती जनता पक्षाचे काम करीत असून ते सामाजिक कार्यात अग्रेसर असतात. त्यांच्या सामाजिक कार्य व पक्षावर असलेली निष्ठा पाहून त्यांची निवड करण्यात आली. भाजपाचे प्रदेशाध्यक्ष आ. रवींद्र चव्हाण, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, डॉ. सुजय विखे पाटील यांच्या आदेशानुसार जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर व शहराध्यक्ष जितेंद्र छाजेड यांच्या हस्ते ओझा यांना निवडीचे पत्र नुकतेच देण्यात आले. त्यांच्या निवडीचे शहरातील नागरिकांसह व्यापारी वर्गातून स्वागत होत आहे.

# अस्मिता



## पर्याय चॉकलेट वॅक्सचा

ब्युटी टॉक

शरीरावरील अनावश्यक लव काढून टाकण्यासाठी वॅक्सिंगचा पर्याय निवडला जातो. मात्र साखरेच्या वॅक्ससोबतच अलिकडे चॉकलेट वॅक्स हा प्रकारही प्रचलित आहे. चॉकलेट वॅक्सच्या लाभांविषयी...

* साखरेच्या वॅक्समध्ये लिंबू, मधासारखे घटक असतात. हे घटक त्वचेला तजेला देतात. पण चॉकलेट वॅक्समध्ये कोको, सोयाबिन ऑईल, बदामाचं तेल, ग्लिसरिन, विविध प्रकारची जीवनसत्त्वं, ऑलिव्ह ऑईल असे घटक असतात. त्यामुळे चॉकलेट वॅक्समुळे त्वचेला जास्त पोषण मिळतं.

* कोरडी आणि संवेदनशील त्वचा असणाऱ्यांनी चॉकलेट वॅक्स करून घ्यायला हवं.

* चॉकलेट वॅक्समध्ये एसेन्शियल ऑईल्स असतात. यामुळे वॅक्सिंगनंतर त्वचा छान तजेलदार दिसते.

* उन्हामुळे त्वचा टॅन झाली असेल तर चॉकलेट वॅक्सचा पर्याय निवडा. यामुळे त्वचा उजळ दिसू लागते.

* चॉकलेट वॅक्समुळे वॅक्सिंग करताना होणाऱ्या वेदनांची तीव्रता कमी होते.

* काही वेळा साध्या वॅक्सिंगमध्ये अंगावरची लव पटकन निघत नाही. पण चॉकलेट वॅक्समुळे एकाच प्रयत्नात लव निघून जाते आणि तुमची त्वचाही छान मुलायम होते.

* वॅक्सिंग केल्यानंतर चॉकलेट वॅक्सचा मंद सुगंध दरवळू लागतो. हा सुगंध बराच वेळ टिकून रहातो. त्यामुळे आपल्याला ताजंतवानं वाटतं.

## हे सक्षम महिलांचे स्टेशन

सध्या महिला सक्षमीकरणासाठी नानाविध पातळीवर प्रयत्न होताना दिसतात. त्यांना समाजात सन्मान, मानाचे स्थान आणि सर्व पुरुषांच्या बरोबरीने संधी मिळाव्या, यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले जातात. असे असताना आकुर्ली मुंबई मेट्रो स्टेशन हे स्त्रीशक्ती आणि सक्षमीकरणाचे एक अनोखे उदाहरण म्हणून लक्षात घ्यावे लागेल कारण हे स्टेशन पूर्णपणे महिलांकडून कार्यान्वित केले जाते. इथे काम करणाऱ्या महिला कर्मचारी अत्यंत निष्ठेने आणि तत्परतेने आपली जबाबदारी पार पाडतात. म्हणूनच या सर्वांना मानाचा मुजरा करावासा वाटतो.




मानिनी

इथल्या महिला कर्मचाऱ्यांनी सांगितले की, त्यांना त्यांचे काम करण्याचा अभिमान वाटतो. ग्राहक संबंध व्यवस्थापन पर्यवेक्षक शिल्पा कैलाश अहिरे आपल्याला सांगतात, 'मी येथे व्यावसायिक विभागात काम करते. महसूल आणि ग्राहकांच्या सर्व तक्रारी हाताळते. इथे मी येणाऱ्या सगळ्या आव्हानांना तोंड देते आणि परिस्थिती सुधारण्याचा प्रयत्न करते. मला माझ्या कामाचा अभिमान आहे. मी सध्या चार स्थानके हाताळत आहे. त्यापैकी हे एक सर्व महिलांकडून कार्यान्वित होणारे स्थानक आहे.'

शिल्पा कैलाश पुढे सांगतात, 'अनेक महिलांना अनेक अडचणींचा साम ना करावा लागतो. मुख्य म्हणजे यातील काही अडचणींबाबत त्या पुरुष कर्मचाऱ्यांशी बोलू शकत नाहीत. अशा स्त्री कर्मचाऱ्यांना भावनिकदृष्ट्या योग्य पद्धतीने हाताळावे लागते. एका महिलेने दुसऱ्या महिलेला आधार दिला तरच ती सक्षम होऊ शकते.'

या स्टेशनमध्ये महिला कर्मचारी तीन शिफ्टमध्ये काम करतात. मेट्रो स्टेशन नियंत्रक म्हणून इथे मनीषा राजेंद्र सावंत जबाबदारी सांभाळतात. त्या म्हणतात, 'मी येथे स्टेशन नियंत्रक म्हणून काम करते. स्टेशनवर होणाऱ्या कामाचे व्यवस्थापन करणे ही माझी मुख्य जबाबदारी आहे. मी प्रवाशांशी संबंधित सर्व कामे हाताळते. हे नक्कीच एक आव्हानात्मक काम आहे, पण अशक्य नाही. महिला कोणतेही काम कुशलतेने हाताळू शकतात, हे आम्ही सिद्ध केले आहे. इथे तुमच्या वाढीसाठी खूप वाव आहे.'

या मेट्रो स्टेशनमध्ये ट्रेन ऑपरेटर म्हणून कार्यरत असणाऱ्या निकिता महेंद्र धनावडेही मोकळेपणाने आपले मत मंडताना म्हणतात, 'मला सरकारी कर्मचारी असल्याचा अभिमान आहे. गेल्या पाच वर्षांपासून मी इथे कार्यरत आहे. मेट्रो ट्रेन ऑपरेटर म्हणून माझी भूमिका खूप महत्त्वाची आहे. पण स्वत:ला खूप भाग्यवान समजते की, या नोकरीसाठी माझी निवड करण्यात आली. मी कोविडच्या आधीपासूनच इथे आले. कोविडदरम्यान, आम्हाला ऑनलाइन आणि ऑफलाइन प्रशिक्षण मिळाले. हे प्रशिक्षण हैदराबादमध्ये पूर्ण केले. मला या कामाचा आणि सरकारी कर्मचारी असल्याचा अभिमान आहे. माझी जबाबदारी लोकांना त्यांच्या गंतव्यस्थानावर पोहोचवणे ही आहे. वैद्यकीय आपत्कालीन परिस्थितीत आम्ही प्रवाशांना त्वरित मदत देण्याचा प्रयत्न करतो. समाजही आमच्या या कामाचा आणि महत्त्वपूर्ण भूमिकेचा गौरव करतो.' तेव्हा आगामी काळात अशा मानिनींची संख्या वाढेल अशीच अपेक्षा करु या.

## कलिंगड खरेदी करताना...

स्मार्ट खरेदी

उन्हाळ्यात टरबूज अर्थात कलिंगड खायला कोणाला आवडत नाही! उष्णतेपासून सुटका देणाऱ्या या थंडगार आणि रसरशीत फळाचे आवडीने वेगवेगळ्या प्रकारे सेवन केले जाते. पण टरबूज कसे खरेदी करायचे हे सर्वांनाच माहिती नसते. स्वाभाविकच अगोड, फुकट रंगाचे टरबूज पाहून विरस होतो. तेव्हा योग्य टरबूज खरेदी करण्यासाठी काही गोष्टी नक्की लक्षात ठेवा.

**वजन तपासा**

चांगले टरबूज जड असते. टरबूज हलके असेल तर आतून कोरडे किंवा रंगहीन असण्याची शक्यता असते. म्हणूनच टरबूज खरेदी करताना त्याचे वजन तपासा. गोड टरबूज वजनाला जड असते. जड असण्याचे कारण म्हणजे त्यात पाणी असते आणि रसाळही असते. टरबूज सुकले असता आतील पाणीही सुकते आणि खाताना गोडीही कमी वाटते.



**रंग आणि पोत तपासा**

चांगल्या टरबूजाचा रंग एकसारखा आणि चमकदार असतो. त्याचमुळेच कलिंगडाचा रंग असमान असेल तर ते आतून खराब असल्याची दाट शक्यता असते, हे लक्षात घ्या. तसेच खरेदी करताना टरबूजाचा पोत तपासा. चांगल्या टरबूजाचा पोत पातळ असतो. मात्र त्याची साल खूप मऊ नसते. त्यामुळे साल खूप मऊ असेल तर ते टरबूज फिके निघते, हे लक्षात ठेवा. चांगले कलिंगड वरच्या बाजूला थोडा कठीण असते.

**पिवळा डाग तपासा**

टरबूज बारकाईने बघितले तर त्यावर एक लहान पिवळा डाग दिसतो. टरबूजावर हा पिवळा डाग असेल तर समजून घ्या की फळ व्यवस्थित पिकले आहे आणि आतून लाल आहे. सूर्यप्रकाशामुळे कलिंगड शेतात असताना त्यावर हा डाग दिसतो. मात्र तो नसल्यास ते कच्चे वा रसायनांचा वापर करुन पिकवले असल्याचा धोका असतो. असे कलिंगड बेचव लागते. म्हणूनच पिवळसर डाग असणारे कलिंगडच खरेदी करा. हे फळ आतून गोड असल्याचे प्रमुख लक्षण आहे.

## पीएचडीची तयारी?

स्कील डेव्हलपमेंट

अनेक महिलांना उच्च शिक्षण घ्यायचं असतं. संशोधन करायचं असतं. आपल्या आवडत्या विषयात पीएचडी करण्याची इच्छा असते. पण अनेक कारणांमुळे महिला पीएचडी करायला घाबरतात. यासाठी वेळ देता येईल का नाही, अशी भीती त्यांना वाटते. पण पीएचडीसारखी पदवी मिळवल्यामुळे महिलांचा आत्मविश्वास अनेक पटींनी वाढू शकतो. पीएचडीच्या दिशेने पाऊल पुढे टाकताना काय करता येईल याविषयी...

* पीएचडीचा कालावधी तीन ते सहा वर्षांपर्यंत असू शकतो. या काळात खूप संशोधन करावं लागतं. एवढी वर्षं एखाद्या विषयातला रस टिकून रहाणंही गरजेचं असतं. त्यामुळे आपली आवड ओळखून मगच पीएचडीचा विषय निवडा.

* पीएचडीचा विषय ठरवताना ऑनलाईन संशोधन तुमच्या कामी येऊ शकतं. काही संस्थांमध्ये मास्टर्स आणि पीएचडी असे दोन्ही अभ्यासक्रम एकत्रित पूर्ण करता येतात.



* भारतासह परदेशात पीएचडी करण्याचा पर्यायही तुमच्याकडे आहे. अमेरिका, इंग्लंड आणि ऑस्ट्रेलियसह युरोपियन देशांमध्येही अनेक संधी आहेत. इथे तुम्हाला स्कॉलरशीपही मिळू शकते.

* पीएचडीसाठी तीन ते पाच वर्षं देण्याबाबत मनात शंका असेल तर मास्टर्सपासून सुरूवात करा.

* विविध विद्यापीठे, संस्थांमध्ये पीएचडी अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. तेव्हा विविध विद्यापीठांमध्ये अर्ज करत रहा. या क्षेत्रातल्या संधीचा शोध घ्या.

## सर्वात मोठे आव्हान



समाजभान

आजकाल इंटरनेट आपल्या जीवनाचा एक महत्त्वाचा भाग बनले आहे. शिक्षण, काम आणि मनोरंजनासाठी त्याचा वापर होतो. तथापि, इंटरनेटवर अशाही काही गोष्टी आहेत ज्या समाजासाठी हानिकारक ठरत आहेत. अशीच एक गोष्ट म्हणजे पोर्नोग्राफिक साइट्स. या स्थळांना भेट देणाऱ्या लोकांची संख्या सातत्याने वाढत आहे. एका अहवालानुसार, भारतात पॉर्न चित्रपट पाहण्याचा ट्रेंडही वाढला असून सुमारे १२ टक्के वेबसाइट्स पोर्नोग्राफिक चित्रपटांशी जोडलेल्या आहेत. आजकाल लोकांना पोर्नोग्राफिक चित्रपट सहज पाहता येतात. त्यातच १८ वर्षांखालील ९० टक्के मुले आणि ६० टक्के मुलींनी कधी ना कधी अश्लील चित्रपट पाहिले असल्याचे हा अहवाल सांगतो. आज पहिल्यांदा पॉर्न पाहण्याचे सरासरी वय १२ वर्षे मानले जात आहे. म्हणूनच ही बाब संगोपनाच्या तसेच सामाजिक स्वास्थ आणि स्त्री सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वाची ठरते.

पोर्नोग्राफिक चित्रपटांमध्ये अंदाजे ८८ टक्के शारीरिक हिंसाचार असतो, ४८ टक्के प्रकरणांमध्ये तोंडी हिंसाचार असतो आणि ९४ टक्के महिलांना लक्ष्य होताना दाखवले जाते. या व्हिडिओंमध्ये पुरुष नेहमीच शक्तिशाली तर महिलांना आज्ञाधारक दाखवले जाते. ही बाबही पुरुष आणि महिलांमधील असमानता प्रतिबिंबित करते आणि महिलांवरील लैंगिक हिंसाचाराला प्रोत्साहन देते.

या अहवालात असेही म्हटले आहे की, पोर्नोग्राफिक चित्रपट पाहण्याच्या बाबतीत भारत जगात तिसऱ्या क्रमांकावर आहे तर बलात्काराच्या घटनांमध्ये चौथ्या क्रमांकावर आहे. लैंगिक हिंसाचाराचा महिलांच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर खूप वाईट परिणाम होतो. भारतात दररोज अंदाजे ९३ महिलांवर बलात्कार होतात. तेव्हा बलात्काराच्या या वाढत्या घटनांमुळे पोर्नोग्राफिक चित्रपट आणि लैंगिक हिंसाचार यांच्यातील संबंध तपासण्याची गरज आता व्यक्त होते आहे.

इंटरनेटवरील अश्लील सामग्रीविरुद्ध सरकारने बरेच नियम केले आहेत. माहिती तंत्रज्ञान कायदा २००० अंतर्गत, इंटरनेटवर अश्लील सामग्री पसरवणे किंवा पोस्ट करणे हा गुन्हा आहे. एखाद्या व्यक्तीने असे केले तर त्याला शिक्षा होऊ शकते. मुलांच्या बाबतीत हा कायदा आणखी कडक आहे, जेणेकरून मुलींना तसेच लहानग्यांना ऑनलाइन शोषणापासून वाचवता येईल. मात्र असे असले तरी सगळ्यांना त्याची जाण नाही. ती निर्माण करणे हे आजच्या काळातील सर्वात मोठे आव्हान आहे.



## आहारात हव्या चिया सीड्स

स्टे हेल्दी

चिया सीड्स अर्थात चिया बिया सध्या अनेकांच्या आहाराचा एक महत्त्वाचा भाग आहेत. या लहान बियांमध्ये कॅल्शियम, मँगनीज, मॅग्नेशियम, सेलेनियम, तांबे, लोह आणि फॉस्फरस भरपूर प्रमाणात असते. त्यामध्ये अँटीऑक्सिडंट, अल्फा-लिनोलेनिक ॲसिड, ओमेगा-३ फॅटी ॲसिड आदीचे प्रमाण देखील जास्त प्रमाणात असते. अनेक अभ्यासातून दिसून आले आहे की, चिया सीड्स आहारात असल्यास हृदयरोग आणि कर्करोगाचा धोका कमी होतो. खेरीज वजन कमी करण्यासाठी देखील त्याचे सेवन फायदेशीर ठरते.

असे असताना तुम्ही केवळ दोन आठवडे दररोज आहारात या बियांचा समावेश केला तर आश्चर्यकारक परिणाम बघायला मिळतील. कारण चिया सीड्समध्ये विरघळणारे फायबर भरपूर प्रमाणात असते. विरघळणारे फायबर पाण्याशी संयोग साधून जेलसारखा पदार्थ तयार करते. हा घटक मल मऊ करतो तसेच पचनास मदत करतो. या बियांमध्ये ४० टक्के फायबर असल्यामुळे मलावरोधाची समस्या दूर होते आणि पचनसंस्था वेगाने सुधारते.

चिया सीड्स प्री-बायोटिक म्हणूनही काम करतात. त्यामुळेच आतड्यांच्या आरोग्यरक्षणात त्यांची महत्त्वाची भूमिका दिसते. प्री-बायोटिक्स संयुगे आतड्यांमधील चांगल्या बॅक्टेरियांना पोषण देतात आणि त्यांच्या वाढीस तसेच संतुलित मायक्रोबायोम राखण्यास मदत करतात. हे सर्व आतड्यातील सूक्ष्मजीव पचन, रोगप्रतिकारक शक्ती आणि मानसिक आरोग्य सुधारण्यासाठी महत्त्वाचे ठरते. तज्ज्ञांच्या मते, चिया बियांमध्ये असणारे फायबर प्री-बायोटिक म्हणून काम करणाऱ्या आतड्यांतील फायदेशीर बॅक्टेरियांना पोषण देत असल्यामुळे आतड्यांना मजबुती मिळते आणि आरोग्य सुधारते.



तुम्ही दोन आठवडे दररोज चिया बियाचा आहार समावेश केला तर आतडे हायड्रेट राहण्यास मदत होते कारण या सीड्स खाल्ल्यानंतर तुम्ही जास्त पाणी पिता. स्वाभाविकच यामुळे हायड्रेशन वाढते आणि पचनसंस्थेच्या समस्या टाळता येतात. तज्ज्ञांच्या मते, चिया सीड्स वजनाच्या १० पट पाणी शोषून घेतात आणि एक जेल तयार करतात. हे जेल शरीर हायड्रेटेड ठेवण्यास मदत करते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे चिया बियांमधील विरघळणारे फायबर रक्तातील साखरेचे शोषण कमी करते. स्वाभाविकच यामुळे रक्तातील साखरेची वाढ रोखली जाते.

## सदाबहार जीन्स

स्टाईल स्टेटमेंट

बाजारात विविध प्रकारच्या जीन्स उपलब्ध आहेत. प्रत्येक जीन्सची स्वत:ची खासियत आहे. तेव्हा तुमच्या वॉर्डरॉबमध्येही यापैकी काही जीन्स असायलाच हव्यात. अशाच काही ट्रेंडी जीन्सवर एक नजर टाकू या.

* कम्फर्ट आणि स्टाईल या दोहोचं मिश्रण फ्लेअर अँकल स्कीनी जीन्समध्ये आढळतं. या जीन्सवर लाँग शर्ट किंवा टॉप घालता येईल.

* फ्लेअर लेग जीन्स हा प्रकारही इन आहे. यावर शॉर्ट शर्ट किंवा टॉप घाला. या जीन्ससोबत बूट किंवा मोजडी घालता येतील.

* कूल लूकसाठी स्ट्रेट लेग जीन्स ट्राय करता येईल. त्यावर ऑफ शोल्डर किंवा क्रॉप टॉप घाला.

* स्लीम वाईड लेग्ड जीन्स हा प्रकार सदाबहार आहे. त्यावर कोणत्याही प्रकारचा टॉप, शर्ट किंवा कुर्ता चांगला दिसेल.

* स्कीनी जीन्सवर टी शर्ट किंवा क्रॉप टॉप घालता येईल.

* क्लासी लूकसाठी बूटकट जीन्स ट्राय करा.

* पलाझो स्टाईल वाईड लेग जीन्स हा प्रकारही इन आहे. ही जीन्स तुम्हाला हटके लूक देऊन जाईल.

* पेपर बॅग वेस्ट पँटवर ट्यूब टॉप ट्राय करता येईल.

स्कीन केअर

### वापरा सायीचं स्क्रब



दुधावरची साय त्वचेसाठी वरदान ठरू शकते. सायीपासून छानसा फेस पॅक तयार करता येईल. यासाठी चमचाभर साय घ्या. त्यात अर्धा चमचा ओट्स घाला. हे मिश्रण स्क्रबप्रमाणे काम करेल. यामुळे मृत त्वचा दूर होईल. त्वचेचा काळपटपणा कमी करण्यासाठी या स्क्रबचा नियमित वापर करा.

स्मार्ट टिप्स

### टिकवा दागिन्यांची झळाळी

सतत वापरल्यामुळे दागिन्यांची झळाळी कमी होते. त्यातही चांदीचे दागिने लवकर खराब होतात. या दागिन्यांची चमक टिकवण्यासाठी जरा जास्तच काळजी घ्यायला हवी. त्यातील एक भाग म्हणजे कधीही चांदीचे दागिने बाहेर ठेऊ नयेत. शक्यतो ते कापसात गुंडाळून ठेवावेत. चांदीच्या दागिन्यांना पाणी लागणार नाही याची काळजी घ्यावी.



हेअर केअर

### उपयुक्त व्हिनेगर

व्हिनेगर केसांसाठी लाभदायी आहे. यामुळे स्कॅल्पचा पीएच बॅलन्स टिकून रहातो. केस स्वच्छ ठेवण्यासाठी व्हिनेगर वापरता येईल. यामुळे केस छान चमकदार होऊ शकतील. केसांचा कोरडेपणा दूर करण्यासाठीही व्हिनेगर लावता येईल. यामुळे केस गळण्याची समस्याही कमी होऊ शकेल.



दैनिक
# जनता आवाज

शुक्रवार, दि. २९ ऑगस्ट २०२५ । अहिल्यानगर । पान नं. ८

## आ. खताळांवर माथेफिरूंकडून हल्ला



**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : संगमनेर फेस्टिव्हलच्या १७ व्या वर्षीच्या या कार्यक्रमामध्ये गणेशाची आरती झाली. आरती झाल्यानंतर राजस्थान युवक मंडळाचे अध्यक्ष सुमित अट्टल यांनी सर्वांचे स्वागत केले. मंडळाचे संस्थापक अध्यक्ष मनीष मालपाणी यांनी उपस्थितांचे आभार मानले.

त्यानंतर आमदार खताळ यांनी आपल्या भाषणात सांगितले की संगमनेर तालुका सांस्कृतिक, धार्मिक आणि ऐतिहासिक तालुका आहे. मालपाणी उद्योग समूह आणि राजस्थान युवक मंडळाचे काम मोठे असून यावर्षी ११ वर्षांनी होणारी मिरवणूक आकर्षक ठरणार असल्याचे सांगितले. सर्वांचे आभार मानल्यानंतर आ. अमोल खताळ माघारी निघाल्यानंतर या माथेफिरुणे मुख्य प्रवेशद्वाराजवळ हा हल्ला केला. हल्ला झाल्यानंतर अचानक खूप मोठा गोंधळ झाला. उपस्थितांनी या माथेफिरूला भरपूर चोप दिला. सदर इसमाचे प्रसाद अप्पासाहेब गुंजाळ असे नाव असे असल्याचे समजते आहे. उपस्थितांमध्ये २० मिनिटे गोंधळाचे वातावरण होते. आमदार अमोल खताळ यांच्यावर झालेल्या हल्ल्याने उपस्थितांनी नाराजी व्यक्त केली.

## सुपाऱ्यांसह तंबाखूचे पकडले १४ ट्रक

### एलसीबी पथकाची कारवाई; ८ कोटी ४३ लाखांचा मुद्देमाल जप्त

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी** : कर्नाटक राज्यातून अहमदाबादच्या दिशेने जात असलेल्या १३ सुपारी व १ तंबाखूचा ट्रक अहिल्यानगर स्थानिक गुन्हे अन्वेषण पथकाने राहुरी पोलीस ठाण्याच्या हद्दीत म्हणजे चिंचोली हद्दीत पकडले आहेत.



कर्नाटक राज्यातील ट्रक चालकांकडून १४ वाहने पोलिसांच्या हाती लागले असल्याने मोठे रॅकेट उघडकीस होण्याची शक्यता असल्याने त्या दृष्टीने स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस पथक तपास करत आहे.

अहिल्यानगर एलसीबीचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांना इतक्या मोठ्या प्रमाणावर सुगंधी सुपारी तंबाखू गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या माहितीनुसार असे की, हे सर्व ट्रक कर्नाटक येथून अहमदाबादकडे जात होते. राहुरी पोलीस ठाण्याच्या हद्दीत पोहोचल्यानंतर कोल्हार खुर्द येथे स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सापळा रचून ही कारवाई असल्याची जिल्ह्यातील पहिलीच घटना असावी.

सदर ट्रक सध्या राहुरी पोलीस ठाण्यात आणले असून पुढील कायदेशीर कार्यवाही सुरू असून जवळपास ६,१७,८५००० रुपये किमतीची २,०५,९५० किलो लाल सुपारी, १५,६०,००० रुपये किमतीची ७८०० किलो तंबाखू व २,१०,००,००० रुपये किमतीचे १३ वाहने असा एकूण ८,४३,४५,००० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

## शाहगडावर शहाजीराजेंच्या स्मारकासाठी प्रयत्नशील

### आ. अमोल खताळ; पेमगिरीच्या शाहगडावर संकल्प दिनानिमित्त ध्वजारोहन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : शहाजीराजे आणि राजमाता जिजाऊ याचे वास्तव्य राहिलेल्या तालुक्यातील पेमगिरी येथील शहागडावर शहाजीराजे यांचे स्मारक व्हावे, अशी या परिसरातील नागरिकांची मागणी आहे. यासाठी आपण शासन दरबारी प्रयत्न करू, असे आश्वासन आ.अमोल खताळ यांनी दिले.

शाहाजीराजे यांनी शाहागडावरून स्वराज्याची संकल्पना मांडली होती. या पार्श्वभूमीवर शहागडावर संकल्प दिन साजरा करण्यात आला. यावेळी आ. खताळ यांच्या हस्तेध्वजारोहन करण्यात आले.



याप्रसंगी चाकण येथील डॉ. संदीप मेहिंद, ॲड. झिंजुरके, राजू दिक्षित, शिवसेना तालुकाप्रमुख रामभाऊ राहाणे, उपतालुकाप्रमुख बादशहा गुंजाळ, सावरचोळच्या सरपंच अनिता कानवडे, मिलिंद टपाल, शशिकांत मतकर, ॲड. मीनानाथ शेळके, बजरंग दलाचे तालुका संयोजक कुलदीप ठाकूर, दिलीप कोल्हे, शशिकांत मतकर, अक्षय थोरात, महेश बागडे, आशिष कानवडे, योगेश शेटे, दिलीप कोल्हे उपस्थित होते.

आ. खताळ म्हणाले की, शहाजीराजे व राजमाता जिजाऊ यांचे या शहागडावर वास्तव्य झाले होते.ऐतिहासिक पार्श्वभूमी असलेला हा शहागड काहींच्या अनास्थे मुळे अविकसित राहिला. आपण आमदार झाल्यानंतर विधानसभेत गेल्यानंतर प्रत्येक अधिवेशनात शहागड आणि महाकाय वडाच्या संदर्भात मुद्दा उपस्थित करून राज्यसरकारचे याकडे लक्ष वेधले. हा परिसर पर्यटन विकास विभागात घेऊन यासाठी निधी उपलब्ध करून द्यावा. अशी मागणी आपण पर्यटन विकासमंत्री शंभूराजे देसाई यांच्याकडे केली आहे.

पुढील वर्षी हा संकल्प दिन अधिक जोमाने साजरा केला जाईल, त्यासाठी जी काही मदत लागेल ती मी स्वतः करेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

> संकल्पदिनाला सन २०३३ चारशे वर्ष पूर्ण होत आहे. त्यावेळी होणाऱ्या या कार्यक्रमाचे आयोजक सुद्धा आपणच राहू देशाचे पंतप्रधान येईल की नाही. ते सांगू शकत नाही. परंतु, त्यावेळी जे कोणी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असेल त्यांना मी या शाहगडावर नक्कीच घेऊन येईल, असा शब्द यावेळी आ. खताळ यांनी पेमगिरीकरांना दिला.

## विघ्नहर्ता कृपेने ‘गणेश’ची भरभराटी होईल

### रामगिरी महाराज; श्री गणेश कारखाना येथे गणेश मूर्ती स्थापना

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव** : श्री गणेश कारखाना चांगला चालेल, गणपती या कारखान्यावर विघ्न येवु देणार नाही, असे प्रतिपादन सराला बेटाचे मठाधिपती महंत रामगिरीजी महाराज यांनी केले.



श्रीगणेश सहकारी साखर कारखान्याच्या कार्यस्थळावर श्री गणेशाची महंत रामगिरी महाराज, कोल्हे कारखाना अध्यक्ष युवानेते विवेकभैय्या कोल्हे, गणेशचे अध्यक्ष सुधिर लहारे, उपाध्यक्ष विजयराव दंडवते, कार्यकारी संचालक जी. बी. शिंदे या सर्वांच्या हस्ते पुजन होवुन स्थापना करण्यात आली. त्याप्रसंगी महंत रामगिरी महाराज बोलत होते.

महंत रामगिरी महाराज यांनी श्री गणपतीचे वैशिष्ट्ये, महत्व श्रोत्यांना विस्तृत स्वरुपात सांगितले. कोणत्याही कार्याला आरंभ गणेश पुजनानाचे होते. धर्म अनेक असले तरी सुरुवात गणेश पुजनानेच होते. ज्ञानेश्वर महाराजांनी ज्ञानेश्वरीच्या पहिल्या अध्ययात गणेशाची वंदना दिली आहे. ते सांगत महाराज म्हणाले, ओमकार गणेशाचे सगुण स्वरुप आहे.

यावेळी कार्यकारी संचालक जी. बी. शिंदे यांचेही भाषण झाले. सुत्रसंचालन सेक्रेटरी नितीन भोसले यांनी केले तर आभार संचालक अनिल गाढवे यांनी मानले. जेष्ठ संचालक नारायणराव कार्ले, शिवाजी लहारे, मधुकर महाराज, बाबासाहेब डांगे, गंगाधर डांगे, संपत हिंगे, नानासाहेब नळे, बाळासाहेब चोळके, महेंद्र गोर्डे, विष्णुपंत शेळके, अरविंदराव फोपसे, अरुंधती फोपसे, अनिल गाढवे, संपतराव चौधरी, शोभाताई एकनाथराव गोंदकर, कमला धनवटे, मधुकर सातव, आलेश कापसे, अनिल टिळेकर, ज्ञानदेव चोळके आदी उपस्थित होते.

## सर्वांनी जबाबदारीने काम करण्याची गरज : आ. राजळे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कर्जत** : माजी आमदार आप्पासाहेब राजळे यांच्या कार्यानंतर स्व. राजीव राजळे यांनी सहकारातील शेतकऱ्यांच्या संस्था टिकवण्यासाठी मोठे योगदान दिले. शेतकऱ्यांच्या हितासाठी उभ्या राहिलेल्या या संस्था सक्षम राहाव्यात यासाठी सर्वांनी जबाबदारीने काम करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन आमदार मोनिका राजळे यांनी केले.

पाथर्डी तालुका श्री वृध्देश्वर सहकारी तालुका दुध उत्पादक व प्रक्रिया संघाच्या हंडाळवाडी येथील दुध शितकरण केंद्राच्या नुतनीकरणा निमित्त व



अत्याधुनिक दुध शीतकरण यंत्र सामुग्रीचे उद्घाटन समारंभ प्रसंगी आमदार राजळे बोलत होत्या.

यावेळी नारायण धस, अभय आव्हाड, डॉ. मृत्युंजय गर्जे, नंदकुमार शेळके, अशोक चोरमले, सुभाष बर्डे, धनंजय बडे, बजरंग घोडके, गिरीश सोनोने, तुळशीराम भोजने, विशाल आहेर, संघाचे चेअरमन कोंडीराम पवार, संदीप पठाडे, काकासाहेब शिंदे, रामकिसन काकडे आदी उपस्थित होते.

आ. राजळे म्हणाल्या, जिल्ह्यातील उत्तर भागात सहकार नेत्यांनी शेतकरी व दूध उत्पादन शेतकऱ्यांच्या पाठीशी राहून मोठी क्रांती घडवली. आपल्या भागातीलही तरुणांच्या दूध व्यवसायासाठी वृद्धेश्वर तालुका दूध संघ सर्वतोपरी मदत करेल.स्व. राजीव राजळे यांनी निवडणुकीतील पराभवानंतरही सहकार क्षेत्राकडे दुर्लक्ष न करता वृद्धेश्वर संघाची स्थापना केली.

> राजकारणी लोक कर्मयोगी कधीच होऊ शकत नाहीत, परंतु आ. मोनिका राजळे या अत्यंत धाडसी व कार्यसम्राट असून त्यांनी भल्याभल्यांना जिरवले आहे. अशा शब्दांत आ. राजळे यांचा गौरव नारायण धस यांच्याकडून करण्यात आला. या वक्तव्याला उपस्थितांनी एकाच वेळी टाळ्यांचा कडकडाट करीत दाद दिली.

## श्रीरामपुरात ‘मेफेंटर्मिन’च्या पकडल्या ५० बॉटल्या

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : कुरिअरव्दारे नशेचे औषध व इंजेक्शन विक्री करण्याकरीता मागविलेल्या एका तरुणावर छापा टाकून त्याच्याकडून साडेसोळा हजाराचे मेफेंटर्मिनच्या ५० बॉटल्या हस्तगत केल्याची घटना श्रीरामपुर शहरात उघडकीस आली आहे. त्यामुळे श्रीरामपूर शहर ड्रग्जचे केंद्र बनले असल्याची चर्चा सद्या शहरात सुरू आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, दि. २७ ऑगस्ट २०२५ रोजी एक वाजेच्या सुमारास पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांना गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, डीटीडीसी कुरिअर, जिजामाता चौक, वॉर्ड नं. ०३, श्रीरामपूर येथे परवेज शेख याने कुरिअरव्दारे नशेचे औषध व इंजेक्शन विक्री करण्याकरीता मागवले असुन तो दोन वाजेच्या सुमारास ते घेण्याकरीता येणार आहे, अशी खात्रीशिर बातमी मिळाल्याने पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांनी सदरची माहिती उपविभागीय पोलीस अधिकारी जयदत्त भवर यांना कळवुन तसेच औषध निरीक्षक सोमनाथ. बा. मुळे, अहिल्यानगर यांच्याशी संपर्क करुन तात्काळ सापळा लावण्यास सांगितला.

तपास पथकाने तात्काळ जिजामाता चौकात सापळा लावला व सदरचा इसम डीटीडीसी कुरिअर, जिजामाता चौक, वॉर्ड नं. ०३, श्रीरामपूर येथे येवुन त्याने सदरचे पार्सल ताब्यात घेताच त्यास पोलीस पथकाने ताब्यात घेवुन त्याला त्याचे नाव पत्ता विचारले असता त्याने त्याचे नाव परवेज जमीर शेख (वय २३, रा. आयडीबीआय बॅक समोर, नेवासा रोड वॉर्ड नं.०६, श्रीरामपूर) असे असल्याचे सांगितले. त्याच्याकडून १६७०० रुपये किंमतीचे मेफेंटर्मिन औषधाच्या १० एमएलच्या ५० बॉटल मिळुन आल्या. सदर व्यक्तीला ताब्यात घेतले असून मुद्देमाल जप्त करण्यात आला.

## कोल्हेंनी मीराबाई मिरीकरांचे घेतले आशीर्वाद

### संवत्सर येथे ऋषीपंचमी उत्सवाला भाविकांचा महासागर

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव** : कोपरगाव तालुक्यातील संवत्सर येथे ऋषीपंचमीनिमित्त भाविकांचा महासागर उसळला. श्री शनी महाराज मंदिर प्रांगणात महाराष्ट्रातील प्रख्यात कीर्तनकार ह.भ.प. मीराबाई मिरीकर यांची कीर्तन सेवा आयोजित करण्यात आली होती. यावेळी मा. आ. स्नेहलताताई कोल्हे यांनी उपस्थित राहून महंतांचे आशीर्वाद घेतले व महिला भाविकांना शुभेच्छा दिल्या.

प्रकृती अस्वस्थ असल्यामुळे ह.भ.प. मीराबाई मिरीकर यांच्या अखंड परंपरेचे चिंतन ह.भ.प. विनायक महाराज वाघ यांनी कीर्तनातून सादर केले. मात्र, मीराबाई मिरीकर यांनी स्वतः भाविकांना शुभेच्छा देत आपला संदेश पोहोचवला. यावेळी स्नेहलताताई कोल्हे यांनी दोन्ही कीर्तनकारांचे संतपूजन केले.

प.पू. रामदासी महाराज यांच्या प्रेरणेने सुरू झालेली ही किर्तन परंपरा आजही संवत्सर गावात अविरत सुरू आहे. दरवर्षी मीराबाई मिरीकर अखंडपणे आपली किर्तन सेवा देतात. संवत्सर या गावाला धार्मिक महत्त्व असून येथे शृंगऋषींचे भव्य मंदिर आहे. गोदाकाठावर महानुभाव पंथीय श्रीकृष्ण मंदिर तर कोकमठाण परिसरात पुरातन हेमाडपंथी महादेव मंदिर आहे. या धार्मिक स्थळांमुळे संवत्सरचे महत्व आहे.

ऋषीपंचमी हा महिलांच्या श्रद्धेचा दिवस असल्याने हजारो महिला भाविक गोदावरीत स्नान करून उपवास पाळतात व शनी मंदिर प्रांगणात किर्तनाचा लाभ घेतात. महिलांची प्रचंड उपस्थिती पाहून स्वतः मीराबाई मिरीकर आश्चर्यचकित होतात आणि दरवर्षी उपस्थित राहून सेवा देण्याचा संकल्प व्यक्त करतात. शेवटी, स्नेहलताताई कोल्हे यांनी महाप्रसाद वाटपाची सेवा केली व भक्तांसोबत प्रसादाचा लाभ घेतला.

याप्रसंगी ज्ञानेश्वर परजणे, बापूसाहेब



बारहाते, बाळासाहेब शेटे, संजीवनी सहकारी बँकेचे चेअरमन राजेश परजणे, मुकुंद काळे, महेश परजणे, अनिल भाकरे, गोविंद परजने, चिमाजी दैने, सचिन शेटे, प्रकाश बारहाते, अनिल शेटे आदी मान्यवर उपस्थित होते.

## खर्डा येथील अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड** : शिर्डी, हैदराबाद राज्य महामार्गावरील सिताराम गड येथे सिताराम बाबा यांच्या अकराव्या पुण्यतिथी महोत्सवानिमित्त श्री चतुर्भुज विष्णू मूर्ती, श्री सद्गुरु सिताराम बाबा मूर्ती प्राणप्रतिष्ठा व सुवर्णकलष वर्धापन दिनानिमित्त अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते सप्ताहाची सांगता मठाधिपती महालिंग महाराज नगरे यांच्या काल्याच्या कीर्तनाने झाली.

यावेळी सिताराम गड येथे झालेल्या अखंड हरिनाम सप्ताह मध्ये ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, संगीत श्रीमद् भागवत कथा, ज्ञानयज्ञ सोहळा, कीर्तन, संगीत जागर, हरिजागर अन्नदान, सिताराम बाबाच्या पादुका व प्रतिमेचे सजवलेल्या रथातून शहरातून मिरवणूक, शहर व परिसरातील यशस्वी विद्यार्थ्यांचा सन्मान, लोकसेवा आयोगाच्या परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन यासह कलश पूजन, प्रतिमा पूजन, विष्णुपूजन ,दीप प्रज्वलन ,संगीत भागवत कथा, कीर्तन आणि



सांस्कृतिक कार्यक्रमाने सप्ताहाची सांगता होऊन महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.ओमकार महाराज जगताप आळंदी यांनी नाकाने आवाज काढत सनई वादन करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

यावेळी काल्याच्या कीर्तनामध्ये बोलताना मठाधिपती महालिंग महाराज नगरे म्हणाले, परमार्थ प्रारब्धाने होतो, भाव, भक्ती व मुक्ती असेल तर परमार्थ होतो .भाव नसेल तर भक्ती नाही, भक्ती नाही तर मुक्ती नाही, मुक्ती हवी असेल तर भक्ती करा कारण भगवान परमात्मा भक्तीचा भुकेला आहे. बाबांनी शहर व परिसराला अध्यात्मिक वैभव प्राप्त करून दिले आहे आध्यात्मिक मार्गदर्शन करून काल्याचे किर्तन झाले.

> आमदार रोहित पवार यांनी सिताराम गडाला तीन कोटी रुपयांचा निधी मंजूर करून सभा मंडप दिला. याबद्दल सिताराम गडाच्या वतीने मठाचे मठाधिपती महालिंग महाराज नगरे व सरपंच संजीवनी वैजनाथ पाटील यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

## उद्योजकांचे प्रश्न तातडीने मार्गी लावा

### जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या सूचना

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : औद्योगिक क्षेत्रातील उद्योजकांचे प्रश्न तातडीने मार्गी लावावेत. क्षेत्रात स्वच्छता राखून निर्माण होणाऱ्या कचऱ्याची वेळेत विल्हेवाट लावावी. औद्योगिक क्षेत्रातील अतिक्रमणे तातडीने हटवून अवैधपणे व्यवसाय करणाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी, अशा सूचना जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिल्या.

श्रीरामपूर येथील औद्योगिक क्षेत्र कार्यालयात जिल्हा उद्योग मित्र समितीच्या कामाचा आढावा घेण्यासाठी आयोजित बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस एमआयडीसीचे विभागीय अधिकारी गणेश राठोड, महाव्यवस्थापक दीपक शिवदास, व्यवस्थापक अशोक बेनके, क्षेत्र व्यवस्थापक दिलीप काकडे, उपअभियंता संदीप बडगे, पोलीस निरीक्षक एन. बी. देशमुख तसेच श्रीरामपूर उद्योजक संघटनांचे पदाधिकारी बाबासाहेब काळे, प्रकाश गांधी, नंदकुमार शिंदे, हरदीप सिंग सेठी आदी उपस्थित होते.

डॉ. म्हणाले की, औद्योगिक क्षेत्रातील अग्निशमन केंद्र, पथदिवे, रस्ते, ड्रेनेज यांसह इतर मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात. वाढीव पाणीपुरवठ्याची मागणी मान्य व्हावी यासाठी आवश्यक प्रस्ताव तयार करून पाठविण्यात यावा.

## नेवाशातील दमदार पावसाने बळीराजा सुखावला

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा** : काल पहिल्यांदाच नेवासा तालुक्यात झालेल्या मुसळधार पावसाने खरिपाच्या पिकांना दिलासा मिळाला असला तरी या पावसाने सर्वत्र दाणादाण केली आहे. या दमदार पावसाने बळीराजा सुखावला आहे.

यंदा नेवासा तालुक्यात कमी अधिक फरकाने झालेल्या पावसावर खरिप हंगामातील पिकांचे भवितव्य अवलंबून राहिलेले आहे. खरिपातील कपाशी, सोयाबीन, मका पिकांची पावसाअभावी चांगलीच ओढाताण झाली आहे. खरिप पेरणीच्या वेळी पावसाने ओढ दिल्याने कपाशी, सोयाबीनची वाट लागल्यातच जमा झालेले आहे. रिमझिम अधूनमधून येणाऱ्या पावसाने या पिकांना जीवदान दिलेले आहे. दमदार पाऊसच नेवासा तालुक्यात नसल्याने सर्वांची मुसळधार पावसाकडे लक्ष लागले होते. गुरुवारी (दि.२८)दुपारनंतर तालुक्यातील नेवासा परिसरासह खडका, प्रवरासंगम, देवगड, मुकिंदपूर, सलाबतपूर, शिरसगाव, खेडले काजळी, बकुपिंपळगाव,



भालगाव, गोधेगाव, पिचडगांव, गोंडेगाव, भेंडा, कुकाणा, सोनई, वडाळा बहिरोबा, खरवंडी, घोडेगाव, करजगाव, पानेगाव, निंभारी, शिरेगाव आदि भागात मुसळधार पावसाने हजेरी लावली. सर्वत्र पाणीच पाणी केले. वारा व पावसाचा जोर असल्याने काही ठिकाणी कपाशी आडव्या झाल्या आहेत.

सध्या शेतकरी कपाशी पिकाला माती लावण्याचे काम चालू आहे. सोयाबीनला शेंगा लागत आहेत. मक्याची कणसे परीपक्व होत असल्याने पावसाची नितांत गरज असल्यामुळे गुरुवारी पहिल्यांदाच मुसळधार पावसाने या खरिपातील पिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. पाणी पातळी वाढी साठी हा पाऊस चांगला आहे. हा झालेला पाऊस तालुक्यात कमी अधिक प्रमाणात असल्याने प्रवरासंगम परिसरात कपाशींच्या स-यांमध्ये पाणी दिसून आले तर नेवासा परिसरात पाऊस कमी असल्याने या पावसाने पिकांना जीवदान मिळाले आहे. शहरात सखल भागात पाणी साचले होते. ठिक ठिकाणी पावसाच्या पाण्याचे तळे झाले होते. गुरूवारी रात्री उशिरापर्यंत कमी अधिक प्रमाणात पाऊस चालू होता. गणपती उत्सवात पावसाने हजेरी लावल्याने दहा दिवस पाऊस पडत राहतो की काय? असा प्रश्न नागरिक उपस्थित करित आहेत.

> **रब्बीच्या हितासाठी परतीच्या पावसाकडे लक्ष!**
>
> तालुक्यात सुरूवातीपासूनच दमदार पाऊस नसल्याने खरिप हंगामातील पिके धोक्यात आली होती. कपाशींची वाढच होत नव्हती. मध्यंतरी आलेल्या रिपरिप पावसाने थोडा दिलासा मिळाला. पिके जगली असली तरी उत्पन्नात यंदा मोठ्या प्रमाणात घट येणार आहे. रब्बी हंगामासाठी परतीच्या पावसाकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे. या पावसावरच रब्बीचे भवितव्य अवलंबून आहे.

## पाथर्डीत माव्याच्या अवैध विक्रीवर एलसीबीची कारवाई

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी** : पाथर्डीत माव्याच्या अवैध विक्रीवर स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीस पथकाने कारवाई करून एकाला अटक केली आहे.

शासनाने बंदी घातली असतानाही काही ठिकाणी मावा विक्रीचा अवैध व्यापार सुरू असल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेला मिळाली होती. या माहितीच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पाथर्डी येथे छापा टाकून बंदी असलेला मावा विक्री करणाऱ्या अली ऊर्फ अर्षद इकबाल पठाण (वय २०, रा. मेहेरटेकडी, पाथर्डी) रंगेहात पकडले. पठाण हा पाथर्डी शहरातील माणिकदौंडी रोडवरील एका शाळेजवळ प्लॅटीना दुचाकीवरून तयार माव्याच्या पुड्यांची विक्री करत होता. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने गुप्त माहितीच्या आधारे छापा टाकून आरोपीला ताब्यात घेतले. कारवाईदरम्यान आरोपीकडून माव्याच्या पुड्या, दुचाकी असा एकूण ३१,९५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

हे दैनिक जनता आवाज मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक अजित रमेश मोरे यांनी जनता आवाज प्रेस गट नं. २५/१/२/३, कोल्हार बु., ता. राहाता, जि. अहिल्यानगर ४१३७१० येथे छापून दैनिक ‘जनता आवाज’, मु.पो. कोल्हार बु., ता. राहाता जि. अहिल्यानगर, ४१३७१० जिल्हा कार्यालय- गाळा नं.१, विवेकानंद पॅलेस, श्रीराम चौक, बोल्हेगाव, अहिल्यानगर ४१४१११. (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. विभागीय कार्यालय- जिजामाता चौक, सोमैय्या हायस्कूल शेजारी, व्यापारी संकुल बिल्डींग, दुसरा मजला, ता. श्रीरामपूर, जिल्हा अहिल्यानगर, ४१३ ७०९, * कार्य. संपादक : महेश पोपट रक्ताटे. पोस्टल परवाना क्र. SRP/141/2025-2028/ PRGI No. MHMAR/25/RAA11. This daily Janta Awaj is published by Ajit Ramesh More, owner, printer, publisher and editor at Janta Awaj Press Gut No. 25/1/2/3, Kolhar Bk., Tal.- Rahata, Dist.- Ahilyanagar-413710. Published at District Office- Shop No.1, Vivekanand Palace, Shriram Chowk, Bolhegaon, Ahilyanagar-414111. Divisional Office-Jijamata Chowk, Near Somaiyya High School, Business Complex Building, 2nd Floor, Tal.-Shrirampur, Dist. -Ahilyanagar-413709
* Executive Editor- Mahesh Popat Raktate. Postal License Number-SRP/141/2025-2028 PRGI No.- MHMAR/25/RAA11